॥ जय माता जी ॥

॥ माता बारोंडादेवी प्रसन्न ॥

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ अंक : ८ सोमवार दि. १५ फेब्रुवारी २०२१ ते रविवार दि. २१ फेब्रुवारी २०२१ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

दोन्ही बायका पळून जाताच संतापाने भिनभीनला १८ महिलांना ठार मारून सिरीयल किलर बनला

हैद्राबाद/क्राईम रिपोर्टर

बालपणी किंवा तरुणपणी एखाद्या माणसाच्या आयुष्यात काही वाईट घटना घडली कि त्या घटनेचा त्याच्या मनावर खोलवर परिणाम होतो. खास करून त्याच्या अत्यंत जवळच्या किंवा नात्यातल्या माणसाने त्याचा विश्वासघात केला कि मग त्याच्या मनात जी सुडाची भावना निर्माण होते ती त्याला भयंकर विकृतीच्या मार्गावर नेते. त्याला ज्या माणसाने फसवलेले असते त्या माणसाचा चेहरा त्याला इतर माणसांमध्ये दिसू लागतो आणि मग संतापाच्या भरात तो त्याच्यावर हल्ला करतो आणि वाघाला जशी रक्ताची चटक लागल्यावर तो नरभक्षी होतो तसाच सुडाच्या आगीत सतत जळणाऱ्या माणसाला एकदाका माणसाचा बळी घेण्याची विकृती जडली कि मग तो सिरीयल किलर बनतो आणि सतत आपल्या शिकारीच्या शोधात फिरत असतो. साठच्या दशकात मुंबईमध्ये अनेकांचे बळी घेणाऱ्या सिरीयल किलर रामान राघवचे नाव एकले तरी अजूनही मुंबईकरांच्या हृदयात धडकी भरते. अशाच एका सिरीयल किलरला हैद्राबाद पोलिसांनी अटक केली असून त्याने १८ वर्षांत १८ महिलांची बलात्कार करून हत्या केल्याचे उघडकीस आले आहे. त्याच्या दोन बायका दुसऱ्या बरोबर पळून गेल्याचा त्याच्या मनावर असा काही परिणाम झाला कि तो सर्व महिलांची नफरत करू लागला आणि महिलांविषयी असलेल्या याच राघातून त्याने १८ महिलांची हत्या केली. विशेष म्हणजे ९ महिलांच्या हत्येनंतर पोलिसांनी त्याला पकडले होते. पण तो तुरुंगातून पळून गेला आणि त्यानंतर त्याने आणखी ९ महिलांचे बळी घेतले. एम. रामुलू असे या सिरीयल किलरचे नाव असून मो मनोरुग्ण असल्याचे समजते. सध्या पोलीस त्याची चौकशी करीत आहेत.

हैद्राबाद मधील एम रामुलु या व्यक्तीने गेल्या १८ वर्षांत १८ महिलांची हत्या एकाच पध्दतीने केली होती. तो एकाद्या महिलेला गाठून तिच्याशी संधान साधून तिचा उपभोग घेऊन तो तिला मारत होता. एखाद्या सिरीयल किलर सारख्या घटना घडत असल्याने पोलीस ही चक्रावून गेले होते. ९व्या हत्येनंतर तो पोलीसांना सापडला होता. परंतू जेलमध्ये असताना तो पळून गेला. आणि परत त्याच ...पान २ वर

सासरचा छळवाद तिच्या प्राणावर बेतला हुंड्यापायी अखेर तिने गळफास घेतला

बुलढाणा/क्राईम रिपोर्टर

मयत प्रियंका

महाराष्ट्रात हुंडा प्रतिबंधक कायदा अस्तित्वात असतानाही त्या कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी होत नसल्याने आजही हुंड्यासाठी विवाहितांचा छळवाद केला जात आहे. त्याचं जीनं मुश्कील केल जात आहे. त्यामुळे सासरच्या लोकांकडून होणाऱ्या याच मानसिक आणि शारीरिक छळवादाला कंटाळून काही विवाहिता आत्महत्या करीत आहेत, तर काहींचा सासरच्या लोकांकडूनच खून केला जात आहे. मात्र सरकार किंवा पोलीस यंत्रणा याबाबत जराही गंभीर नसल्याने हुंड्याचा हा राक्षस रोजच कुठेना कुठे निष्पाप लेकीबाळींचा बळी घेत आहे. काटेल येथील अशाच एका घटनेत हुंड्यासाठी सासरच्यांकडून होणाऱ्या छळाला कंटाळून एका विवाहितेने आत्महत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी त्या विवाहितेचा पती दीर सासू सासरे यांना अटक केली आहे. तिचे सासरे हे पोलीस कर्मचारी आहेत.

श्रीकृष्ण फाळके यांची कन्या प्रियंका लग्नायोग्य झाली होती. दिवसामागून दिवस भरकन निघून गेल्यामुळे ती लहानची मोठी कधी झाली हे श्रीकृष्ण फाळके यांच्या लक्षातच आले नाही. एक पिता म्हणून फाळके यांनी तिचे सर्व प्रकारचे लाड पुर्ण केले. आता ती लग्नायोग्य झाली होती. मुलगी म्हणजे परक्याचे धन असते हे सर्वश्रृत आहे. त्यामुळे ती वयात आल्यानंतर साहजीकच तिच्या आईवडीलांना तिच्या लग्नाची चिंता लागली होती. तिच्यासाठी योग्य वर शोधण्यासाठी त्यांनी दिवसरात्र एक केली. नातेवाईकांच्या माध्यमातून, वधू वर मेळाव्यात हजेरी लावून त्यांनी प्रियंकासाठी वर संशोधनाचे काम सुरु ठेवले होते. संग्रामपूर तालुक्यातील भोन येथे श्रीकृष्ण फाळके आपल्या कुटूंबासह रहात होते. शेतकरी कुटूंबातील फाळके परिवारातील प्रियंका ही श्रीकृष्ण फाळके यांची सर्वात मोठी मुलगी होती. वर संशोधन सुरु ...पान २ वर

शेतीच्या वाद्दात रक्ताच्या नात्यांचा सडा पडला भावाने भावाचा त्याच्या जावयासह मुडद्दा पाडला

उदगीर/क्राईम रिपोर्टर

मयत गोविंद

मयत पावडे

ग्रामीण भागातील जनतेचे सर्व अर्थकारण शेतीवर अवलंबून असते. त्यामुळे शेतजमीन त्यांना प्राणापेक्षा प्रिय असते. अशावेळी बहुतेक वाद हे शेतजमिनीच्या वाटणी वरूनच होत असतात आणि हे वाद वादात गेले तर जमिनीच्या तुकड्यासाठी रक्ताच्या नात्यातही रक्ताचे पाट वाहतात. नाती कलंकित होतात. शेतीच्या वादातून आजवर भावाने भावाचा, लेकाने बापाचा, मुलीने आईचा खून केल्याच्या घटना घडलेल्या आहेत. उदगीर नजीकच्या हेरमध्ये शेतीच्या वादातून घडलेल्या अशाच एका घटनेत सख्ख्या लहान भावाने आपल्या मोठ्या भावाचा आणि त्याच्या जावयाचा खून केल्याची भयंकर घटना घडली असून या प्रकरणी चार महिलांसह ८ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून तिघांना अटक करण्यात आलीय.

शेतीच्या वादातून सख्ख्या लहान भावाने मोठ्या भावासह त्यांच्या जावयाचा खून केल्याची घटना उदगीर ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील मौजे हेर या गावी घडली आहे. या प्रकरणी तिघांना अटक केली असून फरार आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत.

याबाबत सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की मौजे हे येथील गोविंद माधव जगताप, भगवान महादू जगताप, आणि बालाजी महादु जगताप हे तिघे सख्खे भाऊ होते. यातील गोविंद महादू जगताप आणि भगवान महादू जगताप एकत्र राहत होते. तर बालाजी महादू जगताप हा पत्नी, मलगी, मुलगा अंकुश आणी लहू यांच्यासह विभक्त राहत होता. या तिघा भावांची महांडोळा रस्त्यालगत दोन एकर शेती होते. या दोन एकर शेती वरून त्यांच्यात बऱ्याच ...पान २ वर

पत्नीला यारा सोबत बघून पतीचे डोके फिरले कुऱ्हाडीचे घाव घालून दोघांनाही ठार मारले

पालघर/क्राईम रिपोर्टर

पती पत्नीचे नाते हे विश्वासावर अवलंबून असते आणि या नात्यात तेंव्हाच विश्वास आणि आस्था निर्माण होते जेंव्हा पतीकडून पत्नीच्या सर्व गरजा पूर्ण होतात. पण संसारात केवळ भौतिक सुखाच महत्वाचे नसते, तर शारीरिक सुख सुद्धा कितीतरी पटीने महत्वाचे असते. जर एखाद्या बाईला तिच्या पतीकडून मनासारखे शरीरसुख मिळाले नाही, तर ती दुसऱ्याला जवळ करते आणि त्यातून अनैतिक संबंध निर्माण होतात. मात्र आपली पत्नी परपुरुषाच्या बिछान्यावर लोळतेय हे कुठल्याही पतीला सहन होऊ शकत नाही. सफाळे येथील दिलीप ठाकूर या शेतमजुराच्या बाबतीतही असेच घडले. त्याच्यापेक्षा १२ वर्षांनी लहान असलेल्या पत्नीला शरीर सुख देण्यात तो कमी पडताच तिने दुसऱ्याशी सुत जुळवले आणि हीच गोष्ट दिलीपला सहन झाली नाही. त्याने दोघांना रंगेहात पकडताच तो खवळला आणि त्याने दोघांचीही कुऱ्हाडीचे घाव घालून निर्घुण हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी दिलीपला अटक केली आहे.

पालघर जवळील सफाळे येथे दिलीप ठाकूर आपली पत्नी संगिता आणि दोन मुलासह राहयला आहे. त्याच्या लग्नाला बारा पंधरा वर्ष झालेली होती. त्याचा संसार सुखा समाधानाने चालला होता. दिलीप हा रोजच्या मोलमजुरीसाठी बाहेर जात असल्याने संगिता ही घरी एकटीच राहत होती. ती ही अलिकडे एखाद्याच्या शेतात मजुरीसाठी जात होता. ...पान २ वर

नियतीने प्रेमाचा भयंकर शेवट केला प्रेयसीला जिवंत जळताना प्रियकर मेला

मुंबई/राजेंद्र वेदांते

पहिले प्रेम माणसाला सहसा विसरता येत नाही आणि प्रेम भंगाचे दुख पचवताही येत नाही. प्रेम भंग झालेला माणूस एकतर स्वतःचे जीवन संपवतो किंवा दुख्ख विसरण्यासाठी स्वतःला दारूच्या प्याल्यात बुडवून घेतो. मात्र काही प्रेमवीर असे असतात कि आपली प्रेयसी जर आपली झाली नाही, तर ती दुसऱ्या कुणाचीही होता नये. या विकृत विचारातून सरळ तिची हत्या करून तिचे जीवन संपवण्याचा प्रयत्न करतात. मुंबईतील विजय खांबे यानेही लग्नाला नकार देणाऱ्या प्रेयसीला जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला. मात्र या प्रयत्नात विजय इतका होरपळला कि त्यात प्रेयसी ऐवजी त्याचाच मृत्यू झाला. तर त्याची प्रेयसी रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत आहे.

विजय खांबे याचे आपल्या मेव्हण्याच्या लहान बहिणीशी प्रेमसंबध होते. सुरवातीच्या काळात दोघे एकमेकांवर निसीम प्रेम करीत होते. परंतु या दोघांच्या प्रेमाचा शेवट इतका भयंकर आणि क्रूर असेल असे कुणालाच वाटले नव्हते. पवित्र प्रेमात हि दोन मने एकत्र आली होती. दोघांनी लग्नाच्या आणाभाका घेतल्या होत्या. सर्व काही सुरळीत सुरु होते. पण या दोघांच्या प्रेमाला कुणाची दृष्य कुणास ठाऊक. पूढे घडले ते भयंकरच होते. विजयने आपल्या प्रियेसीच्या आई-वडीलांकडे लग्नाची मागणी घातली. परंतु मुलीच्या घरच्यांचा या लग्नाला कठोर विरोध होता. त्यांनी यांच्या लग्नाला ठाम नकार दिला. यामुळे विजय खूप तणावात होता. हे लग्न झाले नाही तर आपले तर आयुष्यच उद्ध्वस्त होईल अशी त्याला भिती वाटत होती. हा आघात पचवत असतानाच ...पान २ वर

म्हातारीचे दागिने बघून धोब्याची नियत फिरली देवदर्शनाला नेतो सांगून रस्त्यातच ठार मारली

कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर

मयत शांताबाई

पैसा आणि दागदागिने याचा मोह प्रत्येकाला असतो. त्यामुळे अशा माणसाची कधी नियत खराब होईल याचा नेम नाही. खास करून अशा लोकांपासून वायोवृद्धांना अधिक धोका असतो. कारण आजवर पैसा आणि दागदागिन्यांच्या मोहतूनच ओळखीच्या लोकांकडून जेष्ठ नागरिकांच्या हत्या घडल्या आहेत. कारण अशा वयोवृद्धांचा विश्वास संपादन करून त्यांच्या सोबत राहून त्यांना ठार मारणे व त्यांच्याकडचा पैसा किंवा दागिने लुटणे. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांसाठी सोपे असते. कोल्हापूर येथे अशाच एका घटनेत एका वृद्ध महिलेला देव दर्शन करायला नेतो असे सांगून तिच्या ओळखीच्या परीताने बाहेर नेले आणि तिचा गळा दाबून तिला ठार मारून तिच्या अंगावरचे दागिने आणि पैसे लुटले, तो एवढ्यावरच थांबला नाही. तिच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी त्याने मृतदेहाचे तुकडे तुकडे केले. मात्र पोलिसांनी या नराधमाच्या मोठ्या शिताफीने मुसक्या आवळल्या.



राजाराम तलाव सरनोबतवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर सकाळ सकाळी मॉर्निंग वॉकला अनेक जण जात असतात. बुधवार १० फेब्रुवारी २०२१ रोजी ही सकाळी बरेच जण मॉर्निंग वाकॅला येत होते त्यातीलच वैभव कुंभार याला एका प्लास्टिकच्या पिशवीत मानवी मृतदेहाचे अवशेष असल्याचे दिसून आले. त्याने जवळ जाऊन पाहिले असता. त्यात शीर ...पान ६ वर

मुला समान मानून ज्याला दिला मदतीचा हात त्याने संधी साधून केला उपकारकर्त्याचा घात

जळगाव/क्राईम रिपोर्टर

सध्याच्या या कलयुगात माणूस इतका स्वार्थी बनलाय कि आपल्या स्वार्थासाठी तो कधी कुणाचा केसाने गळा कापून विश्वासघात करील याचा नेम नाही. म्हणूनच प्रत्येक माणसाने कुणावरही डोळे झाकून विश्वास ठेऊ नये. एखाद्यावर विश्वास टाकण्यापूर्वी तो माणूस आपल्या विश्वासास पत्र आहे का याची खात्री करून घेणे गरजेचे आहे तसे न केल्यास कधी विश्वासघात होईल याचा नेम नाही. वरणगाव येथे राहणारे चांगो झोपे हे निवृत्त सरकारी कर्मचारी होते. त्यांनी जवळच राहणाऱ्या एका कंत्राटदारावर विश्वास ठेवला. त्याला आपल्या मुलासारखा मानून त्याला कंत्राटे मिळवून दिली. मात्र त्यांरच चांगो यांच्या चांगुलपणाचा फायदा घेत त्यांच्या घरात चोरी केली आणि ती उघडकीस येताच पित्यासमान चांगो यांची निर्घुण हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी व त्याच्या साथीदाराला अटक केली आहे.

मयत चांगो

चांगो रामदास झोपे हे एक धनसंपन्न व्यक्तिमत्व म्हणून वरणगाव परिसरात प्रसिद्ध होते. भारत सरकार संरक्षण मंत्रालयाच्या अखत्यारीत असलेल्या वरणगाव येथील ऑर्डनन्स फॅक्ट्रीत त्यांनी सेवा बजावली होती. कामगार युनीयनचे पदाधिकारी असलेले चांगो झोपे अकरा वर्षापुर्वी शासकीय सेवेतून निवृत्त झाले होते. सेवानिवृत्तीनंतर चांगो झोपे यांनी पुर्णवेळ शेती आणि प्लॉट खरेदी विक्रीच्या व्यवसायात स्वत:ला झोकून दिले होते. सत्तरीच्या घरातील चांगो झोपे यांच्या अंगावरील सोन्याचे मुल्य जवळपास दिड लाख रुपयांच्या घरात ...पान ६ वर

भयानक कृत्य करताना काहीच नाही वाटले जन्मदात्या बापानेच लेकीचे मुंडके छाटले

मुंबई/राजेंद्र वेदांते

मुली विषयी असूया असलेल्या बापासाठी मुलगी हि एक प्रकारे नकुशी असते. त्यातच जर त्या मुली बरोबर त्याचे पटत नसेल, तर मग जन्मदाता बाप साप बनून आपल्या मुलीचा बळी घ्यायलाही मागे पुढे पाहत नाही. खोपोलीत अशाच एका नराधम बापाने पोटच्या पोरीची मुंडके छाटून निर्घुण हत्या केली. या घटनेने खोपोली हादरली असून पोलिसांनी २४ तासात या नराधम बापाला अटक केली आहे. दरम्यान या हत्येचे नेमके कारण काय याचा पोलीस शोध घेत असले तरी हा नरबळी असावा असा पोलिसांना संशय आहे. पोलीस या प्रकरणी अधिक चौकशी करीत आहेत.

बाप आपल्या मुलीसोबत किती क्रूर वागू शकतो. याचे एक उदाहरण खोपोलीत पाहयला मिळाले. पोलीसांनी आरोपी बापाला अटच केल्यानंतर त्याने आपल्या पोटच्या मुलीला इतक्या क्रूरतेने का संपवले याचा उलगडा अजून पोलीसांना झाला नाही. अगदी जुजबी माहिती अटक आरोपी देत असून मुलीची हत्या करण्याचा त्याचा नेमका हेतू काय होता याचा शोध खोपोली पोलीस घेत आहेत. अटक आरोपीने क्रौर्याच्या सिमा पार करीत हा गुन्हा करून खोपोलीत दहशत पसरवली होती. ...पान २ वर

15 TO 21 FEB 2021 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 13/02/2021 9:06 PM Page 1

पान १ वरून....

दोन्ही बायका पळून जाताच संतापाने ...

पध्दतीने महिलांची हत्या करून लागला होता. त्याचे महिलांचे हत्येचे सत्र हे सन २००२ पासून चालू होते. ३० डिसेंबर २०२० रोजी त्याने एका महिलेची हत्या केली त्या गुन्हयात तो परत पोलीसांना सापडला आणि त्याने केलेल्या १८ महिलेच्या हत्येचा उलघडा पोलीसांनी केला. त्याने या हत्या कोणत्या सुडबुध्दीतून केल्या होत्या. याचा तपास पोलीस करीत आहेत. या सिरियल किलरचा भांडाफोड नुकताचा हैद्राबाद आणि राचनकोंडा पोलीसांनी केला. ३०डिसेंबर २०२०च्या रात्री हैद्राबाद मधील युसूफगुडाच्या कंपाउंडमध्ये एका ५० वर्षीय महिलेची डोक्यात दगड घालून हत्या झाल्याची माहिती राचनकोंडा पोलीसांना मिळाली होती.पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. ती महिला रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. तिची साडी मांडीपर्यत वर सरकलेली होती.तिचे ब्लाऊज आणि साडी अस्तावस्त झालेले होते. जवळच्या तिच्या दारूच्या दोन बाटल्या पडलेल्या होत्या. पोलीसांनी घटनास्थळी दाखल होऊन त्या महिलेच्या मृतदेहाच पंचनामा करून तिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. बहुदा त्या अनोळखी महिलेला दारू पाजवून तिच्यावर बलात्कार करण्यात आलेला होता. ती महिला ही रस्त्यावरची फिरस्ती होती. तिच्यावर कुणी तरी फिरस्त्यानेच बलात्कार केला असावा आणि नंतर तिचा खून केला असावा अशी शक्याता पोलीसांनी व्यक्त करून तपासाला सुरूवात केली. या घटनेच्या २० दिवस आधीच म्हणजे १० डिसेंबर २०२० ला ही आशाच पध्दतीने एका महिलेची हत्या करण्यात आलेली होती. त्या घटनेत आणि या घटनेत ही बरेच साम्य होते. म्हणून पोलीसांनी त्या अंनुषगाने तपासाला सुरूवात केली होती. ती महिला ही ४० ते ४५ वर्षाची होती. या महिलेला ही दारू पाजून तिच्यावर बलात्कार केलेला होता. तिच्या ही डोक्यात दगड घातलेला होता. दोन्ही घटनेत साम्य असल्याने बहुदा खूनी एकच असावा अशी शंका पोलीसांना येत होती. त्या घटनेतील आरोपी ही पोलीसांना अजून मिळालेला नव्हता.ही फिल्मी स्टाईलने केलेली हत्या होती. ३०डिसेंबरच्या रात्री झालेल्या महिलेच्या हत्येसंबंधी पोलीसांना काही धागेदोरे मिळालेले होते. सुरूवातील ती महिला फिरस्ती वाटत होती. ती फिरस्ती नव्हती. त्या भागातील एक गरीब आणि असह्य कुंटूंबातील ती महिला होती. तिची ओळख पटल्यानंतर पोलीसांनी तपासाला वेग दिलेला होता. ती महिला एकटीच एका झोपडीत राहत होती. मिळेल ते काम करून आपला उदरनिर्वाह ती करीत होती.पोलीस या घटनेचा तपास करीत असताना युसुफगुडाच्या भागातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज पोलीसांनी तपासायला सुरूवात केली असता. घटनेच्या दिवशी ती महिला आणि ४५ वर्षांची व्यक्ती युसुफगुडाच्या कंपाऊंडामध्ये दारू पित बसले असल्याचे दिसत होते. तसा तो भाग निर्जन आणि एकांत असा होता.त्या भागात बरेच लोक दुरव्यवहार करणारे लोक येत होते. काही जण ओपन बार म्हणून दारू पिण्यासाठी येत होते. तर बरेच प्रेमी जोडपी आणि ते संबंध असणारे जोडपी ही त्या कामासाठी तेथे येत होते. घटनेच्या रात्री म्हणजे ८ वाजणेच्या सुमारास तेथे एक ५० वर्षीय महिला आणि ४५ वर्षीय तरूण त्या भागात आले होते. ते दोघे सुरूवातील गप्पा मारत बसले होते. त्यानंतर ते दोघे कंपाऊडच्या बाहेर एकांत वासासाठी पडले. तेथून ते दोघे एकांत वासासाठी ठिकाण शोधत असताना त्याच भागातील घाटकेश्वर जवळील अंकुशपूरला आले. तेथे त्या दोघांनी दारू ठोसली. त्यानंतर त्या तरूणाने तिच्यावर दारुच्या नशेत जबरदस्ती करून तिच्यावर बलात्कार केला.त्याने आपला कार्यभार आटोपताच ती त्याच्याकडे त्या कामाचे पैसे मागू लागली होती.त्यावेळी त्याने तिच्याबरोबर भांडण काढत तिला खाली पाडले आणि जवळच पडलेला दगड उचलून त्या महिलेच्या डोक्यात घातला होता.तशी ती महिला ही वेश्या नव्हती. परंतू मोलमजूरी करून ही पोटाचे भागत नसल्याने ती कधी तरी कुणाबरोबर तरी असे संबंध करून पैसे मिळवित होती. त्या महिलेने ही एका इसमाला ठेवून घेतलेले होते. तो इसम तिला आपली पत्नी मानीत होता. त्यानेच ती ३० डिसेंबर नंतर ती घरातून गेल्यानंतर दोन दिवस झाले तरी ती घरी परत आली नाही म्हणून घाटकेश्वर पोलीसात आपली पत्नी हरवल्याची तक्रार दाखल केलेली होती.त्यानंतर पोलीसाना तिचा मृतदेह घाटकेश्वर परिसरातील निर्जन स्थळी मिळालेले होता. त्यानंतर पोलीस या घटनेचा तपास करीत असताना त्या भागातील सीसटीव्ही कॅमेऱ्यात ती महिला आणि एक पुरूष जात असल्याचे दिसत होते. त्याचे फुटेज पोलीस तपासत असताना तो पुरूष पोलीसाना ओळखीचा वाटत होता. मागे झालेल्या हत्येत तो जेलमध्ये असताना पळून गेलेला हाच तो इसम असल्याची पोलीसांना खात्री पटल्यावर पोलीस त्याचा शोध घेत असताना तो एका ठिकाणी पोलीसाना दारूच्या नशेत मिळून आला. पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याला राचनकोंडा पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता. त्याने आपण एका मानसिक विकाराने आजारी असून आतापर्यत गेल्या १८ वर्षात १८ महिलांची अशाच प्रकारे हत्या केल्याचे कबुल केले. त्याने पोलीसांना आपले नाव एम.रामुलु असे सांगितले. पोलीस त्याच्याकडे आधिक चौकशी करीत असताना त्याने पोलीसाना थक्क करणारी माहिती दिली होती. त्याने आतापर्यत १८ महिलांची हत्या कोणत्या कारणातून केली याचा उलघडा पोलीसांना झाला. एम.रामुलू हा तेलंगना मधील संगारेड्डी जिल्हयातील कांडी मंडल गावात राहयाला आहे. गेल्या २१ वर्षापूर्वी त्याचे लग्न एका सुंदर तरूणीशी झाले होते. लग्नानंतर एक वर्षभरच त्याने आपल्या पत्नीशी संसार केला होता. त्याच्या पत्नीचे लग्नाअगोदरपासून एका तरूणाशी प्रेमसंबंध असल्याने त्याची बायको काही दिवसात एम.रामुलू याला सोडून त्या तरूणाबरोबर पळून गेली होती. त्यानंतर त्याने काही दिवसात दुसरे लग्न केले खरे पण त्याची दुसरी बायको ही त्याच्याबरोबर राहिली नाही.ती ही एका तरूणाचा हात धरून पळून गेली होती. त्यामुळे तो महिलेचा द्वेष करू लागला होता. त्याला एखादी विवाहित महिला बघितली की राग निर्माण होऊन घृणा निर्माण होत होती. त्यावेळेपासून तो डिप्रेशन मध्ये गेलेला होता. त्याने आता महिलांच्यावरती सुड घेण्याचे ठरविले होते. त्याने एखाद्या एकटया महिलेला गाठून तो तिच्याशी मैत्री करायचा तो गरीब आणि असह्य कुंटूंबातील महिलेला एकाद्या दुकानात किंवा ताडीच्या दुकानात एकटी असताना गाठत होता. तेलंगनामध्ये बऱ्याच ठिकाणी महिला ही ताडी पित असल्याने ताडीच्या दुकानात बऱ्यचा महिला या येत जात असायच्या. त्या महिलेला एकांतात गाठून तो त्यांच्याशी गोड बोलून सलगी वाढवित होता. त्यांना तो एकांतात नेऊन तिच्याबरोबर दारू पिऊन तो तिच्याबरोबर सेक्स करून मगच तिला तो मारून टाकत होता. कधी तिच्याच साडीने तिचा गळा आवळयचा तर कधी तिच्या डोक्यात तो दगड घालायाचा तर कधी चाकून तिचा गळा कापायचा अशा प्रकारे तो त्यांना उपभोगून त्याना मारून टाकीत होता. या खूनाच्या गुन्हयात तो पोलीसांना सापडलेला होता.परंतू त्याची मानसिक स्थिीती बरी नसल्याने आणि तो वेडयासारखे करीत असल्याने सन २०११ साली पोलीसांनी त्याला कोर्टाच्या परवानगीने एरागड्डा मेंटल हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. तेथील काही दिवसाच्या उपचारानंतर पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन जेलमध्ये पाठविले होते. त्यानंतर ही तो विक्षिप्त वागत असल्याने पोलीसांनी परत त्याला मेंटल हॉस्पिटल मध्ये पाठविले होते.तेथे त्याच्याबरोबर इतर ५ कैदी ही उपचार घेत होते.परंतू संधी साधून तो त्यावेळी त्या पाच कैद्यासह आपण ही पळून गेला होता.या घटनेची नोंद एसआरनगर पोलीस ठाण्यात झाली होती.पोलीस त्याचा शोध घेत होते.पण तो पोलीसांना मिळून येत नव्हता. ३०डिसेंबर २०२० च्या महिलेच्या हत्येत तो पोलीसाना सापडला.आणि त्याने केलेल्या १८ महिलेची केलेली हत्या उघडकीस आली. सुरूवातील २००९ साली कुकाटपल्ली आणि नरसंगी येथील महिलांच्या हत्येप्रकरणी कोर्टाने त्याला दोषी ठरविले होते.२०११ साली त्याला रंगारेड्डी कोर्टाने त्याला दोषी ठरवत त्याला आजीवन शिक्षा सुनावली होती.त्यावेळी काही दिवसांने त्याने या शिक्षेविरूध्द याचिका दाखल करून तो जामीनावर बाहेर आला. सन २०१२ आणि २०१३ साली त्याने बोबेनपल्ली मध्ये दोन महिलांची हत्या केली होती.सन २०१२ सालीच चंदरनगरमध्ये आणि डुंडीगलमध्ये या हत्या केलेल्या होत्या.२०१३ च्या मे महिन्यात त्याने बोबेनपल्ली येथे केलेल्या महिलेच्या हत्येत तो पोलीसांना सापडला होता. त्यावेळी त्याला पाच वर्षाची शिक्षा झाली होती. तो पाच वर्ष तुरूगात शिक्षा भोगत होता. शिक्षा भोगून तो सन २०१८ मध्ये तुरूंगातून बाहेर आला. त्यानंतर ही त्याने परत महिलांच्या हत्येचे सत्र अवलंबिले होते.सन २०१८ साली त्याने हाय कोर्टात अपील दाखल करून आपल्या शिक्षेत सूट मिळवलेली होती.त्यानंतर सन २०१८च्या ऑक्टोबर महिन्यात तो तुंरूगातून सुटला होता.तुंरूगातून बाहेर आल्यावर सन २०१९ मध्ये शमीरपेठमध्ये एक आणि पट्टन चेरूमध्ये अशा दोन महिलांची हत्या केली होती.सन २०१९ पर्यत त्याने १६ महिलांचे लैंगिक शोषून करून त्यांची हत्या केली होती.त्यानंतर ही तो पोलीसांना सापडला होता.परंतू त्याला सन २०२० मध्ये जामीन मिळाल्याने तो परत तुंरूगातून बाहेर आला त्यानंतर त्याने परत दोन महिलांची हत्या केली होती. त्याची हत्या करण्याची पध्दत ही जवळपास, कसारखीच होती. तो एकटया महिलांना गाठून त्याच्याशी लाडीगोडी लावून तो त्याना त्या कामासाठी तयार करून त्याच्याशी सेक्स करूनच त्याची हत्या करीत होता. त्या महिलांची हत्या केल्यानंतर तो त्या महिलांचे दागिने ही चोरत होता.आणि त्या पैशातूनच परत तो चैनी करीत होता. त्याच्यावर अतापर्यत १८ महिलांची हत्या आणि चार चोऱ्या करण्याचे गुन्हे ही पोलीसांनी दाखल केलेले आहेत. घाटकेश्वर येथे ३० डिसेंबर २०२० रोजी झालेल्या महिलेच्या हत्येने सगळा गुंता पोलीसांनी सोडविला होता.एम.रामूलू हा तसा हुशारच असल्याचे दिसून येत होते आपले पूर्ण आयुष्य तुंरगात जावू नये याची तो आधीच दक्षता घेत होता.आणि तसा प्लॅन करूनच तो महिलांची हत्या करायचा.याचा अर्थ तो मानसिक आजाराने त्रस्त नव्हता. तर त्याची ती विकृती होती. त्याने दोन दोन लग्ने केली पण त्याने केलेल्या बायका या त्याच्याबरोबर संसार करू शकल्या नाहीत त्यातूनच त्याच्यातील महिलाच्यातील विकृती वाढत गेलेली होती. तो फक्त आता नर आणि मादी या दोनच जाती मानत होता.त्याला आपल्या त्या कामासाठी आपल्या कमी वयाच्या किंवा आपल्या पेक्षा मोठया वयाच्या महिला ही चालत होत्या. म्हणून तर तो दारूच्या नशेत असताना एकटया दुकटया गरीब असह्य महिलेला गाठून आपली लैंगिक इच्छा भागवून तो त्यांची हत्या करायचा. त्याला हे सगळे कसे जमत होते. याचे पोलीसाना ही कोडे पडलेले होते. महिला त्याच्या नादाला लागतच कशा होत्या. आणि त्या त्याच्या जाळ्यात अडकत कशा होत्या. हे कोडे पोलीसांना पडलेले होते. महिलांना तो आपल्या नादाला लावण्यात तो वाकबगार तर होताच पण त्याचा गोड बोलून फायदा घेण्यात ही तो चतूर होता.मग त्याने आपण मानसिक आजाराने ग्रस्त आहोत हे नाटक कसे काय वटविले आणि मेडिकल मध्ये ते कसे काय काय सिध्द होत होते.याचे ही न उलघडणारे कोडे होते. १८ महिलांचे लैंगिक शोषण करून तो त्याना एकाद्या सिरीयल किलरप्रमाणेच त्याची हत्या करत असायचा हेच आता निष्पन्न झाले आहे.

सासरचा छळवाद तिच्या प्राणावर ...

असतांना फाळके यांना काटेल येथील वामनराव डामरे परिवारातील शत्रुघ्न या मुलाचे स्थळ योग्य वाटले. शत्रुघ्न डामरे याचे वडील वामनराव डामरे बुलढाणा पोलिस दलात नोकरीला आहेत. डामरे परिवारात आपली मुलगी प्रियंका सुखात राहील असे श्रीकृष्ण फाळके यांना वाटले. नातेवाईकांच्या माध्यमातून संपर्क साधत त्यांनी डामरे परिवाराला मुलगी बघण्यासाठी आमंत्रीत केले. दोन्ही पक्षाकडून योग्य प्रतिसाद मिळाल्यानंतर पुढील बोलणी करण्यात आली व लग्न देखील ठरवण्यात आले. लग्नात ५१हजाराचा हुंडा व यथायोग्य मानपान देण्याचे बैठकीत ठरले. त्यानुसार फाळके परिवार लग्नाच्या तयारीला लागला. ३ जून २०१४ रोजी प्रियंका व शत्रुघ्न यांचा विवाह भोन येथे मोठ्या धुमधडाक्यात व थाटामाटात पार पडला. मोठी मुलगी प्रियंकाचा विवाह सुखरुप पार पडल्यामुळे श्रीकृष्ण फाळके यांच्या मनावरील ताण काही प्रमाणात हलका झाला. लग्नानंतर फाळके परिवाराची कन्या डामरे परिवारात सुन म्हणून आली होती. पुर्वाश्रमीची प्रियंका फाळके आता प्रियंका डामरे झाली होती. लग्नानंतर सुरुवातीचे दिवस प्रियंकासाठी सुखाचे गेले. नवालाईचे नऊ दिवस भरकन निघून जाण्यास वेळ लागला नाही. कालांतराने डामरे परिवाराकडून प्रियंकाला कमी अधिक प्रमाणात त्रास सुरु झाला. लग्नात कमी हुंडा दिला या असे प्रियंकाला वेळोवेळी सांगण्यात येवू लागले. सुरुवातीला प्रियंकाने याकडे दुर्लक्ष केले. मात्र सासरच्या मंडळींचा हुंडा कमी मिळाला असे टोमणे कमी झाले नाही. त्यामुळे तिने हा प्रकार माहेरी तिच्या आईवडीलांच्या कानावर घालण्यास सुरुवात केली. काही दिवसांनी व्यवस्थीत होईल. मुलबाळ झाल्यावर सर्वांचा राग ओसरुन जाईल असे सांगून सर्वजण प्रियंकाची समजूत घालू लागले. मात्र काही दिवसांनी पुन्हा प्रियंकाला तिचा पती शत्रुघ्न, सासरे वामनराव, जेठ शिवाजी व सासु केसरबाई असे सर्वजण हुंड्याच्या विषयावरुन त्रास देवू लागले. त्यामुळे ती त्रस्त झाली. वाढीव हुंडा म्हणून एक लाखाची मागणी प्रियंकाच्या माध्यमातून तिच्या माहेरी मागण्याचे काम केले जात होते. वेळप्रसंगी तिला मारहाणदेखील केली जावू लागली. गावातील प्रतिष्ठीत पोलिस पाटील गणेश फाळके व इतर नातेवाईकांच्या मध्यस्तीने डामरे परिवाराची समजूत काढण्यात आली. आता आम्ही प्रियंकाला त्रास देणार नाही असे डामरे परिवारातील सदस्यांनी सर्वासमोर म्हटले. त्यामुळे वादावर पडदा पडला होता. मात्र पुन्हा काही दिवसांनी एक लाख रुपये वाढीव हुंड्याची मागणी प्रियंकाकडे सुरु झाली. या प्रकाराला प्रियंका आता वैतागून गेली होती. आपल्यामुळे आपल्या आईवडीलांच्या मनाला त्रास नको म्हणून जिव देण्याचे विचार तिच्या मनात येवू लागले. २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी तिला एकांत मिळाला. त्या दिवशी ती घरात एकटी होती. तिने छताला दोरीच्या मदतीने गळफास घेत आपली जीवनयात्रा संपवून टाकली. काही वेळाने हा प्रकार सर्वाच्या लक्षात आला. या घटनेची माहीती भोन येथील रहिवासी प्रियंकाची आत्या उषाबाई ठाकरे यांना समजली. तिने तात्काळ या घटनेची माहिती तिचे भाऊ श्रीकृष्ण फाळके यांना दिली. प्रियंकाने आत्महत्या केल्याची धक्कादायक माहिती मिळताच फाळके परिवार हादरला.त्यांनी तात्काळ निवडक नातेवाईकांसोबत काटेल गाठले. दरम्यान या घटनेची माहीती तामगाव पोलिस स्टेशनला समजली होती. पोलिसांनी पुढील कायदेशीर कारवाई सुरु केली होती. प्रियंकाचा मृतदेह शेगाव येथील सरकारी रुग्णालयात रवाना करण्यात आला होता. श्रीकृष्ण फाळके यांनी नातेवाईकांसोबत रुग्णालयात धाव घेतली. मुलगी प्रियंकाचा मृतदेह पाहताच त्यांनी हंबरडा फोडला. मुलीच्या गळ्यावर गळफासाचे व्रण त्यांना दिसून आले. तसेच तिच्या पाठीमागे जखमा व रक्त निघत असल्याचे देखील दिसून आले. तिच्या पोटावर व मांडीवर देखील व्रण दिसत होते. या घटनेप्रकरणी श्रीकृष्ण फाळके यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार तामगाव पोलिस स्टेशनला मयत प्रियंकाचा पती शत्रुघ्न वामनराव डामरे, वामनराव हरीराम डामरे, शिवाजी वामनराव डामरे, सौ केसरबाई वामनराव डामरे (सर्व रा.काटेल, ता. संग्रामपूर जिल्हा बुलढाणा) यांच्याविरुद्ध तामगाव पोलिस स्टेशनला भाग ५ गु.र.न. २८/२०२१ भा.द.वि. ३०६ ब, ४९८ अ, ३४ नुसार आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. सर्वांना अटक करण्यात आली. त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना सुरुवातीला तिन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. पुढील तपास तामगाव पोलिस करत आहेत.

शेतीच्या वादात रक्ताच्या नात्याचा...

दिवसापासून वाद सुरू होता. खरा वाद तर गोंविंद जगताप आणी बालीजी जगताप यांच्या दोघात होता. हा जुना वाद मिटवण्यासाठी गावातील प्रतिष्ठित लोकांनी बऱ्याच वेळेस प्रयत्न केले मात्र हे गावकऱ्यांना यश आले नाही. शेतीचा वाद मिटत नसल्याने जगताप कुटूबिय बऱ्याचदा पोलिस ठाण्यात गेले आसल्याचेही समोर येत आहे. बऱ्याच वेळी दोघांनाही समज देवून पोलिसांनी कारवाही केली आसल्याचे सांगण्यात येत आहे. जगताप कुटूंबात शेतीवरून वरंवार वाद होत आसल्याने व त्यांचा वाद मिटत नसल्याने त्यांच्याकडे कोणी मध्यस्थी करण्यास पुढे येत नव्हते. दरम्यान गुरुवार दिनांक ११ फेब्रुवारी २०२१ रोजी सकाळी गोविंद जगताप हे शेताकडे गेले असता त्यांचे बालाजी जगताप यांची मुलं अंकुश आणि लहू यांच्या सोबत शेतीवादावरून बाचाबाची झाली.बाचाबाचीचे रूपांतर मारहाणीत झाले. तेंव्हा बालाजी जगताप यांचे मुलं लहू आणि अंकुश यांनी गोविंद जगताप यांना जबर मारहाण केली. वयोवृध्द गोविंद यांना जबरी मार लागला. शेताशेजारी आसणाऱ्या शेतकऱ्यांनी संबंधीत मारहाणीची वार्ता गावात कळविली. ही माहिती मिळताच गोविंद जगताप यांचे घर जावई नितीन भास्कर पावडे (वय ३० वर्ष राहणार उमरदरा तालुका शिरूर आनंतपाळ जिल्हा लातूर) व गोविंद जगताप यांचा दोन नंबरचा भाऊ भगवान महादू जगताप हे दोघेजण शेताकडे आले. त्यांनी गोविंद जगताप यांना उचलून दुचाकीवर बसवत उपचारासाठी रुग्णालयाकडे घेऊन निघाली. ही माहिती मिळताच बालाजी जगताप आणी त्याचे मुल लहू आणी अंकुश यांनी गोविंद जगताप यांचे जावई नितीन भास्कर पावडे व भगवान जगताप यांना रस्त्यातच आडवले. दुचाकीला ढकलुन देत सोबत आणलेल्या कत्ती, कुऱ्हाड व तलावारी सारख्या धादार हत्याराने या तिघांवर हल्ला चढवला. दरम्यान या हल्लयात नितीन पावडे आणि भगवान जगताप हे धारातीर्थी पडले. जगताप कुटुंबात शेतीच्या वादातून जोरदार भांडण सुरू आसल्याची वार्ता गावभर पसरली. गावातील काही दक्ष नागरिकांनी पोलिसांना माहीती दिली. तसेच गावातील लोकांनी घटनास्थळावर येऊन गोविंद जगताप, भगवान जगताप व जावाई नितीन भास्कर पावडे या तिघांना उपचारासाठी हेर येथे प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. मात्र मार वर्मी लागल्यामुळे प्राथमिक उपचारानंतर त्यांना उदगीर उपजिल्हा रुग्णालयात पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले. उपचार सुरू असताना गोविंद जगताप यांची प्राणज्योत मावळली. तर जावाई नितीन पावडे याला लातूरला रेफर करण्यात आले. परंतु वाटेतच त्यांचा मृत्यू झाला. या हाल्यात गंभीर जखमी असलेल्या भगवान जगताप यांच्यावर सध्या उदगीर च्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेची माहीती मिळताच उदगीर ग्रामीए पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक दिपककुमार वाघमारे यांनी घटनास्थळी धाव घेवून घटनेचा आढाव घेतला. दरम्यान उदगीर शहर उपविभागीय पोलिस अधिकारी डॅनियल बेन यांनी घटनास्थी भेट देवून पोलिस कर्मचार व अधिकाऱ्यांना योग्य त्या सुचना केल्या. दरम्यान हेर गावात तनावेचे वातावरण निर्माण झाल्याने पोलिस बदोबस्त लावण्यात आला. गोविंद जगताप यांचे हेर येथे शेतात तर जावाई नितीन तावडे यांच्यावर त्यांच्या गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान हेर गावातील माजी पोलिस पाटील पंडीतराव यांच्यामुळे जगताप कुटूबियांच्यात शेतीवरून वारंवार भाडणे होत आसल्याचा आरोप यावेळी मयत नातेवाईकांनी केला.याप्रकरणी जनाबाई बाळासाहेब बिराजदार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपी बालाजी महादु जगताप, लहू बालाजी जगताप, अंकुश बालाजी जगताप, फुलाबाई बालाजी जगताप, सरोजा बाई विशंभर ढगे, पूजा बालाजी जगताप, अश्विनी जगताप आणी माजी पोलिस पाटील पंडित बाबुराव पाटील यांच्याविरुद्ध गुरनं ६३/२०२१ कलम ३०२, ३०७, ३४१, ३२३, ५०४, १४३, १४७, १४८, १४९. कलम २५ (चार) शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक दिपककुमार वाघमारे करीत आहेत.

पत्नीला यारा सोबत बघून ...

ती दिसायला देखणी सुंदर होती वयाच्या ३५शीतील तिची जवानी ही अनेकांना भुरळ घालत होती. ती जशी दिसायला सुंदर होती. तशीच ती चंचल ही होती. अलिकडच्या काही दिवासात तिच्या वागण्या बोलण्यात आणि राहणीमानात बराच फरक पडलेला होता. ही गोष्ट दिलीपच्या नजरेतून सुटली नव्हती. तो आपल्या पत्नीकडे संशयाच्या नजरेतून पाहत होता. त्याला ही बाहेरून आपल्या पत्नीचे गावातीलच पांडू श्रावणे या तरूणाबरोबर असल्याचे समजले होते. तो त्या दोघांच्यावर लक्ष ठेवून होता. त्यातच ते दोघे दिलीप घरी नसताना नको त्या अवस्थेत त्याला दिसले आणि त्यातूनच त्याने त्यावेळी रागाच्या भरात जवळच पडलेली कुऱ्हाड घेतली आणि दोघांच्या डोक्यात घालून दुहेरी हत्या केली. दिलीप ठाकूर हा मोलमजुरी करून आपल्या कुंटूंबाचा उदरनिर्वाह करीत होता. तो तसा प्रामाणिक असल्याने आजूबाजूच्या परिसरात त्याला काम मिळत होते. त्याची पत्नी संगिता ही गावातच मोलमजुरीसाठी जात होती. त्यातच तिचे गावातील पांडू श्रावणे नावाच्या तरूणासोबत सुत जुळले होते. अलिकडे ती त्याच्याबरोबर आपल्या मोबाईलवरून सारखी बोलत होती. तर घरी दिलीप नसताना त्याला भेटायला ही जात होती. विवाहबाहय संबंध हे किती ही झाकले तरी ते एक ना एक दिवस उजेडात येत असतात. तसेच संगिताच्या आणि पांडूच्या संबंधाबाबत झाले होते. सुरूवातील ती त्याला चोरून भेटत असल्याने त्याचे संबंध हे झाकले गेले होते. परंतू अलिकडे दिलीप घरी नसताना ही तो येत होता. आणि तो आल्यावर संगिताच्या घरचा दरवाजा बंद होत होता. ही गोष्ट शेजारांच्या नजरेतून सुटलेली नव्हती. त्यामुळे त्या दोघांच्या संबंधाची चर्चा ही दबक्या आवाजात सुरू होती. कोबंडे किती ही झाकले तरी ते आरवायचे राहत नाही. त्याप्रमाणे त्या दोघांच्या संबंधाची चर्चा ही गावात होऊ लागली होती. ही चर्चा दिलीप याच्या कानावर ही आली होती. तो त्या दोघांच्यावर नजर ठेवून होता. परंतू ते दोघे त्याला सापडत नव्हते. सकाळी लवकर कामावर गेला की रात्री उशिराच तो घरी परतत होता. त्यामुळे संगिताचे फावत होते. आपली पत्नी दुसऱ्या परपुरूषाला चिकटली आहे. तिचे त्याच्याबरोबर संबंध आहेत हे समजाताच त्याने याचा जाब पत्नी संगिताला विचारला होता. पण त्यावेळी ती आपल्या कानावर हात ठेवून आपल्या दोन मुलांची आन घेऊन मी त्यातली नाही हो म्हणत या वादावर तिने आपल्या परीने पडदा टाकण्याचा प्रयत्न केलेला होता. दिलीप हा आपल्या दोन मुलांच्याकडे बघून त्याने तिच्यावर विश्वास ठेवलेला होता. परंतु चंचल आणि चालू स्वभावाची संगिता ही नवऱ्याला ही भीक घालत नव्हती. ती त्या संबंधात वाहवत चालली होती.तिला त्या कामात आपल्या नवऱ्यापेक्षा पांडूच भारी वाटत असल्याने त्याच्याकडून ते सुख ओरबाडून घ्यायला ती सारखी उतावीळ झालेली असायची. दिलीपने आपल्या वयाची ४५ शी पार केलेली होती. दिवसभर तो थकून भागून काम करून आल्यावर तो लगेच आपल्या बेडवर झोपत होता.त्याच्या पेक्षा संगिता ही १२ वर्षानी लहान असल्याने त्या संबंधाला ती आसुसलेली होती. परंतू त्या संबंधात नवरा असूनही तिला पाहिजे तसे सुख देण्यास दिलीप असमर्थ ठरत होता. त्यातच तिची सळसळती जवानी आणि कमसीन बांधा बघून अनेकजण घायाळ होत होते. ती कामावर जात असलेल्या ठिकाणी गावातीलच पांडू श्रावणे हा ही येत होता. तो तिच्या सौदर्यावर भाळला असल्याने तिला तो लाडी गोडी लावून बोलत होता. बोलता बोलता ती ही त्याला आपल्या ढेरदार वक्षांचे आणि गोऱ्यापान मांडयाचे दर्शन घडवित असल्याने तो जीभल्याच चाटत होता. तो तिला वहिनी वहिनी म्हणत लाडी गोडी लावत असताना तिच्या अंगचटीला ही जात होता.तिने ही त्याच्या मनातील ओळखले असल्याने ती ही त्याला भावोजी म्हणून बोलवत होती. त्यातूनच त्या दोघांचे संबंध हे वाढीस लागलेले होते. त्याला तर कधी एकदा हिला आपल्या अंगाखाली घेतो असे झाले होते. तो तिला मुद्दामच घरी जेवायला बोलवा असे म्हणत होता. त्यावेळी तिने त्याला सुचक बोलत भावोजी तुम्ही सांगाल त्यावेळी दोन्ही जेवण करायला या असे खुले आमत्रंणच दिले होते. त्यामुळे तो सुखावून गेला होता.संधी साधून तो दिलीप नसताना तिच्या घरी गेला असता त्याने तिला आपल्या अंगाखाली घेऊन असे काही ओरबाडून काढले की ती त्याला परत परत त्या कामासाठी त्याला बोलावू लागली. त्याला ही तेच पाहिजे असल्याने तो तिची कमसीन जवानी ओरबाडयला येत होता. अलिकडे तर त्या दोघांच्या इष्काचा खेळ तिच्या घरातच रंगत होता.दिलीप कामावर गेला की पांडू दुपारच्यावेळी तिच्या घरात येत होता. तो ज्या दिवसी येणार आहे त्यादिवसी संगिता ही काही तरी कामाचे निमित्य काढून घरीच राहत होती.आठवडयातून दोन तीन वेळा तसे होत होते. पांडू घरात आला की तिच्या घराचा दरवाजा हा आपोआप बंद होत होता.तो तिच्या नागडया देहावर पडून तिची जवानी ओरबाडत असल्याने आणि तिला पाहिजे तसे सुख देत असल्याने ती ही त्याला आपल्या अंगावर ओढून घेत होती. त्या दोघांच्या संबंधाची चर्चा ही दिलीपच्या कनावर आल्याने त्या दोघांना रंगेहात पकडण्याचे त्याने ठरविले होते. तो त्या दोघांच्या पाळतीवरच होता. शेजारील लोकांनी ही त्याला पांडू कधी येतो आणि जातो याची माहिती त्याला दिलेली होती. म्हणून तो त्या दोघांना रंगेहात पकडण्यासाठी म्हणून दबा धरून बसलेला होता. नेहमी प्रमाणे तो रविवार दि.७ फेब्रुवारी २०२१ रोजी कामावर सकाळीच गेला होता.पण त्याच्या मनात आज वेगळाच विचार सुरू होते. पत्नीच्या अनैतिक संबंधाने तो अगोदरच त्रस्त झालेला होता. त्यातच त्याने पत्नीला ही याबाबत समजावून सांगून बघितले होते. परंतू त्याच्या सांगण्याचा तिच्यावर काहीच परिणाम झाला नव्हता. उलट आलिकडे तिच त्याला तुझ्यात दम नाही, तू मला सुख देत नाहीस म्हणून भांडण काढीत होता. पत्नीच्या स्वैर वागण्याने गावात त्याची अब्रु गेलेली होती. त्यातच गावातील जो तो त्याच्याकडे वेगळ्या नजरेने पाहत होता. म्हणून त्याला ही या गोष्टीचा कधी एकदा सोक्षमोक्ष लावतो असे झाले होते.या विचारानीच त्याचे डोके भणभणले होते. मागे एकदा त्याने पांडूला ही समजावून सांगून आपल्या पत्नीचा नाद सोड नाही तर त्याचे परिणाम गंभीर होतील अशी धमकी दिलेली होती. परंतू त्याला ही संगिताकडून पाहिजे तसे सुख भेटत असल्याने तो ही तिला सोडायला तयार नव्हता. पांडू ही सांगून ऐकत नाही आणि पत्नी संगिता ही त्याच्या नादाला लागून भरकटत चालली आहे हे बघून त्याचे डोके बधीर झाले होते. त्याला यातून काही तरी मार्ग काढायचा होता. परंतू नियतीला ते मान्य नव्हते. अगोदरच त्याचा स्वभाव हा तापट आणि रागीट होता.त्याला काय करावे आणि काय नको असे झाले होते.आज त्याचे कामात ही लक्ष लागत नव्हते, म्हणून तो दुपारीच कामावरून घरी परत येण्याचे ठरविले होते. त्यातच संगिताने आजच गुपचुपपणे पांडूला घरी बोलावले होते. तो ही तिने बोलवले म्हणून आला होता. नेहमी प्रमाणे तो आल्यावर तिने आपल्या घराचा दरवाजा आज नुसाताच पुढे केलेला होता. आज तिला पांडू कडून पाहिजे तसे सुख घ्यायचे असल्याने भावनेच्या भरात तिने दरवाज्याला कडी लावलेली नव्हती.नुसताच दरवाजा पुढे केला होता.घरातील बेडवर त्या दोघांचा खेळ सुरू झाला होता. नेहमीप्रमाणे पांडू तिच्या नग्न देहावर तुटून पडला होता.तो तिच्या ढेरदार वक्षाची चव चाखत असताना ती ही त्याला आपल्या अंगावर ओढून घेत होती. ते दोघे ही निर्वस्त्र होते. तो तिच्या शरीराला खालून वरून रगडत होता. त्याच्या दमदार रगडण्यांनी ती ही तृप्त होत असताना ती उसासे घेत होती एवढयात अचानक पणे घराचा दरवाजा बाजुला करून दिलीप आत आला होता.तो समोर आल्याचे ही त्या दोघांना भान नव्हते. त्याचा तो कार्यक्रम ऐन रंगात आला होता. तो तिच्या नागडया अंगावर पडून जोर जोरात धक्के मारत होता. ते दोघेही स्वर्गसुखात रममाण होते.त्यांना कशाची फिकीर नव्हती. आपल्या पत्नीला परपुरूषाच्या अंगाखाली बघून त्याचे टाळकेच सटकले होते. तो त्या दोघांच्यावर ओरडत असताना ते दोघे ही भानावर आले.कसे बसे त्यांनी आपआपले कपडे घातले.त्या दोघांच्या वर तो चिडला असल्याने त्याच्या रागाचा पारा चढला होता. तो त्या दोघांच्या अंगावर त्याना मारण्यासाठी जात असताना ते दोघे त्यालाच बाजूला ढकलत होते. त्यादोघांची भांडाफोड झाल्याने ते दोघे त्याचीच गेम करण्याच्या विचारात होते. त्यावेळी सावध असलेल्या दिलीपने बाजूलाच पडलेली कुऱ्हाड उचलली आणि अगोदर पांडूच्या डोक्यात घातली तर त्याच कुऱ्हाडीचे वार करीत त्याने पत्नी संगिताच्या डोक्यात कुऱ्हाडीचे घाव घातले. त्यासरशी एका पाठोपाठ ते दोघे ही त्याच्याच घरात जमीनीवर रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. जागीच दोघांचा मृत्यू झाला होता. दुपारच्या वेळेस घडलेल्या या घटनेने दिलीपचे शेजारी ही घावतच त्याच्या घराकडे आले होते. दिलीपच्या हातात रक्ताने माखलेली कुऱ्हाड होती. तर बाजुलाच संगिताचा आणि पांडूचा रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह पडलेला होता. हे बघून एका दक्ष नागरीकाने या घटनेची माहिती सफाळे पोलीस स्टेशनला दिली. ही दुहेरी खूनाची माहिती मिळताच पोलीस ही तातडीने घटनास्थळी आले होते. पोलीसांनी घटना स्थळाचा पंचनामा करून दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी पालघर येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला.

पोलीसांनी दिलीप ठाकूर याला ताब्यात घेऊन सफाळे पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करीत आपल्या पत्नीचे आणि गावातील पांडू श्रावणे या दोघांचे अैनतिक संबंध असल्याचे सांगून घटनेच्या दिवशी या दोघांना आपल्याच घरी नको त्या अवस्थेत पाहिल्याने त्या दोघांची हत्या केल्याचे पोलीसांना सांगितले. पोलीसांनी त्याला रितसर अटक करून ताब्यात घेतले. संगिता दिलीप ठाकूर (वय३५) आणि पांडू श्रावणे (वय ४०) याच्या दुहेरी हत्येप्रकरणी दिलीप ठाकूर (वय ४७) याच्या विरोधात सफाळे पोलीस ठाण्यात भा.दं.वी.कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करून त्याला पालघर येथील न्यायालयात हजर केले असता. मा.न्यायालयाने त्याला १० फेब्रुवारी पर्यतची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली कुऱ्हाड जप्त केली आहे. सदर घटनेचा पुढील तपास सफाळे पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत.

नियतीने प्रेमाचा भयंकर शेवट ...

विजयवर दुसरा आघात झाला. त्याच्या प्रियेसीने आता त्याच्या बरोबर लग्न करण्यास स्पष्ट नकार दिला. यामुळे विजय पार कोसळून गेला.त्याला जगण असह्य वाटू लागले होते. त्यात आपली प्रियेसीने आयत्या वेळी माघार का घेतली. ? हा प्रश्न त्याला सतावत होता. तिला दुसरा कुणी मिळाला का? असा त्याच्या मनात विचार आला. या विचारात त्याला दारूचे व्यसन लागले. दारूच्या आहारी गेला होता. दारूच्या नशेत विजय प्रियेसीला त्रास देत होता. या त्रासाला कंटाळून तिने एकदा स्वतःला संपवण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी तरूणी आठवडाभर रूग्णालयात उपचार घेत होती. तरीही त्याच्या मनात प्रियेसीबद्दल प्रचंड राग कायम होता. त्याने प्रचंड क्रोधीत होऊन त्याने आपल्या प्रियसीला जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला. पण यात त्याचाच बळी गेला. प्रियेसी रूग्णालयातून घरी आली होती. विजय तिची विचारपूस करण्याच्या बहाण्याने तिच्या घरी आला. त्याने येताना ऐका बाटलीत पेट्रोल भरून आणले होते. त्याने तिला पुन्हा एकदा लग्नाबद्दल विचारले. परंतु तेंव्हा हि तिने विजयला नकार देत त्याची कान उघाडणी केली. तेंव्हा वियजच्या रागाचा पारा अधिकच चढला तेंव्हा त्याने बोलता बोलता प्रियेसीवर पेट्रोल ओतून तिला पेटवून दिले.तीच्या शरीराने पेट घेतल्यानंतर ती आपला जीव वाचवण्यासाठी घराबाहेर पडण्याचा प्रयत्न करू लागताच विजयने दरवाजा बंद करून तिचा रस्ता अडवला. तेंव्हा तिने विजयलाच घट्ट मिठी मारली. यात दोघेही ९० टक्के भाजून गंभीर जखमी झाले होते. यानंतर शेजारी जमा झाले. त्यांनी विजय व त्याच्या प्रियेसीला तातडीने सरकारी रूग्णालयात हलवले. मात्र तेथे विजयची प्राणजोत मावळली. त्याची प्रियेसी मृत्यूशी झुंज देत आहे.

भयानक कृत्य करताना काहीच ...

पोटच्या मुलीचा खून करून आरोपीने बिहार गाठण्याचा प्रयत्न केला होता. परंतू खोपोली पोलीसांनी बिहार रेल्वे स्थानकावरच आरोपीच्या मुसक्या आवळल्या. या खूणाचा खटनाक्रम सांगताना खोपोली पोलीसांनी सांगितले कि आरोपीच्या वेळीच मुसक्या आवळल्या नसत्या तर या गुन्ह्याची उकल होण्यास खूप विलंब लागला असता. खोपोली पोलीसांनी खूनाचा गुन्हा दाखल केल्यानंतर २४ तासात आरोपी बापाला पोलीस कोठडीत टाकले. स्वतःच्या मुलीचे मुंडकं छाटून फरार झालेल्या पित्याला खोपोली पोलीसांनी बिहारमध्ये जावून बेड्या ठोकल्या आहेत. खोपोलीत या निर्दयी बापाने हत्या केली होती. अजय सुदर्शन सिंह असे त्याचे नाव आहे. अजय सुदर्शन सिंह हा त्याची पत्नी आणि दोन मुलीसह चार दिवसापूर्वी खोपोली शहरातील एका लॉजवर राहत होते. शुक्रवारी पहाटे पाच वाजता अजयने पत्नीला मुलाचा भूत उतरविण्याच्या बहाणा सांगत मुलींना खालापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील हाळ गावानजीक म्हाडा कॉलनीच्या मागे घेवून गेला. यादरम्यान त्यांनी १४ वर्षीय खुशीला चाकूने भोसकून तिचे शीर धडावेगळे करून पाताळगंगा नदीत फेकून घटनास्थळावरून फरार झाला. या घटनेने हादरुन गेलेली खुशीच्या आईने दुसऱ्या मुलीसह घटनास्थळावरून पळ काढत खोपोली पोलीस स्टेशन गाठले. दुसरीकडे हत्या करून अजयने मुळगाव बिहारकडे जात असल्याचा ट्रेस खोपोली पोलिसांना लागला. त्यामुळे पोलीसांचे एक पथक विमानाने बिहारला पोहचले. तेथील स्थानिक रेल्वे पोलीसांच्या मददतीने रेल्वस्थानकावरच अजयला ताब्यात घेतले. अवघ्या २४ तासात खोपोली पोलिसांनी आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. खालापूर पोलिस उपविभाग पोलिस अधिकारी संजय शुक्ला, खोपोली पोलिस निरिक्षक धनाजी क्षिरसागर, खालापूर पोलिस निरिक्षक अनिल विभुते यांच्या मार्गदर्शनाखाली खोपोली पोलिस ठाण्याचे उपपोलिस निरिक्षक अमोल वळसंग, पोलिस अंमलदार प्रदीप खरात, प्रविण भालेराव यांनी ही कौतुकास्पद कारवाई केली.

15 TO 21 FEB 2021 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 13/02/2021 9:07 PM Page 1

थोडक्यात वृत्तांत

देवणीत निवडणुकीच्या संदर्भात राष्ट्रवादीची बैठक

देवणी : देवणी नगरपंचायत निवडणुकीच्या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची बैठक दि.१५/२/२०२१ वार सोमवारी आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस प्रा. श्याम ढवळे तसेच मूर्तजा खान पठाण हे उपस्थित राहणार आहेत. ही बैठक देवणी येथील मार्केट कमिटी सभागृह अडत लाईन येथे ठीक ४ वाजता सायंकाळी आयोजित करण्यात आली आहे. तरी या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने होऊ घातलेल्या नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत तरी इच्छुकांनी उपस्थित राहून मुलाखत द्यावी. तसेच या बैठकीमध्ये देवणी तालुक्यातील नवनीर्वाचीत ग्रामपंचायतीत निवडून आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सरपंच, उपसरपंच व सदस्यांचा सत्कार करण्यात येणार आसल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे देवणी तालुकाध्यक्ष प्रा.अनिल इंगोले यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

भिवंडी मनपाचे उद्यान अधीक्षक निलंबित

भिवंडी : भिवंडी मनपाच्या उद्यान विभागात कर्तव्यावर असलेले उद्यान अधीक्षक निलेश संखे यांना कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठवून मनपाचे मुख्यालय उपायुक्त डॉ दीपक सावंत यांनी गुरुवारी निलंबित केले आहे. निलेश संख्ये यांनी उद्यान विभागात उद्यान अधीक्षक या पदावर कार्यरत असतांना केंद्र शासनाच्या अमृत योजने अंतर्गत मनपाच्या उद्यान विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या हरितपट्टा वनीकरण प्रकल्पामध्ये उद्यान विभागाने जाहीर केलेल्या अहवालातील कामांचा व प्रत्येक्ष झालेले काम यांमध्ये मोठी तफावत आढळली असतानां त्यानं मनपा प्रशासनाने करणे दाखवा नोटीस बजावली होती . या नोटीसचे समाधानकारक उत्तर संखे यांनी दिले नसल्याने मुख्यालय उपायुक्त द सावंत यांनी गुरुवारी त्यांना तडकाफडकी निलंबित केले आहे . उद्यान अधीक्षकांच्या निलंबनाच्या कारवाईने पालिका वर्तुळात एकच खळबळ उडाली असून कर्तव्यात कसूर करणारे इतरही अधिकारी व कर्मचारी निलंबनाच्या वाटेवर असल्याने भ्रष्टाचारी अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी धावपळ उडाली आहे.

क्षयरुग्णांची नोंद शासनाकडे करणे बंधनकारक

लातूर : इ.स. २०२५पर्यंत आपला देश क्षयरोग मुक्त करावयाचा आहे. त्यामुळे भारत सरकारने क्षयरोगास गंभीर धोकादाय यादीमध्ये घेवून सर्व खाजगी वैद्यकीय व्यवसायीक पॅथॉलॉजी लॅब, रेडीऑलॉजीस्ट व औषध विक्रेते यांना त्यांच्याकडे निदान झालेल्या क्षयरुग्णांची नोंद (Notifed) शासनाकडे करणे बंधनकारक करण्यात आले असल्याचे जिल्हा क्षय रोग अधिकारी, लातूर यांनी कळविले आहे. निदान झालेल्या क्षयरुग्णांची नोंद न झाल्यास इंडियन पिन कोड (४५/१८६०) अन्वये पूढील कलमांनुसार कार्यवाही होऊ शकते.कलम २६९ अन्वये निष्काळजीपणे जिवीतास हानी पोहचविणाऱ्या रोगाचा फैलाव होणे-६ महिने कारावास, दंड व दोन्ही शिक्षा होऊ शकते.कलम २७० अन्वये घातक कृत्यामुळे जिवीतास हानी पोहचणाऱ्या रोगाचा फैलाव करणे- १ वर्ष कारावास, दंड व दोन्ही शिक्षा होऊ शकते. भारत सरकारच्या अधिसुचनेच्या अनुषंगाने आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका, लातूर शहरातील सर्व खाजगी वैद्यकीय व्यवसायीक, पॅथॉलॉजी लॅब, रेडीऑलॉजीस्ट व औषध विक्रेते यांनी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाचे उदिष्ट साध्य करण्यासाठी व आपले लातूर शहर क्षयरोग मुक्त् (TB Free) करण्यासाठी आपणाकडे नवीन निदान झालेल्या सर्व क्षयरुग्णांची माहिती तात्काळ जिल्हा क्षयरोग अधिकारी व जिल्हा पीपीएम समन्वयक यांच्या ई-मेल वर प्रतिमाह कळविण्यात यावी.

रेशिम उद्योगाचे ऑनलाईन अर्ज करावेत

लातूर : कृषि विभागा अंतर्गत महाराष्ट्र शासन व जागतिक बँक सहाय्यीत नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प लातूर जिल्हयामधील २८२ गावा मध्ये राबविला जात असून हवामान बदलामुळे उदभवलेल्या परिस्थितीशी जूळवून घेण्यास शेतकऱ्यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने रेशिम उद्योगाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी या घटकाचा समावेश नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पात करण्यात आला आहे. या योजनेची उदिष्टे पूढील प्रमाणे आहेत : रेशिम उद्योगाच्या माध्यमातून प्रकल्पांतर्गत समाविष्ट गाव समूहातील शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्नाचे साधन निर्माण करुन उत्पन्नात वाढ करणे. रेशिम उद्योगाचा समुह आधारित सर्वांगीन विकास करणे. तुती उत्पादन व रेशिम उद्योगात महिलांचा सहभाग वाढवणे. नाविण्यपुर्ण रेशिम तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे. अर्थसहाय्य- रेशिम उद्योग व घटकासाठी सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थी यांना ७५ टक्के व अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांना ९० अनुदान देय आहे. जिल्हयातील इच्छुक शेतकरी यांनी जपश्रळपश अर्ज https://mahapocra.gov.in या वेबसाईड सादर करावेत असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी डी.एस.गावासणे यांनी केले आहे.

वसतिगृह सुरु करण्यासाठी अभाविपचे उप जिल्हाधिकाऱ्यांना साकडे

लातूर : अखिल भारतीय विद्यार्थी परिषद लातूर शाखेतर्फे वसतिगृह सुरु करण्याबाबत उप जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. कोरोना काळात संपूर्ण भारताने अत्यंत यशस्वी पणे लढा देऊन जगाचे नेतृत्व केले आहे. पण आता परिस्थिती पुर्वरत येत आहे. शासनाने आतापर्यंत भरपूर क्षेत्र उघडले आहेत आणि आता शिक्षण क्षेत्रात ही पाचवी ते बारावी पर्यंतचे वर्ग तसेच अन्य व्यावसायिक अभ्यासक्रम देखील सुरु करण्यास सूचना दिल्या आहेत. तसेच लवकरच १५ फेब्रुवारीपासून अन्य उर्वरित शिक्षण क्षेत्र देखील खुले होणार आहेत. एकीकडे शाळा, महाविद्यालये सुरु झाले आहेत पण वसतिगृह आणखीन सुरु झाले नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांना अन्य गावातून येण्यासाठी, शहरात राहण्यासाठी व भोजनासाठी अमाप खर्च येत आहे. हा खर्च प्रत्येक विद्यार्थ्यांना परवडेलच असा नाही. म्हणून शासनाने वसतिगृह सुरु करावेत अशी मागणी अभाविप करत आहे., त्याचबरोबर ज्या वसतिगृहात कोव्हिड विलागिकरण केंद्र होते असे वसतिगृह निर्जंतुक करावे. यावेळी जिल्हा संयोजक पवन बेळकोने, महानगर मंत्री प्राजक्ता भोसले, महानगर सहमंत्री विश्र्वजीत पाटील, पश्र्चिम नगर सहमंत्री ऐश्वर्या पाटील, सुयश भंडारे, धीरज गंगथडे, सूरज रसाळ व सूरज जेवरे उपस्थित होते.

तिजोरी उघडेना म्हणून चोरट्यांनी तिजोरीच नेली पळवून पण पोलिसांना काही तासांतच मुद्देमालासह आलेत मिळून

उल्हासनगर/प्रतिनिधी

कुरियर कंपनीमध्ये चोरी करण्यासाठी आलेल्या चोरट्यांना डिजिटल तिजोरी उघडता आली नाही. त्यामुळे चोरट्यांनी २ लाख ४५ हजार रुपये ठेवलेली ही तिजोरीच चोरून नेल्याची घटना बदलापुरात घडली होती. मात्र पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत अवघ्या काही तासांतच या चोरट्यांपैकी दोघांची धरपकड केली आहे, तर त्यांच्या फरार असलेल्या तीन साथीदारांचा पोलीस कसून शोध घेत आहेत.

बदलापूर पश्चिम भागात बेलवली येथील फातिमा शाळेजवळ कृष्णा हेवन या बिल्डिंगमध्ये डिलिव्हरी प्रायव्हेट लिमीटेड कुरीयर कंपनी असुन कंपनीचे गोडाऊन आणि कार्यालय तेथेच आहे. या कुरीयर कंपनी मार्फत ऑनलाईन खरेदी केलेल्या मालाचे वितरण होऊन, जमा झालेली रक्कम कुरीयर कंपनीच्या कार्यालयातील तिजोरीत जमा होत असे. गुरुवारी या कार्यालयातील गोदरेज कंपनीची लोखंडी मॅट्रिक्स तिजोरी व सीसीटीव्ही फुटेज रेकॉर्ड होणारा डिव्हीआर अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला. त्यामुळे बदलापूरात एकच खळबळ उडाली होती. मात्र पोलिसांनी गुन्ह्याचा सर्व बाजूंनी तपास सुरू केला. त्याअंतर्गत वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्ता गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि.सागर ढिकले, पो.हवा सुरंजे, पादीर, पो.ना.जयेश गुरव, पो.शि. गणेश भारती, विपुल पाटील, नितिन पादीर व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अंमलदार यांनी चोरट्यांच्या येण्या जाण्याच्या मार्गावरील व आसपासच्या सीसीटीव्ही फुटेज तपासले. गुप्त बातमीदारा मार्फत चोरट्यांची माहिती मिळवत अवघ्या ४ तासात ५ आरोपी निष्पन्न केले. आणि चोरट्यांनी चोरलेल्या तिजोरीची विल्हेवाट लावण्याआधीच चोरट्यांपैकी अजय सुर्यवंशी (२८) व राज उर्फ विशाल मालाकार (२०) या दोघांची धरपकड केली. अजय हा या कार्यालयात डिलिव्हरी बॉय म्हणून काम करीत होता. त्यानेच त्याच्या इतर साथीदारांना कार्यालयातील तिजोरी व सीसीटीव्ही कॅमेऱ्यांबाबत माहिती देऊन चोरीचे पूर्ण प्लॅनिंग केले असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. जिला उर्फ जीलाजित दुबे व इतर दोघांचा पोलीस कसून शोध घेत आहेत. जिला हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरोधात वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात घरफोडीचे अनेक गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. चोरट्यांनी सीसीटीव्हीचे डिव्हीआर मशीन चोरून नेल्याने चोरट्यांबाबत काहीही धागेदोरे पोलिसांच्या हाती नव्हते. मात्र तरीही शिताफीने तपास करून अवघ्या काही तासातच गुन्ह्याचा छडा लावून मुख्य सुत्रधारासह दोघांना गजाआड केल्याने बदलापूर पश्चिम पोलिसांचे कौतुक होत आहे.

देवणी तालुक्यातील सहा गावच्या ग्राम पंचायतीवर सरपंच,उपसरपंच विराजमान

देवणी/प्रतिनिधी

देवणी तालुक्यातील सहा ग्रामपंचायतच्या सरपंच, उपसरपंच पदाच्या निवडीचा कार्यक्रम गुरुवारी झालेल्या ग्रामपंचायतच्या विशेष बैठकीत पार पडला असून तालुक्यातील सहा ग्रामपंचायतीवर सरपंच उपसरपंच विराजमान झाले आहेत. यावेळी निवड झालेल्या नुतन सरपंच उपसरपंचाचा ग्रामपंचायतच्या वतीने सत्कार करण्यात आला.

अचवला : ग्रामपंचायतच्या सरपंचपदी सुरेखा संभाजी पवार तर उपसरपंचपदी नामदेव मुरलीधर कारभारी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. कमरोद्दीनपुर : सरपंचपदी सुमनबाई बब्रुवान काळे तर उपसरपंचपदी राजकुमार हासनाबादे यांची निवड करण्यात आली. नागराळ: ग्रामपंचायत च्या सरपंचपदी विष्णु प्रभाकर ऐनिले तर उपसरपंचपदी रतन वीरकुमार पाटील नागराळकर यांची निवड करण्यात आली. माणकी : ग्रामपंचायतच्या सरपंचपदी रामजी बापु जाधव तर उपसरपंचपदी संजीवकुमार आनंद बिरादार यांची निवड झाली. आनंदवाडी : ग्रामपंचायतच्या सरपंचपदी सत्यवती माधव बिरादार तर उपसरपंचपदी वसंत प्रभाकर गायकवाड यांची निवड झाली. वागदरी : ग्रामपंचायतच्या सरपंचपदी उषा नागनाथ होळसंबरे तर उपसरपंचपदी सुरज राजकुमार बिरादार यांची निवड करण्यात आली. त्या त्या गावचे अध्यासी अधिकारी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीस तलाठी, ग्रामसेवक यांनी निवड प्रक्रियेसाठी सहकार्य केले. नुतन सरपंच, उपसरपंच व सदस्याचा ग्रामपंचायत व ग्रामस्थानी सत्कार केला.

शिव जयंतीनिमित्त भव्य टेनिस बॉल क्रीकेट स्पर्धा

लातूर/करकरे अंबादास

लातुर ता. गंगापुर येथे खेळल्या जात असलेल्या भव्य टॅनिस बॉल क्रीकेट स्पधेचे उद्घाटन भा ज पा छत्रपती संभाजीराजे मंडल अध्यक्ष जोतीरामजी चिवडे (पाटील) यांच्या हस्ते करण्यात आले या स्पधेमध्ये एकुन ४० संघाने आपला सहभाग नोंदवला असुन यात कांही उत्कृष्ठ संघाचा देखील सहभाग आहे त्यामुळे हे सामने अत्यंत चुरशिचे होणार यात शंका नाही या सामन्यासाठी रोयल क्रीकेट क्लब गंगापुर च्या वतीने प्रथम पारीतोषक ११००० व भा ज पा अध्यक्ष जोतीराम चिवडे (पाटील) यांच्या वतीने ७००० दुसरे पारीतोषक असे ह्या क्रीकेटचे सामन्याचे वैशीष्टे आहे यासाठी मुख्य संयोजक म्हणुन ईश्वर धोत्रे, अमोल पवार, अजय गायकवाड, भरत गायकवाड, अजरोदीन शेख, हे काम पाहत आहेत या उद्घाटन सोहळ्यासाठी जोतीराम चिवडे (पाटील) यांचे सह योगेश फुटाणे, तुळशिदास चिवडे, मनोज गिरी, सुरज साळुंके, अतुल वलसे, दत्ता साळुंके, महाविर परदेशी यांचे सह क्रीकेट प्रेमी मोठया संख्येने उपस्थीत होते.

माझी वसुंधरा अभियाननिमित्त वाड्यात सायकल रॅली

वाडा/प्रतिनिधी

वाडा नगरपंचायतीच्या वतीने शनिवारी (दि.१३) सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत वाड्यातील तरुणांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला होता. झाडे लावा, झाडे जगवा, प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर टाळा, पर्यावरणाचे संरक्षण करा असा संदेश देत वाड्यातून सायकल रॅली काढण्यात आली. खंडेश्वरी नाका येथे नगराध्यक्षा गीतांजली कोलेकर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीची सुरुवात करण्यात आली या प्रसंगी उपनगराध्यक्षा वर्षा गोळे, नगरसेवक रामचंद्र जाधव, वैभव भोपतराव, भारती पाटील यांच्यासह नगरपंचायतीचे कर्मचारी उपस्थित होते. ही रॅली खंडेश्वरी नाका ते पंचायत समिती कार्यालय, आगरआळी, संजय गांधी नगर, तळ्याचा पाडा, परळी नाका, मशीद नाका या मार्गाने नेऊन नगरपंचायत कार्यालय येथे सांगता करण्यात आली. या प्रसंगी रॅलीत सहभाग घेतलेल्या तरुणांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

३२वे रस्ता सुरक्षा अभियान २०२१ मीरा भाईंदर - वसई विरार पोलीस आयुक्तालय वाहतूक शाखा वसई - विरार येथे तनाव मुक्ति व व्यक्तिमत्व विकास शिबिर संम्मोहन तज्ञ व काऊंसलर यांचे डॉ. शशिकांत बामणे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी वाहतूक शाखेचे पोलिस अधीक्षक शेखर डोम्बे, विलास सुपे व विनोद जाधव शिबिराला उपस्थित होते.

गोडावून फोडून लाखोंची विदेशी दारू पळविली

देवणी/प्रतिनिधी

देवणी तालुक्यातील मोघा शिवारातील रानमाळ धाब्याच्या पाठीमागील गोडाऊन मधून ९८ हजार रुपये किमतीची विदेशी दारू पळविल्या प्रकरणी देवणी पोलीस ठाण्यात सोमवार दि.८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास आज्ञात व्यक्तीवर गुन्हा नोंद झाला आहे. याबाबत देवणी पोलीसांच्या वतीने मिळालेली अधिक माहिती अशी की, मोघा शिवारातील रानमाळ धाब्याच्या पाठीमागील गोडाऊन मधून दि.७ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री आज्ञात आरोपीने विदेशी दारू इंम्पेरियल ब्लु ११ बॉक्स ज्याची किमत ६८ हजार रुपये, व रॉयल स्टॅगचे २ बॉक्स ज्याची किमत १५ हजार रुपये व मॅक डॉवेल्स विस्कीचे ३ बॉक्स ज्याची किमत १५ हजार रुपये असे एकुण ९८ हजार रुपये किमतीची विदेशी दारू आज्ञात चोरट्यांनी पळविल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी संगमेश्वर गुणवंतराव पाटील राहणार जळकोट, हाल मुकाम मोघा यांच्या फिर्यादीवरुन देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ४०/२०२१ कलम ४६१ खझउ प्रमाणे आज्ञात आरोपींवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रंजीत काथवटे हे करीत आहेत.

तीन जिवंत काडतुसासह गावठी पिस्तूल जप्त; दोघांना अटक

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

सोलापूर-हैदराबाद रस्त्यावर तीन जिवंत काडतुसासह देशी बनावटीचे गावठी पिस्तूल बेकायदेशीरित्या जवळ बाळगल्याबद्दल सोलापूर शहर गुन्हे शाखेने दोन व्यक्तीना जेरबंद केले आहेत. गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय साळुंखे, पोलीस उपनिरीक्षक शैलेश खेडकर व त्यांचे पथक शहरात मालाविषयक गुन्ह्यांतील आरोपींचा शोध घेण्यासाठी गस्त घालत असतांना दोघेजण गावठी पिस्तूल घेऊन हैदराबाद रस्त्यावर असलेल्या सग्गमनगर येथून ग्रे कलरची कार (एमएच १३ बीएन ८६८०) मधून शहरात येणार असल्याचे गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस पथकाने हैदराबाद रस्त्यावर असलेल्या हॉटेल स्वाद समोरील विरुद्ध बाजूचे मुळेगाव क्रॉस रॉड बाजूस असलेले लकी सर्व्हिस सेंटरच्या पाठीमागे, सग्गमनगरकडे जाण्याऱ्या कच्चा रस्त्यावर सापळा लावण्यात आला. पथकाने संशयित कार अडवून तिची तपासणी केली. कारचालक यासीन जब्बार

कामतीकर (वय ३२, रा. सग्गमनगर, सोलापूर) समद उर्फ अलीम उर्फ अल्लू मकतुम शेख (वय ३४, रा. बाबा कादरी मशिदजवळ) यांना ताब्यात घेऊन कारची व त्यांची झडती घेतली असता यासीन जवळ गावठी पिस्तूल, दोन मोबाईल मिळून आले व शेख याच्या खिशात ३ जिवंत काडतुस सापडले. सदर पिस्तूल व काडतुसे विनापरवाना जवळ बाळगल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. गावठी पिस्तूल, तीन जिवंत काडतुसे, दोन मोबाईल व कार असा एकूण ६ लाख ६९ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आली आहे. याबाबत सोलापूर शहरातील एमआयडीसी पोलीस ठाण्यात गु.र.नं. ७७/२०२१ भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यांचा अधिक तपास सुरू आहे. ही सदर कारवाई सोलापूर शहर पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, पोलीस उपायुक्त बापू बांगर, सहाय्यक पोलीस आयुक्त अभय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय साळुंखे, पोलीस उपनिरीक्षक शैलेश खेडकर पोलीस कर्मचारी अशोक लोखंडे, शंकर मुळे, राजू चव्हाण, विजय वाळके, संदीप जावळे, संतोष येळे, सुहास अर्जुन, स्वप्नील कसगावडे, संजय काकडे, विजय निंबाळकर आदींनी केली आहे.

भिवंडीत स्वतंत्र आरटीओ कार्यालय सुरू करण्याची मागणी

भिवंडी/प्रतिनिधी

भिवंडी शहर व ग्रामीण भागात वाढती वाहनांची संख्या लक्षात घेता भिवंडी शहरात स्वतंत्र आरटीओ कार्यालय सुरू करण्याची मागणी जोर धरू लागली असून पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी या मागणी कडे व्यक्तिशः लक्ष द्यावे अशी मागणी शिवसैनिकां कडून होत आहे. भिवंडी शहरातील वाहन नोंदणी व परवाना व इतर कामे ही ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालया मार्फत केली जात असून पूर्वी चाविंद्रा या ठिकाणी आठवड्यातून दोन दिवस आरटीओ शिबिर लागत असे परंतु जागा नसल्याने मागील कित्येक दिवसां पासून ते ही बंद असल्याने भिवंडी शहरातील नागरीकांना आरटीओ संबंधित कामांसाठी ठाणे कार्यालयात जावे लागत असल्याने मनस्ताप सहन करावा लागत आहे. तर शहरात मागील वर्षभरापासून आरटीओ अधिकारी न फिरकल्याने शहरात अनधिकृत रिक्षा, खाजगी बस यांचा सुळसुळाट झाला असून या खाजगी बस रस्त्यावर बिनदिक्कत पणे उभ्या करून ठेवल्याने नागरीकांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. तर शहरात बिगर परवाना रिक्षा अल्पवयीन मुले चालवीत असल्याने अनेक अपघात होत असतानाच या मुजोर रिक्षाचालकांकडून उद्धट पणाचे वर्तन व मारहाणीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. सध्याच्या स्थितीत शहरात अधिकृत व अनधिकृत अशा मिळून सुमारे १५ हजार रिक्षा रस्त्यावर फिरत असल्याने पादचारी नागरीकांच्या अपघाताचे प्रमाण वाढत आहे. ठिकठिकाणी अवैध रिक्षा स्टॅण्ड सुरू केल्याने या रिक्षा रस्ते अडवून उभ्या केल्याने वाहतूक कोंडी होत आहे त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शहरात आरटीओचे स्वतंत्र कार्यालय सुरू करावे अशी मागणी वाढत आहे.

लातूर प्रभाग क्रमांक १४ मधील रस्ते दुरुस्तीची मागणी

लातूर/प्रतिनिधी

सदगुरू नगर, कालिका देवी मंदिराच्या बाजुचा डाँ. मोरे ते एकता रोड जुना औसा रोड या रस्त्याची आवस्था अतिशय वाईट झाली असुन.त्या संदर्भात झोपलेल्या प्रशासनाला जागे करण्यासाठी मा.आयुक्त साहेब, महानगरपालिका लातूर यांना निवेदन आले. व त्या निवेदनात प्रशासनाने येत्या आठ दिवसात दखल नाही घेतली तर रस्त्यावर व लातूर महापालिकेसमोर तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा येथील नागरिकांनी आयुक्तांकडे कडे केली आहे. अंदोलनाची तिव्रता वाढली तर महापालिका प्रशासन जबाबदार राहील. असे निवेदनात म्हटले आहे.यावेळी हनुमंत कुलकर्णी, यशपाल मोरे, सुनिल जोशी, नागनाथ श्रीनामे, सोमनाथ श्रीनामे, पप्पु गिरी, जगदीश वरटी,सच्चिदानंद कुलकर्णी, ओंकार नाईक, जाधव सर,गोविंद कमठाणे आदी स्थानिक परिसरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

15 TO 21 FEB 2021 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 13/02/2021 9:07 PM Page 1

चलती का नाम महाविकास आघाडी

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भलेही देशात आणि वेगवेगळ्या राज्यांमध्ये लोकशाही प्रणालीवर चालणारी सरकारे अस्तित्वात आलेली असली तरी लोकशाहीची पाळेमुळे देशात घट्ट रुजवण्यासाठी कुठल्याही राजकीय पक्षांकडून तसे प्रयत्न मात्र झालेले नाहीत. त्यामुळे स्वातंत्र्य प्राप्तीच्या अवघ्या दोन दशकांनंतर राजकारणातील व्यक्ती महात्म्य वाढत जाऊ लागले आणि देशातील राजकारण हळूहळू व्यक्ती केंद्रित होऊ लागले. परिणामी लोकांनी लोकांसाठी लोकांचे चालवलेले राज्य अशी जी लोकशाहीची व्याख्या होती ती विस्मृतीत जाऊ लागली आणि त्याचा परिणाम असा झाला की लोकशाहीचा केंद्रबिंदू असलेला सामान्य माणूस कुठल्या कुठे फेकला गेला आणि त्याची जागा हुकुमशाहीची मानसिकता असलेल्या नेत्यांनी घेतली आणि त्यातूनच इंदिरा गांधी आणि नरेंद्र मोदी यांच्या सारखं नेतृत्व उदयास आले व राजकारणाचा लगाम पूर्णपणे अशा मनमानी करणाऱ्या लोकांच्या हाती गेला. आणि भारतीय लोकशाहीत मनमानी पर्वाला सुरुवात झाली. त्यामुळेच लोकांचा आज लोकशाहीवर विश्वास राहिलेला नाही. गेल्या काही वर्षांपासून लोक मनापासून निवडणुकीत भाग घ्यायला तयार नाहीत. त्यामुळे मतदानाची टक्केवारी घसरते आहे. परिणामी कुठल्याही एका पक्षाला बहुमत मिळेनासे झाले आणि त्यातूनच तकलादू युत्या आणि आघाड्यांचा जन्म झाला. हे सगळ एवढ्या साठीच सांगावस वाटतंय सध्या देशातील काही राज्यांमध्ये अशाच प्रकारे युत्या आणि आघाड्यांची सरकारे आहेत, अगदी केंद्रात जरी भाजपचे निर्विवाद बहुमताचे भाजपा सरकार असले तरी त्यालाही काही पक्षांचा टेकू आहे. म्हणूनच त्याला भाजपा सरकार न म्हणता एनडीए आघाडीचे सरकार म्हटले जाते. महाराष्ट्रात असेच तीन वेगवेगळ्या पक्षांचे महाविकास आघाडीचे सरकार आहे आणि आघाड्यांच्या सरकरकरचा कारभार म्हणजे एक प्रकारे चलती का नाम गाडी असाच असतो. जोवर चाललंय तोवर चालु द्या पुढचं पुढे अशीच मानसिकता सरकारमध्ये सामील असलेल्या पक्षांची असते. मग अशा आघाड्यांच्या सरकारकडून लोकांनी कसल्या अपेक्षा ठेवायच्या? महाराष्ट्रात सरकार बनवण्यासाठीच जवळपास तीन महिने लागले. या तीन महिन्यात मोजता येणार नाहीत इतक्या जोर बैठका झाल्या आणि शेवटी कसे तरी गंगेत घोडे न्हाले. आता राज्यातील जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी जेवढे प्रयत्न होत नसतील तेवढे प्रयत्न आणि कसरती सरकार टिकवण्यासाठी केल्या जात आहेत. आणि यात जनतेचे मात्र हाल होत आहेत. त्यातच राज्यपाल आणि सरकार यांच्यात भारत-पाकिस्तान मध्ये नसेल इतका दुरावा आणि मतभेद निर्माण झालेत. एवढ्या सगळ्या कठीण परिस्थितीत सरकारचे काम सुरू आहे हीच मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. कारण एका खांद्यावर जनतेच्या समस्यांचा डोंगर तर दुसऱ्या खांद्यावर सहा लाख कोटींच्या कर्जाचा पहाड. एवढ्या मोठ्या ओझ्या खाली सरकार चालवणे वाटते तितके सोपे नाही. खूप कठीण असते. आणि कोरोनाच्या संकट काळात घरात बसून सरकार चालवणे हे तर त्याहीपेक्षा कठीण होते. पण उध्दव ठाकरे यांना ती किमया साधता आली. अहो घरात बसून आजकाल लोकांना बायकोवर लक्ष ठेवता येत नाही, संसार चालवता येत नाही इथे तर संकट काळात एवढ्या मोठ्या राज्यावर लक्ष ठेवायचे आहे ही काही साधी गोष्ट नव्हती. कोरोनाचं संकट काही प्रमाणात का होईना टळलेलं आहे. राज्याच्या विकासाचा गाढा हळूहळू सुरू झालाय. आता खरे सरकारची कसोटी आहे की राज्याची विस्कटलेली घडी पूर्ववत कशी करता येईल, याकडे सरकारचे लक्ष असायला हवे आणि त्यासाठी महा विकास आघाडीतील शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस या तिन्ही पक्षातील नेत्यांमध्ये एकवाक्यता असायला हवी. तुमच्या पक्षाची ध्येय धोरणे काहीही असोत, पण सरकार म्हणून जेंव्हा तुम्ही एकत्र काम करीत आहात त्यावेळी जात, धर्म, अस्मिता, श्रद्धा या सगळ्या गोष्टी बाजूला ठेऊन ज्या कॉमन मिनिमाम प्रोग्रामच्या सुत्राला तुम्हीं बांधील आहात. त्याचा कुणालाही विसर पडता नये. तरच महा विकास आघाडीतील एकोपा आणि सरकार टिकेल. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे लोकांच्या मूलभूत प्रश्नांवर तिन्ही पक्षांचे एकमत असायला हवे. पण सध्या तरी तसे दिसत नाहीत. कारण काँग्रेस मधले काही लोक राष्ट्रवादीत जात आहेत, तर काही शिवबंधन हाती बांधून भगवा खांद्यावर घेत आहेत. हा प्रकार महा विकास आघाडीतील तिन्ही पक्षांमध्ये परस्परांच्या विषयी विद्वेष निर्माण करणारा आहे आणि त्याला कुठे तरी आळा बसायला हवा. तसे पाहता प्रत्येक पक्षाला त्याचा जनाधार आणि संघटनात्मक ताकत वाढवण्याचा पूर्ण अधिकार आहे. पण पक्षाची ताकत वाढवताना आपल्याच आघाडीतील पक्षाचे नेते किंवा कार्यकर्ते फोडणे गरजेचे आहे का? अरे फोडाफोड करायची असेल तर विरोधी पक्षाचे आमदार किंवा कार्यकर्ते फोडा. त्यामुळे महा विकास आघाडी अधिक बळकट होईल. पण जर महा विकास आघाडीतील पक्षच जर एकमेकांचे कार्यकर्ते फोडायला लागले, तर महा विकास आघाडी आणि सरकार कमकुवत होईल आणि असे कमकुवत सरकार पाडणे विरोधी पक्षाला अधिक सोपे जाईल. तसे भाजपवाले बऱ्याच दिवसापासून सरकार पडायला टपून बसले आहेत. त्यांना स्वतःहून संधी देऊ नका. महाराष्ट्रात आजही भाजपा विरोधी वातावरण आहे. मोदींवर लोकांचा विश्वास राहिलेला नाही. शेतकरी आंदोलनाची धग महाराष्ट्रात सुद्धा आहे आणि तिचा कधीही वणवा पेटू शकतो. वास्तविक याला महा विकास आघाडीतील तिन्ही पक्षांनी हवा द्यायला हवी. शेतकऱ्याची रास्त बाजू महाराष्ट्राच्या तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवली असती तर भाजपची आणखी कोंडी झाली असती. शिवाय शेतकरी आंदोलनाला बळ मिळाले असते. पण अजून तरी महा विकास आघाडीकडून तसा प्रयत्न झालेला नाही. त्यामुळे महा विकास आघाडीतील तिन्ही पक्ष खरोखरच शेतकऱ्यांच्या बाजूने आहेत का अशी शंका येते? आणि म्हणूनच महा विकास आघाडी एकसंघ ठेऊन राज्यातील जनतेमध्ये या आघाडी विषयी आणि सरकार विषयी विश्वासाचे वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. केवळ चाललय तोवर चालु द्या असे म्हणत एकेक दिवस ढकलण्याचा धोरण आघाडीतील तिन्ही पक्षांना मारक ठरू शकते.

सरकारी ऊर्जेचा पोरखेळ!

संध्या स्ट्रोक
सोनू जाधव

माणसाला जगण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा, हवा, पाणी या गोष्टी जितक्या महत्वाच्या आहेत. तितकाच रोजगारही महत्वाचा आहे. कारण काम धंदा नसेल तर नुसता हवा पाण्यावर माणूस जीवंत राहू शकत नाही. त्यासाठीच माणसाला रोजगार हवा आणि रोजगारासाठी उद्योग धंदे असायला हवेत. पण माणसाला श्वास घेण्यासाठी जशी ऑक्सीजनची गरज असते, तसेच उद्योग धंद्यासाठी वीज लागते. अगदी कृषी उद्योग सुद्धा विजेवर अवलंबून आहे. कारण शेताला पाणी देण्यासाठी वीज पंपाची गरज असते. त्यामुळे ग्रामीण क्षेत्र असो अथवा शहरी भाग असो दोन्ही ठिकाणच्या माणसाची वीज ही प्रमुख गरज बनली आहे. महाराष्ट्रात अनेक विद्युत प्रकल्प आहेत, पण तरीही संपूर्ण महाराष्ट्रातील उद्योग धंद्यांना पुरेल इतकी वीज निर्मिती होत नाही. त्यामुळे महाराष्ट्रात नेहमीच विजेचा तुटवडा जाणवतो. पूर्वीच्या आघाडी सरकारच्या काळात म्हणजे २०१४ पूर्वी राज्यात साडेपाच हजार मेगावॅट इतका विजेचा तुटवडा होता. त्यामुळे ग्रामीण भागात दहा ते बारा तासांचे भार नियमन असायचे हळूहळू परिस्थिती सुधारली. पण ती सुधारण्यासाठी सरकारला प्रचंड खर्च करावा लागला. त्यामुळे हा झालेला खर्च भरून काढण्यासाठी थकबाकी वसूल करणे किंवा विजेचे दर वाढवणे हे दोनच पर्याय होते. वीज नियामक आयोगाला सुद्धा त्याची कल्पना आहे. आणि लोकांनाही हे वास्तव कळायला हवे. मुंबईला टाटा कडून मुंबई उपनगरांना अदानीकडून तर उर्वरित महाराष्ट्राला महा वितरण कडून वीज पुरवठा केला जातो. पण थकबाकीमुळे या तिन्ही कंपन्यांची हालत खराब आहे असे असताना ऊर्जा मंत्र्यांनी वीज बिल माफीची घोषणा करायलाच नको होती. पण सत्तेमधले लोक सवंग लोकप्रियतेसाठी मागचा पुढचा जराही विचार न करता एखादी घोषणा करतात आणि वस्तुस्थिती लक्षात आल्यावर घुमजाव करतात. महाराष्ट्रातील ऊर्जा मंत्र्याचे तसेच झाले. लॉकडाऊन काळातील वीज बिल माफ करण्याचा त्यांचा निर्णय त्यांच्या चांगलाच अंगाशी आला आणि त्यांना या निर्णय पासून घुमजाव करावे लागले. आता लोकांच्या शिव्या खाण्याची पाळी त्यांच्यावर आलीय. त्यामुळे सरकारची मोठी नाचक्की होतेय. मुळात वीज कंपन्या तोट्यात का जातात? सध्याच्या आघाडी सरकारच्या काळा पेक्षा मागील युती सरकारच्या काळातील आर्थिक तोटा अधिक होता. आणि याबाबत बोलताना भाजपवाले सांगत आहेत की आम्ही आमच्या काळात वीज ग्राहकांना एवढी माफी दिली आणि तेवढी माफी दिली. त्यामुळे तोट्याची रक्कम वाढली, अरे पण तुम्हाला कोणी सांगितले होते माफी द्यायला. एकीकडे सरकार उठसूट वीजबिलात माफी देताय तर दुसरीकडे वीज कंपन्यांचे कर्मचारी मोठमोठ्या उद्योगांची थकबाकी वसूल करायला जातात आणि त्यांच्याकडून लाच घेऊन गप्प बसतात. एखाद्या सामान्य ग्राहकाचे ५०० रुपयांचे लाईट बिल थकले तरी वीज कर्मचारी त्या ग्राहकाचे वीज कनेक्शन तोडतात. पण मोठमोठ्या उद्योग धांड्यांकडे दोन-दोन वर्षांची विजबिलाची थकबाकी असली तरी त्यांच्यावर कारवाई केली जात नाही, त्यांचे वीज कनेक्शन कापले जात नाही. कारण वीज कंपन्यांच्या अधिकारी वर्गाशी त्यांची सेटिंग असते. त्यामुळे त्यांना एक ठराविक रक्कमेचा हप्ता अथवा लाच म्हणून दिली की मग कितीही वर्षाची थकबाकी असो त्यांचा वीज पुरवठा सुरूच राहतो आणि या गोष्टी राजकीय पक्षांना ठाऊक असतानाही राजकीय पक्ष केवळ सरकारलाच दोष देतात. अर्थात वसुली बाबत सरकार गंभीर नाही ही वस्तुस्थिती आहे. पण त्याच बरोबर या संपूर्ण प्रकरणात वीज कंपन्यांचे अधिकारी अधिक दोषी आहेत. त्यामुळे या लोकांवर कारवाई करण्यासाठी राजकीय पक्षांनी आंदोलन करायला हवे, तसेच जर सरकार थकबाकीदार कंपन्यांचा वीजपुरवठा खंडित करणार नसेल, तर राजकीय पक्षांनी अशा थकबाकीदार कंपन्यांच्या विरोधात मोहीम उघडावी. म्हणजे किमान लोकांच्या दबावामुळे तरी सरकारला थकबाकीदार कंपन्यांवर कारवाई करणे भाग पडेल. लॉकडाऊनच्या काळात लोकांची आर्थिक स्थिती खराब होती ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांकडून वीज बिलाची वसुली सक्तीने केली जाऊ नये. त्यांना सवलत मिळायला हवी. पण जे कारखानदार आहेत, जे मोठे उद्योगपती आहेत त्यांच्याकडून सक्तीने विजबीलाची थकबाकी वसूल करायला हवी. यामध्ये काही साखर कारखानदार सुद्धा आहेत आणि अशा लोकांना सरकार पाठीशी घालून त्यांना सवलती देत आहेत. त्या बंद व्हायलाच हव्यात आणि एक गोष्ट सरकारने लक्षात ठेवावी की एकदाका लोकांना सवलत मिळायला लागली की मग लोकांना त्याची सवय पडते. त्यामुळे वीजबिल वसुली बाबत गोरगरीब माणूस माणूस सोडला, तर इतर थकबाकीदारांच्या बाबत सरकारने कडक भूमिका घ्यावी.

मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३

रिंकू शर्मा हत्या प्रकरणी पत्रकारांना मारहाण!

वाराणसी/अजयकुमार उपाध्याय

वायव्य दिल्लीतल्या मंगोलपुरी भागात राहणाऱ्या रिंकू शर्मा या तरुणाच्या हत्येनंतर या हत्येचं कारण काय? यावरून वाद पेटला आहे. सोशल मीडियावर रिंकू शर्मा हिंदू होता आणि बजरंग दल आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी त्याचे संबंध होते, यामुळे त्याचा खून करण्यात आल्याची चर्चा आहे. मात्र, हे धार्मिक हिंसाचाराचं प्रकरण नसून परस्परातील वादामुळे ही हत्या करण्यात आल्याचं दिल्ली पोलिसांचं म्हणणं आहे. पोलिसांनी या प्रकरणात ४ जणांना अटक केली आहे. तसंच परिसरातला तणाव बघता निमलष्करी दलाचे जवान तैनात करण्यात आले आहेत. शुक्रवारी (१२ फेब्रुवारी) दुपारी मंगोलपुरीच्या ज्या गल्लीत रिंकू शर्मा रहायचा त्या गल्लीत जाण्याआधी बीबीसीच्या प्रतिनिधींनी बाह्य दिल्लीचे ॲडिशनल डीसीपी सुधांशू शर्मा धामा यांच्याशी बातचीत केली.

धामा सांगतात, परवा रात्री काही मुलं एका मुलाचा वाढदिवस साजरा करण्यासाठी मंगोलपुरीच्या एका गल्लीत जमले होते. या पार्टीमध्ये या मुलांमध्ये एका रेस्टोरंटवरून भांडण झालं. दोन्ही पक्षांची वेगवेगळ्या रेस्टोरंटमध्ये पार्टनरशीप होती. हत्या करण्यात आलेल्या रिंकूची कुठल्याही रेस्टोरंटमध्ये पार्टनरशीप नव्हती. मात्र, त्याचे मित्र सचिन आणि आकाश या दोघांचं रेस्टॉरंट होतं. तसंच चिंगू उर्फ जाहिद या तरुणानेही रोहिणी भागात एक रेस्टॉरंट उघडलं होतं. रिंकू शर्माच्या मित्राचं रेस्टॉरंट लॉकडाउनमुळे बंद झालं होतं, अशी माहिती ॲडिशनल डीसीपींनी दिली. यावरूनच वाद सुरू झाला. वाद वाढल्यावर चिंगू उर्फ जाहीद तिथून निघून गेला. त्यानंतर तो मामा आणि इतर तीन-चार नातेवाईकांना घेऊन रिंकूच्या घरी पोहोचला. जाहीदचे मामा दानिश उर्फ लाली यांचं घर रिंकू ज्या गल्लीत रहायचा त्याच गल्लीत होतं. याचवेळी या लोकांमध्ये भांडण सुरू झालं आणि त्यात रिंकूची चाकूने भोसकून हत्या करण्यात आली. यानंतर रिंकूला हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आलं. मात्र, उपचारादरम्यान रिंकूचा मृत्यू झाल्याचं धामा सांगतात. धामांनी सांगितलं, या प्रकरणातल्या लोकांना त्याच वेळी अटक करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या चौघांचाही गुन्हेगारी रेकॉर्ड नाही. आतापर्यंत या प्रकरणात कुठलाही धार्मिक अँगल समोर आलेला नाही. हे पूर्णपणे व्यवसायिक स्पर्धेचं प्रकरण आहे. हे सगळे एकमेकांच्या शेजारी रहायचे आणि एकमेकांना ओळखायचे. त्यामुळे यात धार्मिक तेढ असावी, असा कुठलाच अँगल नाही. मात्र, रिंकूच्या काही नातेवाईकांचं म्हणणं वेगळं आहे. रिंकू हिंदू होता. त्याचे बजरंग दलाशी संबंध होते आणि राम मंदिर उभारण्यासाठी तो देणगी गोळा करत होता, असं काही नातेवाईकांचं म्हणणं आहे. रिंकूच्या धाकट्या भावाचाही असंच म्हणणं आहे. दिल्ली पोलिसांकडून माहिती मिळाल्यानंतर बीबीसीची प्रतिनिधी रिंकू शर्माच्या घरी पोहोचले. तिथे राजकीय नेत्यांचं जाणं-येणं सुरू होतं. बीबीसीचे प्रतिनिधी पोहोचले तेव्हा तिथे भाजप खासदार हंसराज हंस, आम आदमी पक्षाच्या आमदार राखी बिरला आणि दिल्ली भाजप प्रमुख आदेश गुप्ता होते. बीबीसी प्रतिनिधींनी रिंकू शर्माच्या घरी जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, राजकीय नेते असल्याने आम्हाला दूर ठेवण्यात आलं. त्यामुळे आम्ही आधी सामान्य जनतेशी बोलायचं ठरवलं. आम्ही लोकांशी बोलून या भागात यापूर्वी कधी दोन समाजांमध्ये तेढ निर्माण झाली होती का, हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला. रिंकू शर्माच्या घराशेजारी राहणाऱ्या एका व्यक्तीने नाव उघड न करण्याच्या अटीवर सांगितलं, या प्रकरणाला हिंदू-मुस्लीम असा रंग देण्यात येतोय. इथे बरेच मुस्लीम राहतात. बघा, तुमच्या मागेच अजानचा आवाज येतोय. मी जवळपास ४०-४५ वर्षापासून इथे राहतोय. यापूर्वी असं कधीही घडलेलं नाही. याच गल्लीत थोडं पुढे गेल्यावर मी एका मंदिरात पोहोचलो. तिथे एका ५० वर्षाच्या महिलेशी आम्ही बोललो. त्या म्हणाल्या, रिंकू चांगला मुलगा होता. पंडित घरातला होता. मंदिरात येऊन पूजा करायचा. कधी झेंडे लावायचा. दिसल्यावर विचारपूस करायचा. साधा-सरळ मुलगा होता. त्याच्या घरची माणसंही चांगली आहेत. हे खूप वाईट झालं. आम्ही अटक केलेली मुलं आणि त्यांच्या कुटुंबीयांबद्दल विचारलं. त्यावर त्या म्हणाल्या, आम्ही कायस्थ समाजातले आहोत. आमचा त्यांच्याशी काही संबंध नाही. ते खालच्या जातीतले लोक आहेत. आमच्या गल्लीतही दोन घरं आहेत. आम्ही त्यांच्याशी कसलाच संबंध ठेवत नाही. या लोकांची या गल्लीत एक नाही बरीच घरं आहेत. एका-एकाची चार-चार मुलं आहेत आणि सगळे भांडणात पुढे असतात. याच महिलेने आम्हाला अटक करण्यात आलेल्या मुलांच्या घरचा रस्ता दाखवला. मंदिरापासून जवळपास ५० पावलांच्या अंतरावर गुलाबी रंग लावलेलं एक जुनं घर होतं. ते घर रिकामं होतं. घरातले सगळे पळून गेल्याचं शेजारी उभ्या लोकांनी सांगितलं. तिथेच शेजारी माहताब राहतात. आता देवाचं नाव घ्यायचीही भीती वाटते, असं ते म्हणाले. त्यांच्या घराशेजारीच राहणाऱ्या ५० वर्षाच्या ललिता यांचंही तसंच म्हणणं होतं. मात्र, याआधी कधीही धार्मिक कार्यक्रम करण्यासाठी शेजारी राहणाऱ्या माहताबच्या कुटुंबीयांकडून काही त्रास झाला का, हे विचारल्यावर त्यांचं उत्तर नाही, असं होतं. आम्ही महताबच्या घरासमोर राहणाऱ्या अनेकांशी बातचीत केली. इथे उपस्थित असलेल्या दोघांनी नाव उघड न करण्याच्या अटीवर आम्ही गल्लीत जागरणाचे कार्यक्रम घ्यायचो. रस्त्यावरच जेवण बनायचं. मात्र, टेलरिंगचं काम करणारे माहताबचे वडील किंवा स्वतः माहताब यांनी कधीच त्यावर आक्षेप घेतला नसल्याचं सांगितलं. या घटनेत जो चाकू वापरण्यात आला तो रिंकू शर्माचाच असल्याचंही या लोकांनी सांगितलं. माहताब यांच्या घराबाहेर त्यांच्या शेजाऱ्यांशी बातचीत सुरू असतानाच लाल आणि ग्रे रंगाचे स्वेटर घातलेल्या दोन व्यक्तींनी आम्हाला घेराव घालायला सुरुवात केली. आधी मोठ्याने बोलत धक्का-बुक्की करत धमकवण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यानंतर या लोकांनी इतरांनाही बोलवायला सुरुवात केली आणि गर्दी वाढू लागली. हात-पाय तोडून टाकू, इथून निघा, असं धमकावण्यात आलं. प्रेस कार्ड मागितल्यावर प्रतिनिधींनी बीबीसीचं ओळखपत्र दाखवलं. बीबीसीचं नाव बघून ती माणसं अधिकचं चिडली. हे सगळं मेन रोडपासून अवघ्या १५ मीटर अंतरावर सुरू होतं. मेन रोडपर्यंत पोहोचण्यासाठी एक-एक पाऊल टाकणंही कठीण होतं. बाहेर पडताना काही लोकांनी पाठीवर मारहाणही केली. बीबीसीचे प्रतिनिधी कसंबसं १५ मीटर अंतर पार करत मेन रोडवर पोहोचले. तिथे निमलष्करी दलाचे दोन जवान दिसले. मेनरोडवर पोहोचल्यावर बीबीसीच्या प्रतिनिधींनी आय कार्ड दाखवत बीएसएफच्या जवानांकडे मदत मागितली. मात्र, ते हल्लेखोरांना काहीच बोलले नाही. दरम्यान, बीबीसीच्या प्रतिनिधींनी मेन रोडवर पुढे चालत जात स्वतःला वाचवण्याचा प्रयत्न केला. तेवढ्यात दोन हल्लेखोर आपल्यासोबत जमाव घेऊन मेनरोडपर्यंत आले आणि त्यांनी हात धरून पुन्हा गल्लीत नेण्याचा प्रयत्न केला. तेवढ्यात एका टिव्ही पत्रकाराने बीबीसी प्रतिनिधीचा हात धरून त्याची तिथून सुटका केली. हल्लेखोर जमावाला बघून सामान्य माणसांनीही बोलणं बंद केलं. दुर्दैवाची बाब अशी की गल्लीत राहणारी ती माणसं जी दोन्ही बाजूच्या लोकांना ओळखायची ती हल्लेखोरांच्या जमावासमोर असहाय झाली आणि पत्रकारांना तिथून निघून देण्याचा सल्ला देत होती.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

15 TO 21 FEB 2021 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 13/02/2021 9:08 PM Page 1

खासदार डॉ.जयसिद्धेश्वर यांना बनावट जात प्रमाणपत्र देणाऱ्या शिवासिध्द बुळा यास अटक

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी



सोलापूरचे भाजपचे खासदार डॉ जयसिद्धेश्वर शिवाचार्य यांच्या बनावट जातप्रमाणपत्र प्रकरणी अटक करण्यात आलेल्या शिवसिद्ध विठ्ठल बुळा (वय ५५ रा. तडवळ ता अक्कलकोट जि सोलापूर) यास प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एस एम कनकदंडे यांनी १५ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. खासदार डॉ शिवाचार्य यांनी लोकसभा निवडणुकीत बनावट जातप्रमाणपत्र सादर केल्याप्रकरणी अक्कलकोटचे प्रभारी तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

त्यानुसार नुरंद स्वामी गुरुबसय्या हिरेमठ ऊर्फ डॉ.जयसिद्धेश्वर शिवाचार्य तसेच उमरगा व अक्कलकोट तहसील कार्यालयातील तत्कालीन अधिकारी व कर्मचारी यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यात सोलापूर शहर गुन्हे शाखेने मंगळवारी सकाळी अक्कलकोट तालुक्यातील तडवळ येथे बुळा याच्या घराची झडती घेतली. त्यावेळी घरातून पोलिसांनी काय काय जप्त केले हे अद्याप गुलदस्त्यात आहे. त्याची शहर पोलीस आयुक्तालयात कसून चौकशी करण्यात आली. त्यास बुधवारी न्यायालयात हजर करण्यात आले. न्याय दंडाधिकारी कनकदंडे यांच्या न्यायालयात पोलीस कोठडी मिळण्यासाठी युक्तिवाद करण्यात आला.

सदर घटनेत बेडा जंगम जातीचे प्रमाणपत्र तयार करून दिल्याची माहिती निष्पन्न झाल्याने आरोपी बुळा याने ते मूळ बनावट जातप्रमाणपत्र कुठे लपवून ठेवली आहे. तसेच त्याच्या घरी झडतीत मिळालेले एक्सिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेट अक्कलकोट यांच्या इंग्रजीतील गोल शिक्याचा वापर करून त्याने किती व कोणत्या लोकांना बनावट जातप्रमाणपत्र दिली आहेत. याबाबतचा तपास करण्यासाठी आरोपीला सात दिवस पोलीस कोठडी देण्याची मागणी न्यायालयात सरकार पक्षाने केली. दोन्ही पक्षाचा युक्तिवाद ऐकून न्यायालयाने आरोपी बुळा यास पाच दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला. यात सरकारतर्फे ॲड.पंडित जाधव तर आरोपीकडून ॲड.संतोष न्हावकर, ॲड.योगेश कुरे, ॲड.पी.बी.लोंढे पाटील हे काम पाहत आहेत.

अनेकांचे धाबे दणाणले

खासदार डॉ.जयसिद्धेश्वर शिवाचार्य यांच्या बोगस जातप्रमाणपत्रप्रकरणी शिवसिद्ध बुळा यास अटक झाल्याने बनावट प्रमाणपत्राच्या आधारे नोकरी मिळविलेल्या व निवडणुका जिंकलेल्याचे धाबे दणाणल्याचे सांगण्यात येत आहे. निवडणुका समाजकल्याण खाते तसेच नोकरीसाठी दाखल केलेले अनेकांचे जातप्रमाणपत्र बनावट निघण्याची शक्यता असून या रॅकेटचा पर्दाफाश करण्यासाठी सोलापूर शहर गुन्हे शाखेचा सखोल चौकशी सुरू आहे.

पोलीस कॉस्टेबल पोपट बन यांचे भिवंडीतील अवैध धंद्यांना अभय; समजवेकांनाची कारवाईची मागणी

भिवंडी/प्रतिनिधी

यंत्रमागाची नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भिवंडी शहरात मोठ्या प्रमाणात कामगार वर्ग राहत असून शहरात चोरी, दरोडे, हाणामाऱ्या, हत्या, आत्महत्या, लूट, विनयभंग आशा घटना मोठ्या प्रमाणात घडत असून यामागे महत्वाचे कारण शोधले असता भिवंडी पोलीस उपायुक्त क्षेत्रात संद्या मटका, जुगार, चरस, गांजा, हुक्का, गावठी दारू, एम डी, गुटखा, लॉज, रात्री उशीरा पर्यंत चालणारे हॉटेल, लेडीज बार, अवैध वेश्या व्यवसाय, ऑनलाईन जुगार, तसेच अवैध केमिकल गोदामे, अशा पद्धतीने अवैध धंदे मोठ्या प्रमाणात सुरु असून पोलीस उपायुक्त कार्यालयाकडून कोणतीच कारवाई करण्यात येत नसून समाजसेवक दीपक नागरे यांनी वारंवार पोलीस उपायुक्त यांना तक्रारी केल्या मात्र अद्याप कोणतीच कारवाई होत नसल्याने पोलीस उपायुक्त योगेश चव्हाण यांच्या कार्यालयातील पोलीस कॉस्टेबल पोपट बन यांची बहुसंख्य अवैध धंद्यात पार्टनरशीप असल्याचा धक्कादायक असल्याचा प्रकार करत असल्याचा आरोप नागरे यांनी यांनी पोलीस महासंचालक यांच्या कडे केलेल्या लेखी तक्रारीत केला असून पोलीस उपायुक्त यांना महिन्याला लाखो रुपये वसुल करून देत असल्याचाही आरोप केला आहे, मात्र यामध्ये कामगार वर्ग अवैध धंद्यामुळे कर्जबाजारी होऊन आत्महत्या करीत असल्याने असल्याने बेजबाबदार आणि अवैध धंदयाला अभय देणाऱ्या पोलीस कॉस्टेबल पोपट बन यांच्यावर कडक कारवाई करून आतापर्यंत किती अवैध माया जमा केली याची सखोल चौकशी करून कडक कारवाई करण्याची मागणी पोलीस महासंचालक, पोलीस आयुक्त,राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण, अप्पर पोलीस आयुक्त यांच्याकडे समाजसेवक दीपक नागरे यांनी लेखी तक्रारी द्वारे केली असून कारवाई न झाल्यास कामगारांच्या हितासाठी मंत्रालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे आणि त्यास जबाबदार संबंधित पोलीस यंत्रणा राहील असे नागरे यांनी सांगितले आहे.

डुंगे ग्राम पंचायतीच्या सरपंचपदी लक्ष्मी पाटील तर उपसरपंच पदी जितेंद्र पाटील यांची बिनविरोध निवड

भिवंडी/प्रतिनिधी

तालुक्यातील डुंगे ग्राम पंचायतीच्या सरपंचपदी लक्ष्मी गणेश पाटील तर उपसरपंच पदी जितेंद्र दयानंद पाटील यांची बुधवारी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. बुधवारी तालुक्यातील २८ ग्राम पंचायतींच्या सरपंच उपसरपंच पदासाठी निवडणूका पार पडल्या. यावेळी ग्राम पंचायत कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी तथा कृषी सहाय्यक बाळकृष्ण गायकवाड यांच्या उपस्थितीत सरपंच उपसरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली. यावेळी लक्ष्मी गणेश पाटील यांचा सरपंचपदासाठी तर जितेंद्र दयानंद पाटील यांचा उपसरपंच पदासाठी प्रत्येकी एक एक उमेदवारी अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी गायकवाड यांनी डुंगे गावच्या सरपंचपदी लक्ष्मी गणेश पाटील तर उपसरपंचपदी जितेंद्र पाटील यांची बिनविरोध निवड जाहीर केली. त्यांची निवड जाहीर होताच त्यांच्या सार्थकांनी फटाके फोडून व गुलाल उधळत एकच जल्लोष केला. दरम्यान गलिच्छ राजकारणाला दूर ठेऊन गावातील ग्रामस्थांनी आपल्यावर जो विश्वास दाखविला आहे, त्या विश्वासाला आपण कधीही तडा जाऊ देणार नाही तसेच गावाच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू अशी प्रतिक्रिया नवनिर्वाचित सरपंच लक्ष्मी गणेश पाटील यांनी दिली आहे. यावेळी ग्राम पंचायत डुंगे येथील निवडून आलेले नवनिर्वाचित सदस्य निलेश भगत, शैलेश पाटील, छत्रपती पाटील, जयश्री पाटील, शर्मिला पाटील यांचादेखील ग्रामस्थांनी सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी गावातील जैष्ठ नागरिक दयानंद पाटील, पंढरीनाथ पाटील, उद्योगपती दीपक पाटील तसेच अनिल पाटील, कैलास पाटील, संजय पाटील, धर्मेंद्र पाटील यांच्यासह, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'ओएलएक्स'वरून फसवणूक करणारे भामटे गजाआड

कासारवडवली/प्रतिनिधी



कोणत्याही वस्तूची ओन लाईन खरेदी विक्री करताना सावधगिरी बाळगणे खूप गरजेचे आहे. कारण आजकाल अशा व्यवहारात मोठ्या प्रमाणावर फसवणुकीचे प्रकार घडत आहेत. कासारवडवली येथे अशाच एका प्रकरणात ओएलएक्सवर लॅपटॉप विक्रीची जाहिरात टाकणाऱ्या इसमाला बंद केलेल्या खात्याचा चेक देऊन त्याची २,३०,००० रुपयांची फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांनी मोठ्या शिताफीने तपास करून आरोपींना अटक केली आहे.

कासारवडवली येथे राहणारे प्रकाश श्रीधर हेगडे (५२) यांच्या मुलाला वैद्यकीय शिक्षणासाठी परदेशात जायचे असल्याने त्याने आपल्याकडचा २३००० रुपयांचा लॅपटॉप विकायचे ठरवले. त्यासाठी ओएलएक्सवर त्याने तशी जाहिरात टाकली. त्यानंतर ती जाहिरात बघून दोघेजण आले आणि त्यांनी प्रकाश हेगडे यांच्या मुलाचा तो लॅपटॉप विकत घेतला. त्याची किंमत म्हणून त्यांनी २३००० रुपयांचा एक्सिस बँकेचा चेक हेगडेच्या मुलाला दिला व बँकेत जाऊन क्लेअर करायला सांगितला. त्यानुसार हेगडेंचा मुलगा चेक घेऊन बँकेत गेला, पण तिथे गेल्यावर त्याला समजले तो चेक एका सोफ्टवेअर कंपनीच्या बंद झालेल्या खात्याचा आहे. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच हेगडेंचा मुलगा परत आला. पण तोवर ते भामटे त्याचा लॅपटॉप घेऊन पळून गेले होते. त्यानंर घडलेला प्रकार त्याने वडिलांना सांगताच प्रकाश हेगडे यांनी या प्रकरणी कासारवडवली पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली. त्यानुसार पोलिसांनी ३७/२०२१ भादावी कलम ४२०,३४ नुसार गुन्हा नोंदवला. त्यानंतर कासारवडवलीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किशोर खैरनार यांनी स.पो.नि. सहदेव पालवे यांच्या नेतृत्वाखाली एक पथक तयार करून त्यांच्याकडे तपास दिला.

या टीमने तांत्रिक पद्धतीने तपास करून खास बातमीदारांकडून माहिती मिळवून पिटर उर्फ रोयीस जोस संचेस ३० या मालवणी मालाड येथे राहणाऱ्या इसमाला ताब्यात घेतले. त्यानंतर सिद्धेश सावंत या त्याच्या दुसऱ्या साथीदाराला अंधेरीतून अटक केली. दरम्यान चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली देताना तो लॅपटॉप मुंबईतील लॅमिंग्टन रोड येथे विकल्याचे कबुल केले. त्यानंतर पोलिसांनी तो लॅपटॉप हस्तगत केला. विशेष म्हणजे एक्सिस बँकेचे बोगस चेक देऊन त्यांनी यापूर्वी अनेक लोकांची फसवणूक केल्याचे चौकशीत उघडकीस झाले आहे. सदर कारवाई ठाणे सहार पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर सह आयुक्त सुरेश मेकला अप्पर पोलीस आयुक्त अनिल कुंभारे परिमंडळ ५ चे उपयुक्त विनयकुमार राठोड सहा.पो.आयुक्त वर्तक नगर पंकज शिरसाठ व पो.नि किशोर खैरनार यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि जयराज रणवरे, अविनाश काळदाते पो.नि.वैभव धुमाळ, स.पो,नि सहदेव पालवे, पो.हवा. उदय कोरे, महेंद्र लिंगाळे, रवींद्र रावते, रमेश जाधव संतोष गायकवाड, दादासाहेब दोरकर, तुषार पाटील, मनोजकुमार पवार, मनोज महाजन यांच्या पथकाने पार पडली.

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती 'डी' आचोळे, नालासोपारा (पु.)

दुरध्वनी - ७२१९३७०००६/७२१९३७०००९

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'डी' कार्यालय आचोळे नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ई कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	विभाग	मालमत्ता क्र	रिसीट नं.	ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव	खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव
१	आचोळे ०९	७५०/५	१५९०	ओमकार कंन्ट्रक्शन	पुट्टलिलावती मंजे गौडा व मंजे रंगे गौडा
२	माणिकपूर २/२	AC२०/२६७५८	१५९४	महेश सहदेव मालप	प्रीती महेश मालप
३	आचोळे १०	१/२७	१८९५	नेमीनाथ बिल्डर्स डेव्हलपर्स	युजीप एडविन डिसोजा व फ्लाविया इ डिसोजा
४	आचोळे ०५	१५/४	१८९८	श्रीप्रकाश दुबे	सुरेश नथुराम रेशीम
५	आचोळे ०९	६२३/२८	१५९९	हीमांशु बी. भाथीया	निरव डी.गाला व पन्ना डी.गाला व निकीता एन.गाला
६	आचोळे ०९	६२३/८३	१६००	उमेद बी. कुमावत	प्रतिक जयेश शाह व भाविनी जे. शाह
७	आचोळे ०९	६०४/५७	१६०१	विपुल आर. तुरडे	कमलाकर धोंडू जाधव व निखील कमलाकर जाधव
८	आचोळे ०८	५९/३४	१६०२	दिपेश किशोर हाथलिया	कृष्णाकांत एम.तिवारी
९	आचोळे ०२	२७६/६५	१६०३	सुषमा प्रमोद इंगळे	धनंजय पांडुरंग मौले
१०	माणिकपूर २/२	AC२०/४६६६७	१६०८	जीतेंद्र बाजीराव पाटील व सौ.ज्योती जीतेंद्र पाटील	रती गिरीशन पानीकर
११	माणिकपूर २/२	AC२०/४६६६३	१६०९	जीतेंद्र बाजीराव पाटील व सौ.ज्योती जीतेंद्र पाटील	रती गिरीशन पानीकर
१२	आचोळे ०९	६८३/१४९	१६१०	निर्मलादेवी यादव	पवनदेव शर्मा
१३	आचोळे ०९	६८३/६१	१६१३	दिलीप जी. पाटील	संदिप विश्वकर्मा
१४	आचोळे ०२	२३२/१८	१६१५	मिनाक्षी मनोहर शिंदे	अंजली अजय म्हसकर
१५	आचोळे ०९	७७२/१७४	१६१६	केमी इन्फ्रास्टक्चर	भीमसेन परदेशी प्रजापती
१६	आचोळे ०१	१५२/१३	१६१९	दुबे कन्ट्रक्शन	डॉ. शिवनारायण आर. दुबे
१७	आचोळे ०१	१५२/१४	१६२०	दुबे कन्ट्रक्शन	डॉ. शिवनारायण आर. दुबे
१८	आचोळे ०६	३२२/६	१६२३	अनिता सुनिल शाही	अजयकुमार धनेश्वर झा व गौरीशंकर झा
१९	आचोळे ०९	६२१/४८	१६२४	दिव्या डेव्हलपर्स	पिंकेश विजय करवत
२०	आचोळे १०	३५/२३	१६२६	हेमा एम. मिश्रा	साजिद एम. हरादवाला

जावक क्र. वविशम/ कवि/१०९५/२०२०-२१
दिनांक : १०/०२/२०२१

सही/-
प्र.सहा.आयुक्त
प्रभाग समिती 'डी' आचोळे
वसई विरार शहर महानगरपालिका

देवणी येथे अखंड शिवनाम सप्ताह व शिवपंचाक्षरी जप यज्ञ सोहळा चालू

देवणी/प्रतिनिधी

येथील श्री ग्रामदैवत महादेव मंदिर येथे संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या ४६० व्या जयंतीनिमित्त अखंड शिवनाम सप्ताह व शिवपंचाक्षरी जप यज्ञ सोहळा बुधवार दिनांक १० फेब्रुवारी पासून चालू करण्यात आले. या सप्ताहामध्ये रुद्राभिषेक, परमरहस्य पारायण, जप यज्ञ, श्री मनिप्र सिद्धलिंग महास्वामीजी यांची पाद्यपूजा व आशिर्वचन, गाथा भजन, मनमत स्वामी चरित्र, शिवपाठ, शिव कीर्तन, शिव जागर, शिव पाठ असे विविध कार्यक्रम या सप्ताहात संपन्न होत आहेत. यामध्ये बुधवार दिनांक १० फेब्रुवारी पासून १७ फेब्रुवारी पर्यंत विकास भुरे महाराज मांजरम, स्वातीताई राजद दापका, किर्ती ताई हिरेमठ लातूरकर, रमेश महाराज परळीकर, शिवानी ताई त्रीपले वसमत, भूषण स्वामी महाराज साखरेकर, किशोरीताई ताकबिडकर यांचे प्रवचन व कीर्तन होणार आहे. मंगळवार दिनांक १६ फेब्रुवारी रोजी श्री मन्मथ स्वामी माऊलींचे पाळणा व ग्रंथ दिंडी शहराच्या मुख्य मार्गातून निघणार आहे. बुधवार दिनांक १७ फेब्रुवारी रोजी सकाळी मनिप्र संगण बसवा महास्वामीजी श्री संगण्णा बसवा मठ संस्थान, निलंगा यांचे प्रसादाचे कीर्तन होणार आहे. या सप्ताहामध्ये अरूणाबाई बेटकर, वर्षा घाळे, शैलाबाई जीवने, गोदावरीबाई कंटे,अश्विनी पंचाक्षरी, लक्ष्मीबाई डोंगरे, शांताबाई पटणे, ललिताबाई नळगिरे हे अन्नदाते राहणार आहेत. हे कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता गावातील महिला भजनी मंडळी नवयुवक भक्तमंडळी परिश्रम घेत आहेत.

रोडरोमिओंना पोलिसांच्या दंडुक्याचा 'दंड'

वाडा/प्रतिनिधी

शाळा, कॉलेज सुटल्या नंतर विद्यार्थ्यांची गर्दी रोजच वाडा बस स्थानकावर होते अशा वेळी स्थानकात धूम स्टाईलने दुचाकी चालवणे, कर्ण-कर्कश हॉर्न वाजवणे, एका दुचाकी वर तीन-तीन जण बसून हुल्लडबाजी करणे असे प्रकार घडत असतात. त्याच बरोबर विनाकारण काहीजण बस स्थानकाच्या आवारात दुचाकी घेऊन येरझाऱ्या मारताना दिसून येत आहेत. तर काही वेळा य दुचाकीस्वार व बस चालकां मध्ये खटके उडत होते, म्हणून वाडा आगाराचे आगारप्रमुख व वाडा तालुका प्रवासी संघटनेचे अध्यक्ष प्रल्हाद शिंदे यांनी वाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. याची दखल घेत मंगळवारी दुपारच्या सुमारास या रोड रोमिओंना पोलिसी दंडुक्याचा दंड दिला होता. पोलिसांच्या या कारवाईचा व्हिडिओ सोशल मीडियावर सर्वत्र पसरल्याने चर्चेचा विषय झाला आहे. या बाबत अनेकांनी याचे समर्थन करत अशा रोडरोमिओंवर रोजच कारवाई करण्याची मागणी केली आहे. तर वाडा तालुका प्रवाशी संघटनेने बस स्थानकावर उद्भवणाऱ्या अनेक समस्यांबाबत रीतसर पत्रव्यवहार करणार असल्याचे कळवले आहे.

15 TO 21 FEB 2021 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 13/02/2021 9:09 PM Page 1

पान १ वरून....

म्हातारीचे दागिने बघून धोब्याची...

नसलेले मानवी शरीराचे तुकडे तुकडे केलेले मानवी अवशेष होते. ही घटना समजाताच घटनास्थळी बघ्यांची गर्दी वाढली होती. वैभव कुंभार याने या घटनेची माहिती राजारामपुरी पोलीस स्टेशनला दिली. राजाराम तलावानजीक मानवी अवषेशाचे तुकडे असलेली प्लास्टिक पिशव्या असल्याची माहिती मिळताच राजारामपूरी पोलीस ठाण्याचे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सीतराम डुबल, उपनिरीक्षक सिताराम घुगे व त्याचे सहकारी आणि स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस घटनास्थळी दाखल झाले. राजाराम तलावाकडून सरनोबतवाडीकडे जाणाऱ्या उत्तरेच्या रस्त्याकडेला या दोन्ही पिशव्या पडलेल्या होत्या. पोलीसांनी घटनास्थळाची पाहणी करून या दोन्ही पिशव्या ताब्यात घेऊन घटनेचा पचंनामा सुरू केला होता. घटनेठिकाणी अप्पर पोलीस अधिक्षक तिरूपती काकडे यांनी भेट देऊन घटनेची माहिती घेऊन तपासाच्या योग्य त्या सुचना पोलीसांना केल्या. शीर नसलेल्या आणि मानवी शरीराचे तुकडे तुकडे केलेल्या अवषेशावरून पोलीसांनी मयत व्यक्तीचा अंदाज लावलेला होता. मयत खून झालेल्या व्यक्ती ही स्त्री किंवा पुरूष आहे हे सांगता येत नसले तरी हत्या करण्यात आलेल्या व्यक्तीच्या वयाचा अंदाज पोलीसांनी बांधलेला होता.हत्या झालेल्या व्यक्तीचे वय अंदाजे ७० ते ८० असावे असा अंदाज व्यक्त करून पोलीसांनी तपासाला सुरूवात केली. त्या अगोदर पोलीसांनी घटनास्थळावरून त्या दोन्ही पिशव्या ताब्यात घेऊन पोस्टमार्टमसाठी आणि रासायनिक पृथकरणासाठी पाठवून दिला. शीर नसलेल्या धडावरून आणि ते ही तुकडे तुकडे केलेल्या अवषेशावरून खून झालेली व्यक्ती कोण आहे याचा अंदाज लावणे तसे अवघडच होते. म्हणून या घटनेची माहिती जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशनला देऊन आपल्या पोलीस स्टेशनच्या हद्दीतून कुणी व्यक्ती मिसिंग आहे का? याची माहिती घेतली.असता.त्याचप्रकारे करवीर पोलीस स्टेशनला एक वयोवृध्द महिला बेपत्ता असल्याची नोंद गेल्या दोन तीन दिवसापूर्वी करण्यात आली होती. पोलीसांनी त्याच्या नातेवाईकांना पोलीस स्टेशनला बोलावून घेऊन घटनास्थळी मिळालेली साडी आणि पर्स दाखवली असता. त्या नातेवाईकानी ओळखून मयत महिला ही शांताबाई आगळे वय ८० रा.जगताप कॉलनी पाचगाव ही असल्याचे पोलीसाना सांगितले. मयत खून झालेल्या महिलेची ओळख पटल्याने पोलीसांना त्याची हत्या कुणी आणि कशासाठी केला याचा तपास करावयाचा होता. म्हणून त्याने शांताबाई आगळे यांच्या मुलीकडून माहिती घेतली असता. पोलीसांना या घटनेबाबत धक्कादायक अशी माहिती मिळाली. शांताबाई आगळे या दि.५ फेब्रुवारी पासून बेपत्ता होत्या.त्या दिवसी त्याच्या घरातून त्याच्या ओळखीच्या संतोष परीट नावाच्या व्यक्तीने त्याना देवदर्शनला नेतो असे सांगून नेले होते.एवढया माहितीवरून पोलीसांनी संतोष परीट याचा शोध घेण्याचे काम चालु केले असता तो घटना उघडकीस आल्यानंतर काही तासाच पोलीसांना मिळून आला.पोलीस त्याच्याकडे या घटनेची चौकशी करीत असताना त्याने त्याचा खून कोणत्या कारणातून आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. संतोष परीट हा मुळचा इचलकरंजी येथील असून गेल्या काही वर्षापासून तो कोल्हापूर येथील माळी कॉलनी टाकाळा परिसरात राहत आहे. या परिसरातच त्याचे इस्त्रीचे दुकान असून नागाळा पार्क येथे राहत असलेली शांताबाई आगळे यांच्या मुलीचे कपडे इस्त्री आणि धुलाई करण्याचे काम तो करीत होता.यातूनच त्याची ओळख ही शातांबाई आगळे याच्याशी झाली होती. गेल्या ४ ते ५ वर्षापासून त्याचे त्याच्या घरी येणे जाणे होते. शांताबाई आगळे या पाचगावात राहत असल्या तरी तो तेथे ही जात येत होता. त्यामुळे त्या ही त्याला चांगल्या ओळखत होत्या. गेल्या काही दिवसापूर्वी शांताबाई आगळे यांनी त्या राहत असलेल्या पाचगावातील घर विकले होते. त्यातून मिळालेल्या रक्कमेतून त्यांनी दागिने करून घेतले होते. सध्या त्या पाचगाव येथेच भाडयाचे घर घेऊन राहत होत्या. त्यांना अनिता जगताप आणि शर्मिला साळोखे या दोन मुली अनिता जगताप या मंगळवार पेठ येथे राहतात तर शर्मिला साळोखे या नागाळा परिसरात राहतात.नागाळा परिसरात राहणाऱ्या शर्मिला साळोखे याच्याबरोबर संतोष परीट यांची चांगली ओळख होती. शांताबाई या आपल्या दोन्ही मुलीकडे सारख्या येत होत्या. त्याच्याकडे त्या बरेच दिवस राहत ही होत्या. संतोष परीट हा त्याच्या घरी इस्त्रीचे कपडे ने आण करण्या करीत येत जात असल्याने शांताबाई याच्या कडील दागिने पाहून मती फिरली होती. तसा तो कर्जबाजारी असल्याने शांताबाईचे दागिने मिळवून आपण आपले कर्ज फेडू असे त्याला वाटत होते. सरळ मार्गाने शांताबाईकडे किंवा त्याच्या मुलीकडे दागिने अथवा पैसे मागितले तर ते त्याला देणार नव्हत्या याची त्याला खात्री होती. शांताबाईचे वय जवळपास ८० होत आले होते. या वयात त्या एवढे दागिने घालून काय करणार आहेत.शिवाय त्याच्या मुलीची परिस्थिती ही सधन आहे त्यामुळे त्याना या दागिन्याचा काहीच उपयोग नाही. आपण ते दागिने मिळवून आपण आपले कर्ज फेडू असा विचार त्याच्या मनात येत होता. म्हणून त्याचा डोळा हा शांताबाईच्या दागिन्यावर होता. ते दागिने कसे मिळवायचे याचा तो सतत विचार करायचा. पण त्याला त्यातून मार्ग काही सापडत नव्हता. त्याने आता हे दागिने मिळवण्यासाठी वेगळा विचार केलेला होता. आणि तो विचार त्याने अंमलात आणण्याचे ही ठरविले होते. त्यानुसार त्याने तसा प्लॅन ही केला. शुक्रवार दि.५ फेब्रुवारी तो पाचगाव येथे शांताबाई राहत असलेल्या त्याच्या घरी गेला. त्याच्याशी गोड बोलून त्याने त्याना मी तुम्हाला देवदर्शन करून आणतो असे सांगून त्याना आपल्या गाडीवर बसविले. त्यावेळी शांताबाई याच्या अंगावर नेहमीप्रमाणे दागिने ही होतच. त्याच्या अंगावरील दागिने काढून घ्यायचाा त्याचा प्लॅन होता.पण त्या सरळ मार्गानी त्याला दागिने देणार नाहीत हे ही त्याला माहित होते. म्हणून त्याने त्याना आपण राहत असलेल्या टाकाळा परिसरातील राजलक्ष्मी अपार्टमेंटमध्ये आणले. तेथे त्याना गोड बोलून आपण काही वेळात देवदर्शनला जावू असे सांगून त्यांना घरीच थांबवले त्यानंतर संध्याकाळी ८ नंतर त्याने त्याचा गळा दाबून धरला त्यासारशी त्या ओरडू लागल्यावर त्याने त्यांच्या अंगावर ॲसिड टाकले. त्या अगोदरच वयोवृध्द असल्याने जागीच तडफडत होत्या. त्याने त्याच्या अंगावरील सर्व दागिने काढून घेतले त्यांचा मृत्यू झाल्याची खात्री होताच त्यांच्या डोक्यात त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा विचार येऊ लागला. कारण आपण या प्रकरणात सापडलो तर अडचणीत येऊ आणि नंतर आपण आपले कर्ज ही फेडू शकणार नाही याचा त्याने विचार केला. तो त्या अपार्टमेटमध्ये भाडयाने एकटाच राहत असल्याने त्याच्या रुममध्ये इतर कुणी नव्हते.याचाच फायदा घेत त्याने त्याच्या शरीराचे आपल्या कडील धारदार शस्त्राने बारीक बारीक तुकडे केले.आणि ते प्लॉस्टिकच्या वेगवेगळ्या दोन पिशवीत भरले. रात्रीच्या सुमारास त्याने त्या दोन्ही पिशव्या घेऊन राजाराम तलावाजवळ आला.सरनोबतवाडीकडे जाणाऱ्या उतरेकडच्या निर्जन स्थळी झाडाझूडपात त्याने वेगवेगळ्या दोन्ही पिशव्या टाकून दिल्या.त्याने हे नीच कर्म केल्यानंतर घरी जावून शांत झोपला. दुसऱ्या दिवशी त्याने त्या दागिन्यावर एका बॅकेतून १३ हजाराचे कर्ज काढले आणि तो निश्‍चित झाला. त्याच्या डोक्यावरचा थोडाफार बोजा कमी झाला होता. परंतू खून हा खूनच असतो तो कधी लपत नसतो तो कधी ना कधी उजेडात येत असतो आरोपी किती जरी हुशार आणि चालाख असले तरी ते आरोपी पर्यत पोहचतात हे त्याला माहित नव्हते. इकडे शुक्रवारपासून आपली आई बेपत्ता असल्याची तक्रार शर्मिला साळोखे यांनी करवीर पोलीस स्टेशनला दिली होती. संतोष परीट कडे ही त्यांनी आपल्या बेपत्ता आई विषयी चौकशी केल्या होत्या. पण त्याने आई शांताबाईना देवदर्शन करून त्याच्या पाचगाव येथील घरी सोडल्याचे तो त्यांना सांगत होता. त्याना तो खोटे बोलून त्याची दिशाभूल तो करीत होता. हे त्या दोघींच्या ही लक्षात येत नव्हते. आपल्या परीने त्याचा सगळीकडे शोध घेऊन आणि नातेवाईकाकडे चौकशी करून ही त्या सापडत नसल्याने त्यांनी आई शांताबाई आगळे या बेपत्ता झाल्याची तक्रार करवीर पोलीस स्टेशनला दिली होती. करवीर पोलीस ही आपल्या परीने तपास करीत असताना राजारामपुरी पोलीसांना राजराम तलावाजवल मानवी अवशेष तुकडे तुकडे केलेल्या अवस्थेत दोन प्लास्टिक पिशव्या मिळाल्या आणि येथेच त्याच्या हत्येचा उलघडा पोलीसांना झाला. पोलीसांनी संतोष परीट याचा शोध घेऊन त्याच्याकडे या घटनेची चौकशी करीत असताना तो पोलीसांना उडवाउडवीची उत्तरे देत होता. पोलीसांनी त्याला आपला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल केला होता. त्याने पोलीसांना दिलेल्या माहितीनुसार त्याच्या अंगावर कर्जाचा बोजा झालेला होता. त्यातून बाहेर कसे पडायचे हे त्याला कळत नव्हते.तो मयत शांताबाई आगळे याच्या घरी जात येत असल्याने त्याची आणि त्याची ओळख होती. त्या वयोवृध्द असून आपल्या अंगावर जास्त सोन्याचे दागिने घालत असतात.त्याचे सोने चोरून आपण आपले कर्ज फेडावे असे त्याच्या डोक्यात विचार येत असल्याने त्याने त्यांना गोड बोलून दागिने चोरण्यासाठी नेले आणि आपल्या घरातून नेऊन त्याचा गळा दाबून खून केला त्यानंतर पुरावा नष्ट करणेसाठी त्याच्या अंगावरील सोने काढून घेऊन त्याच्या शरीराचे तुकडे करून ते राजाराम तलावाजवळ प्लास्टिक पिशीवीत भरून टाकल्याचे त्याने कबुल केले. त्याच्या कबुलीनंतर पोलीसांनी त्याला घटनास्थळी नेऊन फिरवले होते. त्याने दाखविलेल्या ठिकाणी पोलीस मयत शांताबाई याच्या इतर अवयावाचा शोश्र घेत होते.याच परिसरात १०० मीटर अंतरावरील झाडाझूडपात पोलीसांना मयताचे डोक्याचे अवशेष मिळाले तेथून १०० ते १५० अंतरावर एका गोणपाटात त्यांना मयताच्या डाव्या ाहाताचे अवशेष मिळून आले. या घटनेनंतर तो आपले कर्ज भागवून कोल्हापूरातील भाडयाचे घर सोडून पळून जाणार होता अशी ही त्याने माहिती दिली.शर्मिला साळोखे याच्या फिर्यादीवरून राजारामपुरी पोलीसांनी शांताबाई आगळे (वय ८०) याच्या निर्घृण खून प्रकरणी संतोष निवृत्ती परीट (वय ३५) रा.टाकाळा कोल्हापूर याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ व अन्य कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.न्यायालयासमोर उभे केले असता. मा.न्यायालयाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. या किचकट घटनेचा तपास अप्पर पोलीस अधिक्षक तिरूपती काकडे,शहर पोलीस उपाधिक्षक मंगेश चव्हाण, प्रशिक्षणार्थी पोलीस उपाधिक्षक साहिल झारकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरी.तनाजी सावंत, राजारामपुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरी.सीतराम डुबल, करवीर पोलीस स्टेशनचे संदीप कोळेकर, यांच्या मार्गदर्शनाखाली अनिल गुजर, स.पो.नी.सत्यराज घुले, जवंजाल, उपनिरीक्षक विवेकानंद राळेभात,विनायक सपाटे, समाधान घुगे, कर्मचारी अमित सर्जे, सागर कांडगावे, अमोल कोळेकर, संदीप कुंभार, राम कोळी, अजय वाडेकर, सुरेश पाटील, अर्जुन बंदरे, तानाजी गुरव, फिरोज मुल्ला व खराडे यांनी करून घटनेच्या काही तासातच संशयीत आरोपी संतोष परीट याला ताब्यात घेऊन त्याच्या मुसक्या आवळल्या होत्या. या घटनेत कोणताही पुरावा नसताना पोलीसांनी समय सुचकता दाखवत योग्य तपास करून आरोपीला जेरबंद केल्याने त्याचे अभिनंदन होत आहे. हल्ली चेन स्केचर सारखे गुन्हे वाढलेले आहेत त्यातच वयोवृध्द लोकांना फसवून त्याचे कडील सोन्याचे जिन्नस रोख रक्कम ही हडप केली जात आहे. त्यातच संतोष परीट सारखे लोक कर्जबाजारी झाल्याने समोरच्याचा विश्वास संपादन करून त्याचा अशा प्रकारे विश्वासघात करीत असल्याने वयोवृध्द लोकांनी त्याच्यापासून सावध राहावे. अन्यथा त्याचे कडून जीवाला धोका होवू शकतो हेच या घटनेवरून दिसून येते.

मुला समान मानून ज्याला दिला...

रहात होते. एकंदरीत त्यांचे ऐश्वर्य आणि धनसंपदा वरणगाव परिसरात जगजाहीर होती. त्यांचा चिरंजीव राकेश जळगाव पोलिस दलात आणि सुनबाई ऑर्डनन्स फॅक्ट्रीत केंद्र सरकारच्या सेवेत आहे. चांगो झोपे यांची पेन्शन व शेतीसह प्लॉट खरेदी विक्रीचा व्यवसाय, मुलासह सुनेचा दुहेरी पगार अशा चौपदरी मार्गाने लक्ष्मीचा ओघ झोपे परिवारात सुरु होता. एकंदरीत झोपे परिवाराचे सर्व काही व्यवस्थित सुरु होते. चांगो झोपे यांनी वरणगाव परिसरात सर्वासोबत सलोख्याचे संबंध निर्माण केले होते. चांगो झोपे रहात असलेल्या घराजवळ खिडकी मोहल्ला भागात शेख समीर शेख कादीर आणि शेख जावेद शेख खलील हे दोघे तरुण रहात होते. समीर हा बांधकाम ठेकेदार तर जावेद हा मजुर होता. समीर आणि जावेद हे दोघे जवळचे नातेवाईक देखील होते. ठेकेदार समीर हा राकेश झोपे याचा बालपणापासूनचा मित्र होता. त्यामुळे दोघे एकमेकांना चांगल्या प्रकारे परिचित होते. त्या माध्यमातून समीरचे झोपे परिवाराकडे नेहमी येणे जाणे होते. हळूहळू समीरने राकेशचे सेवानिवृत्त वडील चांगो झोपे यांचा विश्वास संपादन केला होता. चांगो झोपे यांचा वरणगाव परिसरात दांडगा जनसंपर्क होता. त्यांच्या ओळखीने समीर शेख यास बांधकामाचे कंत्राट मिळत होते. चांगो झोपे यांच्या माध्यमातून मिळणाऱ्या बांधकाम कंत्राटामुळे समीर व जावेद या दोघांची अर्थव्यवस्था बऱ्यापैकी चालत होती. लवकरच समीर शेख हा चांगो झोपे व राकेश झोपे या पिता पुत्रांचा एक विश्वासू सहकारी झाला. कित्येक वेळा समीरच्या विश्वासावर चांगो झोपे अथवा त्यांचा मुलगा राकेश घर सोडून जात होते. जानेवारी महिन्यात सुट्यांचा अंदाज घेत राकेशने पत्नीसोबत गोवा येथे फिरायला जाण्याचा बेत आखला. प्रवासाचे नियोजन करत २३ जानेवारी रोजी राकेश त्याच्या पत्नीसह गोव्याच्या दिशेने रवाना झाला. मुलगा व सुन गोव्याला तर नात, नातू मामाच्या गावी गेल्यामुळे चांगो झोपे घरी एकटेच होते. दरम्यान चांगो झोपे यांच्या एका परिचिताचे वरणगाव येथे बांधकाम सुरु होते. त्या बांधकामाचे कंत्राट चांगो झोपे यांच्या माध्यमातून समीर यास मिळाले होते. त्या बांधकामासाठी लागणारे साहित्य आणण्याकामी जवळपास ६५ हजार रुपयांची रोकड चांगो झोपे यांच्याकडे जमा असल्याचे म्हटले जाते. झोपे यांच्याकडे सुमारे ६५ हजार रुपये असल्याचे समीर यास समजले होते. राकेश सपत्नीक गोव्याला गेल्यामुळे घरात त्याचे वडील एकटेच रहात होते. काही दिवसांनी घरातील ६५ हजार रुपयांची रोकड त्यांना आढळली नाही. ती रक्कम कुठे गेली असा प्रश्न त्यांना पडला. घरातील ६५ हजार रुपये कुठे गेले असा थेट प्रश्न त्यांनी समीर शेख यास केला. त्यावर आपल्याला काही माहिती नाही असे म्हणत समीरने हात वर केले. आपण ते पैसे घेतले नाही, आपल्याला काही माहिती नाही असे समीर म्हणत असला तरी चांगो झोपे यांना त्याच्या बोलण्यावर आता विश्वास बसत नव्हता. झोपे यांच्या संशयाची सुई समीरच्या दिशेने जात होती. बराच वेळ या विषयावर खल केल्यानंतर त्यांनी समीर यास म्हटले की माझा मुलगा राकेश आल्यावर या विषयाचा सोक्षमोक्षच लावतो. राकेश आल्यावर मी सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासून बघतो आणी मगच खरा प्रकार काय आहे ते समोर आणतो. गोव्याहून घरी आल्यानंतर राकेशने सीसीटीव्ही फुटेज तपासल्यास व त्यात आपला सहभाग उघड झाल्यास आपले पितळ उघडे पडेल अशी भिती समीर यास सतावू लागली. चोराच्या मनात चांदणे या म्हणीप्रमाणे समीरचे मन त्याला खावू लागले. आठ दिवसांची सुटी काढून राकेश सपत्नीक गोवा येथे गेला होता. दरम्यानच्या कालावधीत चांगो झोपे यांच्याकडून समीरकडे त्या ६५ हजाराचा तगादा सुरुच होता. मला उद्याच्या उद्या पैसे हवेत असा तगादाच चांगो झोपे यांनी समीरकडे लावला होता. त्या तगाद्याला समीर वैतागला आणी बेजार झाला होता. राकेश गोव्याहून परतण्यापुर्वी त्याचे वडील चांगो झोपे यांचा जावेदच्या मदतीने कायमचा काटा काढण्याचे समीरने मनाशी ठरवले. २९ जानेवारी रोजी राकेश व त्याची पत्नी गोव्याहून परतीच्या प्रवासाला निघाले. त्याच दिवशी समीर व जावेद यांनी चांगो झोपे यांना या जगातून हद्दपार करण्याचे नियोजन केले होते. समीर व जावेद यांनी चांगो झोपे यांना रावेर तालुक्यातील पाल येथे जातांना लागणाऱ्या घाटात दगडाने ठेचून फेकून देण्याचे नियोजन केले. सावदा येथे कपाशीच्या व्यापाऱ्यांकडून आपल्याला मोठी रक्कम मिळणार असल्याचे समीरने झोपे यांना सांगितले. त्यासाठी आपल्याला सावदा व पुढे पाल येथे जावे लागणार असल्याचे झोपे यांना सांगण्यात आले. आपल्याला आपली रक्कम मिळणार असल्याचे समजून झोपे यांनी समीर सोबत सावदा येथे जाण्याची तयारी दर्शवली. समीरने त्यांना कारमधे बसण्यास सांगीतले. त्यांच्यासोबत जावेद देखील कारमधे बसला. तिघे जण मुक्ताईनगरमार्गे सावदा येथे जाण्यास रवाना झाले. झोपे यांना ठार करण्यासाठी दोघांनी अगोदरच एक वजनदार दगड गाडीत आणून ठेवला होता. समीर व जावेद या दोघांनी मिळून चांगो झोपे यांना दुपारपर्यंत बोलण्यात मग्न ठेवून मस्कावद विवरा, उटखेडा, कुसुंबा, लाल माती व पाल तसेच मध्य प्रदेशातील ब्रिस्टोन या गावापर्यंत फिरवले. या सर्व प्रकारात दुपारचे तिन वाजुन गेले. समीर व जावेद यांनी यापुर्वी सावदा येथील एका खासगी शाळेचे व एका सभागृहाचे बांधकाम केले होते. त्यामुळे दोघांना या परिसराची चांगल्या प्रकारे माहिती होती. अखेर दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास बोर घाटातील एका निर्जनस्थळी व्ही पॉईंटजवळ चांगो झोपे यांच्या डोक्यात जवळपास तिन ते चार किलो वजनाचा दगड घालून त्यांचा चेहरा छिन्नविच्छीन्न करण्यात आला. कारमधेच दोघांनी मिळून झोपे यांची हत्या केली. आपल्याला व्यापाऱ्यांकडून पैसे मिळणार असल्याचे खोटे सांगून त्यांना फसवून आणले गेले होते. त्यांची अशा रितीने हत्या करण्यात आली. मुलाचा बालपणीचा मित्र असलेल्या समीरनेच झोपे यांची हत्या केली होती. ज्याच्यावर विश्वास ठेवला तोच आपली हत्या करेल असा विचार देखील चांगो झोपे यांच्या मनात आला नसेल. या हत्येनंतर त्यांच्या बोटातील सोन्याच्या तिन अंगठ्या, चांदीची एक अंगठी, गळ्यातील सोन्याचे लॉकेट, मुखात बसवलेले दोन सोन्याचे दात देखील दोघांनी काढून घेतले. हा सर्व ऐवज लाखो रुपयांच्या घरातील होता. त्यांचा मोबाईल फेकून देण्यात आला. एवढे सर्व झाल्यानंतर समीर व जावेद यांनी चांगो झोपे यांचा मृतदेह खोल दरीत फेकून देत तेथून पलायन करत वरणगाव गाठले. सर्व्हिस सेंटरवर जावून त्यांनी गाडीची वाशींग करत सर्व रक्ताचे डाग धुवून टाकले. स्थानीक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक किरणकुमार बकाले यांनी वरणगाव पोलिसांसह आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने वरणगाव येथील मुख्य मार्गावरील सीसीटीव्ही फुटेज तपासणीला सुरुवात केली. मयत चांगो झोपे हे बेपत्ता झाल्याच्या तारखेपासून सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात आली. त्यात एका खासगी क्लास व पेट्रोल पंपाच्या सिसीटीव्हीचा आधार घेण्यात आला. त्या तपासणीत एका चारचाकी वाहनात (एमएच १२ केए ३१८१) चांगो झोपे व त्यांच्यासोबत दोघे जण दिसून आले. तपासकामी हाच धागा पकडून पुढील तपासाला चालना देण्यात आली. पोलिस अधीक्षक डॉ.प्रविण मुंढे, अप्पर पोलिस अधीक्षक चंद्रकांत गवळी, उपविभागीय पोलिस अधिकारी विवेक लावंड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक किरणकुमार बकाले, सावदा पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक डी.डी. इंगोले व वरणगाव पोलिस स्टेशनचे स.पो.नि. संदीपकुमार बोरसे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार तसेच सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे समीर शेख व त्याचा साथीदार जावेद शेख या दोघांना चौकशीकामी ताब्यात घेण्यात आले. चौकशी दरम्यान दोघांनी पो.नि.किरणकुमार बकाले यांना कथन केले की आम्ही चांगो झोपे यांना पाल या गावाजवळ सोडले होते. त्यावेळी त्यांनी म्हटले होते की मला पाल येथे चार दिवस लागतील. त्यामुळे आम्ही त्यांना तेथेच सोडून परत निघून आलो. दोघेही उडवाउडवीची उत्तरे देत असल्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक किरणकुमार बकाले यांच्या लक्षात येण्यास वेळ लागला नाही. त्यांनी दोघांना पोलीसी खाक्या दाखवण्यास सुरुवात केली. त्यानंतर दोघांनी आपला गुन्हा कबुल करण्यास सुरुवात केली. त्यांनी खरा प्रकार कथन करत खूनाचा गुन्हा कबुल केला. दोघांना रावेर न्यायालयात हजर करण्यात आले. रावेर न्यायालयाने त्यांना सुरुवातीला तिन दिवस पोलिस कोठडी सुनावली. दोघे सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

पान ८ वरून....

पर्यटन विकासाच्या माध्यमातून...

विकास करण्यात येणार आहे. आदिवासी संस्कृती व परंपरा जपून समाजाचा विकास करण्यावर शासनाचा भर आहे. जिल्ह्यात दळणवळण, रोजगार, पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले. जव्हार तालुक्यातील जामसर प्राथमिक आरोग्य केंद्राची आज मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी पाहणी केली. प्रवेशद्वारावर असलेल्या फळ्यावर लिहिलेल्या हस्ताक्षराबद्दल विचारणा करून कलाप्रेमी असल्याचे दिसून आले. सर्व वैद्यकीय कक्षाची पाहणी झाल्यानंतर विविध रंगात काढलेली रांगोळीतील बाळासाहेब ठाकरे यांचे चित्र पाहून मुख्यमंत्री आनंदित झाले. चित्रकार राहुल श्रीराम सहाने या विद्यार्थ्यासोबत आलेले कलाशिक्षक प्रवीण अवतार यांचीही चौकशी केली. पालघर जिल्ह्यातील वारली चित्रकला अधिक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यातील चित्रांना संकल्पना देऊन विविध रंगात रंगविण्यात यावी यासाठी मुलांचे लहान गट करण्यात यावेत तसेच ही कला नव्या पिढीपर्यंत देण्यासाठी प्रयत्न करावेत अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली. रांगोळी कला ही चित्रकलेपेक्षा कठीण असून त्यात खूप मेहनत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले, जव्हार दौऱ्यावरून मुख्यमंत्री यांचे कला प्रेम दिसून आले. यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा भारती कामडी, महिला अर्थिक महामंडळाच्या अध्यक्षा ज्योती ठाकरे, खासदार राजेंद्र गावित सर्वश्री आमदार श्रीनिवास वानगा, सुनिल भुसारा, रविंद्र फाटक, कोकण विभागाचे आयुक्त अण्णासाहेब मिसाळ कोकण परिषेत्र पोलीस महानिरक्षक. संजय मोहिते जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धाराम सालीमठ, वसई विरार महानगर पालिका आयुक्त डी. गंगाथरण, सहायक जिल्हाधिकारी अशिमा मित्तल, पी.नायर तसेच अधिकारी व नागरिक उपस्थित होते.

कोरोना काळात पोलिसांचे योगदान...

संजय येनपुरे, उल्हासनगरचे पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते यावेळी पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सी.ए. हेमंत गोगटे यांनी सूत्रसंचालन केले, तर गणपत पाटील यांनी स्वागत करुन सुमती पाटील यांनी प्रास्तविक केले आणि शेवटी वासुदेव धुरी यांनी आभार प्रदर्शन केले. पोलिसां प्रती समाज असंवेदनशील होत आहे. अशा वेळी तीस चाळीस तास चौका चौकात सेवा बजावणाऱ्या पोलिसांच्या पाठीशी उभा राहाण्याची जाणीव सुमती पाटील यांच्या सारख्याना होते आणि त्या अतिशय प्रेमाने, निरपेक्ष भावनेने, आपुलकीने पोलिसांच्या मदतीसाठी धावून येत असतात. पोलिसांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करीत असतात. हे कार्य करतांना त्यांच्यामध्ये कोणताही स्वार्थ नसतो, की गर्व आणि दर्प नसतो हे महत्वाचे आहे. अशा व्यक्ती समाजाने घडवाव्यात असे आवाहन पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीस केले.कोणताही बडेजाव अथवा स्वार्थ न पहाता सुमती पाटील यांनी पोलीस आणि यंत्रणेला तन, मन, धनाने मदत केली. आपुलकी, प्रेमाची, मायेची थाप आमच्या सर्वांच्या पाठीवर घातली म्हणूनच आज त्यांच्या आत्मचरित्राच्या प्रकाशनासाठी आवर्जून आलो असल्याचे विवेक फणसळकर यांनी सांगितले. लेखक प्रशांत असलेकर, चित्रकार अनिल डावरे आणि मुद्रक गिरीश सोमणी यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी सहायक पोलीस आयुक्त विनायक नरळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर भोगे, संजय धुमाळ, सुनील जाधव, लक्ष्मण सारीपुत्र, पालिकेचे अतिरिक्त मुख्याधिकारी डॉ. धीरज धुमाळ, तहसीलदार जयराज देशमुख, नायब तहसीलदार संभाजी शेलार, पतपेढीचे उपाध्यक्ष अप्पा धुरी, प्रमोद नाटेकर आदी उपस्थित होते.

'बाप तो बापच असतो'

बाप तो खरा बापच असतो याचा मला प्रत्यय आला आहे. मी कोरोनमुळे आजारी होतो. सेवा बजावत असताना कधी बाधा झाली हे कळलेच नाही. मात्र अशा वेळी स्वतःसह कुटुंब बाधित असूनही स्वतः पोलीस आयुक्त फणसळकर साहेब माझ्या सारख्या सेवा बजावणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची आस्थेने विचारपूस करीत होते. म्हणूनच आम्हाला मानसिक बळ मिळाले. अशी विचारपूस केवळ बापच करू शकतो, आणि आम्हाला असा बाप लाभल्याने आम्ही स्वतःला फार भाग्यवान समजतो. अशा शब्दांत पोलीस हवालदार अजय धांडे यांनी या कार्यक्रमात आपल्या भावना व्यक्त केल्या. सुमतीताई या खऱ्या माई आहेत त्यांनीसुद्धा आम्हा सर्वाना प्रेम दिले. केवळ वरिष्ठ अधिकाऱ्यांची विचारपूस न करता आमच्या सारख्याना भर चौकात त्या आमची विचारपूस करून आम्हाला चहा, नाश्ता, जेवण देत असत. इतकेच नव्हे तर औषधे सुद्धा देत असल्याचे अजय धांडे यांनी सांगितले. आज आपले वरिष्ठ अधिकारी उपस्थित असताना आपण बोलण्याचे धाडस करीत आहोत त्याबाबत आधीच माफी मागतोय असे म्हणत त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.अजय धांडे यांच्या उत्स्फूर्त भाषणाची दखल घेत त्यांचा पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

भिवंडी शहराला पाणीपुरवठा ...

पाणीपुरवठा विभागाचे प्रभारी कार्यकारी अभियंता संदीप पटनावर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी पाण्याला दुर्गंधी येत असल्याचे काबुल करीत किनाऱ्यावरील घाटाच्या स्वच्छतेचे काम सुरू केले आहे परंतु लवकरच तराफा वरील पोकलनद्वारे तलावातील गाळ काढून स्वच्छता करण्यासाठीच प्रस्ताव तयार करण्यात येत असून त्यास मंजुरी मिळताच तलावांची स्वच्छता केली जाणार असल्याची माहिती देतानाच तलावात कपडे व वाहने धुण्यास मनाई करणारे फलक लावून दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा सुध्दा देण्यात आल्याचे स्पष्ट केले.

प्रथम महिला महापौर प्रविणाताईंनी ...

तर काशिनाथ (दादा) पाटील साहेबांनी सर्वाच्या समवेत स्नेह भोजन करून उपस्थितांचा आनंद द्विगुणित केला. ही महिला सहल यशस्वी करण्यासाठी निलीमा राघव, कल्पनाताई परेल, शोभा शर्मा, पुष्पा पायगुडे, शोभा गवळी, वंदना वाघमारे, पुजारीताई, सुप्रिया चव्हाण, सरिता पाटील, मेस्त्रीताई, विद्दा गालफाडे, सुनिता वाघमारे, मेरी डिसोझा, ताई गालफाडे, अर्चनाताई गावडे, नम्रता जांभळे यांनी परिश्रम घेतले.

राष्ट्रीय आयोगाला साक्ष...

मारेकऱ्यांची नावे पोलीसांना सांगूनही त्यांनी मुख्य आरोपींना वाचवण्यासाठी गणपत तुंबडा, अशोक आणि दिलीप तुंबडा यां आदिवासींना गोवले होते. या आदिवासींचा गुन्हा कबुल करण्यासाठी तुरुंगात छळ करण्यात आला होता. जामीनावर सुटका झाल्यावर गणपत व अशोकचा मृत्यू झाला तर दिलीपला कायमचे अपंगत्व आले होते. यादव म्हात्रे यांचे बंधु आणि या प्रकरणातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार गंगाधर म्हात्रे यांच्या साक्षीवरून या आदिवासींची निर्दोष मुक्तता झाली होती. त्यामुळे या आदिवासींना नाहक गोवणाऱ्या राज्य गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरिक्षक सुदर्शन एरागुंठाराव आणि एस.एम.पिंपळकर यांच्यावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी भुमी सेनेचे काळुराम धोदडे, राजु पांढरा आणि विश्व मानव कल्याण परिषदेचे रामजी महेश्वरी संजोट यांनी राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाकडे केली होती. त्यानंतर गंगाधर म्हात्रे यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला होता.त्यात त्यांच्या पायाला गंभीर दुखावत होवून दोन महिने हॉस्पीटलात ते दाखल होते. हा हल्ला भावाच्या मारेकऱ्यांनी केल्याची तक्रार म्हात्रे यांनी केल्यानंतर त्यांना विनामुल्य पोलीस संरक्षणही देण्यात आले होते. मात्र, त्यानंतर हे संरक्षण काढून घेण्यात आले. आता हा खटला अंतीम टप्प्यात आला आहे. गेली ३२ वर्षे म्हात्रे एकाकी लढा देत आहेत. त्यासाठी त्यांनी स्वतःची मालमत्ताही विकली. नुकतीच त्यांची राष्ट्रीय आयोगापुढे नोंदवण्यात आली. त्यामुळे मारेकरी संतप्त झाले असून, कोणत्याही क्षणी ते माझा खून करतील. अशी याचिका म्हात्रे यांनी पोलीसांकडे करत संरक्षणाची मागणी केली आहे.मैत्री संस्थेचे सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीराचे वसईत उद्घाटन होते. त्यावेळी कामगार नेते भाऊ जगताप आणि उच्च न्यायालयातील जेष्ठ विधीज्ञ ॲड.पी.एम.व्यास उपस्थित होते. त्यांच्यासमोर म्हात्रे यांनी जाहीरपणे आपल्या खूनाची भिती व्यक्त केली. त्यावर आम्ही तुमच्या पाठीशी असल्याचे जगताप आणि व्यास यांनी सांगितले.

लातूर जिल्ह्यात कला पथकाव्दारे ...

बहुउद्येशिय सेवाभावी संस्था, शिरोळ (वा) निलंगा,औराद शाहजानी, अंबूलगा, निटूर, पानचिंचोली, कासार शिरसी, शिरोळ,जाजणूर, ननंद, गौर, व टाकळी. उदगीर तालूका: जय मल्हार सांस्कृतिक कला मंडळ सोमनाथपूर ता. उदगीर- उदगीर, हंडरगुळी, निडेबन, वाडवना (बु), डोंगरशेळकी, नळगीर, अक्कलकोंडा, गुडसुर, हाळी, हेर व दावनगाव. चाकूर तालूका: स्वरसाधना भजनी मंडळ, कैलास नगर, लातूर- चाकूर, नळेगाव, उजळंब, शेळगाव, अंजनसोडा (बु), हाडोळी, नागेशवाडी, रावन्नावाडी, रोहीणा, कबनसांगवी व महाळंग्रा.अहमदपूर तालूका-गितादेवी ग्रामिण विकास शिक्षण संस्था,केशव नगर, लातूर-हाडोळती, शिरुर ताजबंद, किनगाव, अहमदपूर, गुटेवाडी, उजना, गुगदळ, ढाळेगाव, चिखला, मोघा व आंबेगाव. देवणी तालूका : जिवन सामाजिक विकास प्रतिष्ठाण, डिगोळ ता.शिरुर अनंतपाळ-देवणी, वलांडी, गुरनाळ, सावरगाव, आंबेगाव, नागराळ, धनेगाव, विळेगाव, बोळेगाव व लासोना. शिरुर अनंतपाळ तालूका : मानव विकास अभियान, ता.जि.लातूर- साकोळ, शिरुर अनंतपाळ, बिबराळ, जवळगा, साकोळ, हालकी, चांबरगा, अंकूलगा सय्यद, येरोळ व हिप्पळगाव. जळकोट तालूका : दयासागर बहुउद्येशिय सेवाभावी संस्था, धोंड हिप्परगा, ता.उदगीर- अतनूर, जळकोट, कुनकी, हळद वाडवण, रावणकोळा, तिरुका, घोणसी, कोळनूर, वडगाव व लाळी (बु) आहेत. तरी लातूर जिल्हयातील नागरिकांनी कोरोना आजार प्रतिबंधात्मक मार्गदर्शक सूचना व शासकीय योजनांची उपरोक्त कलापथकांच्या पथनाटयातील आविष्काराच्या माध्यमातून माहिती घ्यावी, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी, लातूर यांनी केले आहे.

तालुक्यातील होरबिगर कंपनी ...

लेटरबाजी केली जाणार नाही. कामगारांचा मानसिक व शारीरिक छळ कधी केला जात नाही, यापुढे ही केला जाणार नाही.कंपनी बंद केली जाणार नाही, प्रासंगिक पत्रव्यवहार उभयपक्षी स्विकारला जाईल. कंपनीतील चालु स्थितीतील मशिन बाहेर नेल्या जाणार नाहीत, बंद स्थितीतील मशिन बाहेर नेतांना युनियनशी चर्चा केली जाईल, कामगारांना भविष्य निर्वाह निधी नियमानुसार व कायदेशीर दिला जाईल, कंपनी मालकी हक्क व स्थलांतरा बाबत आगाऊ माहीती देण्यात येईल, कामगारांशी चर्चा करून प्रश्न सोडविले जातील. तहसीलदार डॉ.उध्दव कदम, कामगार आयुक्त किशोर दहिफळकर, सहायक कामगार आयुक्त संकेत कानडे, पोलिस निरीक्षक सुधीर संखे, भाजपचे जेष्ठ नेते बाबाजी काठोळे, प्रशांत पाटील, कंपनी मॅनेजर संतोष देशमुख यांच्या यशस्वी मध्यस्थीनंतर लेखी आश्वासन देण्यात आले. मयुर लबडे, रुपेश पाटील, नवनाथ मोर, भक्तीदास भोईर, दिक्षा पाटील आदी कामगार उपोषणास बसले होते. कंपनी व्यवस्थापना कडुन दिलेल्या लेखी आश्वासना नंतर कामगारांनी समाधान व्यक्त केले आहे.

गुंदवली ग्रामपंचायतीवर रोशनी ...

केला व गावातून वाजत गाजत भव्य मिरवणूक देखील काढली होती. दरम्यान आमचे नेते माननीय सुरेश म्हात्रे यांनी आमच्यावर जो विश्वास दाखविला आहे. त्या विश्वासाला आपण कधीही तडा जाऊ देणार नाही तसेच गावाच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू अशी प्रतिक्रिया नवनिर्वाचित सरपंच रोशनी पाटील यांनी दिली आहे. तर गावकऱ्यांनी दाखविलेल्या विश्वासामुळे आज गावात ग्रामपंचायतीवर सेनेची एकहाती सत्ता आली असून गावच्या विकासासाठी हे सर्व नवनिर्वाचित सदस्य प्रामाणिक प्रयत्न करतील अशी मला आशा आहे. त्यांच्या मार्गदर्शनासाठी व मदतीसाठी आपण सदैव प्रयत्नशील राहू अशी प्रतिक्रिया सेनेचे जैष्ठ कार्यकर्ते तथा ठाणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य व बांधकाम समितीचे सभापती सुरेश म्हात्रे बाळ्या मामा यांनी दिली आहे. यावेळी मनसेचे प्रदेश उपाध्यक्ष डी.के. म्हात्रे यांनी देखील नवनिर्वाचित सदस्यांचे अभिनंदन केले.

15 TO 21 FEB 2021 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 13/02/2021 9:09 PM Page 1

मोक्काअंतर्गत कारवाई मधील दोन वर्षांपासून फरारी असलेले वाळू माफिया, दरोडेखोर जेरबंद

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

मोक्का अंतर्गत कारवाई मधील दोन वर्षापासून फरारी असलेले अमित शरणप्पा भोसले (वय ३२), सुरज ऊर्फ सपर्या शरणप्पा भोसले (वय २५ दोघे रा.मिरी ता.मोहोळ जि सोलापूर) आदी वाळू माफिया दरोडेखोर यांना जेरबंद करण्यात सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले आहे. २३ एप्रिल २०१८ रोजी पहाटेच्या वेळी तांडोर ता. मंगळवेढा शिवारात वाळूचे साठा केलेल्या ठिकाणी कारवाई करणे कामी विशेष पथक गेले असताना यातील आरोपीत मजकूर यांनी पोलीस पथकास चिथावणी देऊन शिवीगाळ दमदाटी करून पोलिसांच्या अंगावर वाळूचा ट्रॅक्टर घालण्याचा प्रयत्न करून जीवे मारण्याची धमकी देऊन पोलिसांनी पकडलेला वाळूचा ट्रॅक्टर ट्रॉली बळजबरीने घेऊन गेले व स्वतःचे आर्थिक फायदेकरिता दांडपट्ट्याने धमकावून हवेत गोळीबार करून जवळ येण्यास मज्जाव करून सरकारी कामात अडथळा निर्माण केले म्हणून फिर्यादी पोलीस शिपाई सुरेश सुधाकर लामजाणे नेमणूक विशेष पथक सोलापूर ग्रामीण यांनी फिर्याद दिल्याने ती मंगळवेढा पोलीस ठाण्यात गुरनं १३९/२०१८ भादंविसंक ३९५, ३५३, ३०८ आर्म ऍक्ट ४(२५) मोक्का कायदा कलम ३(१)(२), ३(२),३(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी सोलापूर ग्रामीण जिल्हा पदभार स्वीकारल्यानंतर सोलापूर जिल्ह्यात बेकायदेशीर वाळू तस्करीबाबत आढावा घेऊन त्यात शासकीय अधिकारी व कर्मचारी व पोलीस पथकावर हल्ला करणाऱ्या गुन्हेगारांना पकडून कारवाई करण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांना सूचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक पाटील यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र मांजरे यांचे पथक तयार करण्यात आले होते. ९ फेब्रुवारी २०२१ रोजी स्थानिक गुन्हे शाखेला पाहिजे असलेल्या आरोपीच्या शोध घेणेकामी कामती पोलीस ठाण्याच्या हद्दीत सरकारी वाहनाने पेट्रोलिंग करीत माचनूर ता.मंगळवेढा येथे असताना तांत्रिक विश्लेषणवरून माहिती मिळाली की, मंगळवेढा पोलीस ठाण्याकडील मोक्का गुन्ह्यांतील पाहिजे असलेले दोन आरोपी हे मिरी ता मोहोळ शिवारातील एका शेतामध्ये असल्याचे समजले. त्याप्रमाणे मिळालेली माहिती वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र मांजरे व त्यांचे पथक कारवाई करण्याकरिता रवाना झाले. मौजे मिरी ता मोहोळ येथील बातमीच्या ठिकाणी उसाच्या शेतातील बांधावर दोन इसम संशयितरित्या मिळून आले. त्यांच्यापैकी एका इसमाच्या कमरेस दांडपट्ट्यासह हत्यारबंद अवस्थेत मिळून आला मिळून आलेले दोन्ही इसम हे मंगळवेढा पोलीस ठाण्याच्या मोक्यातील फरारी आरोपी हे मोक्यासारख्या गंभीर गुन्ह्यात फरारी असतानाही त्यांनी त्यांचे इतर साथीदारांसह मंद्रुप पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्वस्तात स्वस्त सोने देण्याच्या बहाण्यावरून बोलावून घेऊन त्यांना मारहाण करून त्यांचेकडील रोख रक्कम व तीन मोबाईल जबरीने काढून घेतलेबाबत मंद्रुप पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३०१/२०२० भादंविसंक ३९५, ३९७ प्रमाणे गुन्हा दाखल असून सदरचे दोन्ही आरोपी सदर गुन्ह्यात निष्पन्न पाहिजे असलेले आरोपी आहेत. तसेच मंगळवेढा पोलीस ठाण्यात गु.र.नं. ८४/२०१८ भादंविसंक ३७९, ३५३, ३०८ वगैरे मध्येही निष्पन्न पाहिजे असलेले आरोपी आहेत. सदरचे दोन्ही आरोपी आहेत. सदरचे आरोपी हे रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असल्याने त्यांचे विरुद्ध मोक्का दरोडा वाळू चोरी शासकीय नोकरावर हल्ला अशा प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. ही सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ख्वाजा मुजावर, हवालदार नारायण गोलेकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, अंमलदार धनराज गायकवाड, अक्षय दळवी, चालक समीर शेख यांनी बजावली आहे.

भवानी बिजलगावात भक्तांची मांदियाळी धार्मिक उत्सव उत्साहाने साजरा

देवणी/शकिल मनियार

सिमाभागातील भवानी बिजलगावात श्री यल्लालिंग मुत्या महाराज मठात धार्मिक उत्सव मोठ्या उत्साहात पार पडला.यावेळी अन्नकुटही झाले. महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रप्रदेश या तिन्ही राज्यातील भाविकांची मांदियाळी यावेळी दिसुन आली. कार्यक्रमदरम्यान महाअभिषेक, किर्तन व दत्तात्रय मराहाराजाची नाणेतुला हा कार्यक्रम पार पडला. यावेळी कार्यक्रमास हिरेमठ संस्थानचे बस्वलिंग पट्टदेवरु महाराज, हेडगापुरचे शिवलिंगेश्वर शिवाचार्य महाराज, देवणीचे सिध्दलिंग शिवाचार्य महाराज, शंकरलिंग शिवाचार्य महाराज यांचे आशिर्वचन यावेळी झाले. डॉ.तानाजी डोंबाळे, माजी जि.प.सदस्य दिलीप पाटील नागराळकर, अभय साळुंके, प्रा.अनिल इंगोले, प्रशांत पाटील, सभापती बालाजी बिरादार, माजी बांधकाम सभापती नागेश जीवणे, चंद्रशेखर महाजन, राम भंडारे आदीची प्रमुख उपस्थिती होती. व्यंकटराव डोंबाळे, ज्ञानोबा डोंबाळे, शिवकुमार म्हेत्रे, नराजी बाबरे, शिवाजी डोंबाळे, संग्राम रेड्डी, अविनाश हाके, पिराजी डोंबाळे आदी उपस्थित होते. यावेळी राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्यावतीने अन्नकुटाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व्यकंटराव पाटील यांनी तर आभार दत्तात्रय महाराज यांनी मानले. कार्यक्रमास परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रक्तदान व आरोग्य शिबीर

सदर कार्यक्रमात अंबरखाने ब्लड बँकेच्या वतीने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबीरात ३५ जणांनी रक्तदान केले. तर १३७ जणांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. कोरोना महामारी दरम्यानच्या काळात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कमालनगर पोलिस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांचा गौरव यावेळी करण्यात आला.

स्वतः नशामुक्त राहून नशामुक्तीसाठी तृतीयपंथी समाजाने पुढाकार घ्यावा –राजीव निवतकर

मुंबई/प्रतिनिधी

स्वतः नशामुक्त राहून नशामुक्तीसाठी तृतीयपंथी समाजाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन मुंबई शहर जिल्हाधिकारी राजीव निवतकर यांनी केले आहे. नशामुक्त भारत अभियानाच्या माध्यमातून १५ आँगस्ट २०२० ते ३१ मार्च २०२१ या दरम्यान संपुर्ण भारतात व्यसनमुक्तीचा प्रचार करण्यात येत आहे. या अंतर्गत तृतीयपंथीयांनी स्वतः निर्व्यसनी राहुन या बाबत समुपदेशन, उपचार, प्रचार करावा या उद्देशाने मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यक्रम आयोजित करण्यात आला. जिल्हाधिकारी निवतकर म्हणाले, यांनी तृतीय पंथीयांच्या विविध समस्या आणि व्यसनांसमवेत जोडला जाणारा संबंध यापासुन कसे परावृत्त होता येईल याकडे लक्ष दिले पाहिजे. तृतियपंथीयांनी विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन निवतकर यांनी केले. यावेळी उपस्थितांनी आजीवन व्यसनमुक्तीची शपथ ग्रहण केली. गोकुळदास रुग्णालयाच्या सहाय्यक प्राध्यापक डॉ. सारिका दक्षिकर यांनी उपस्थित तृतीयपंथीयांची जिवनपध्दती आणि त्यांना येणाऱ्या अडीअडचणींवर मात करण्यासाठीची मानसिकता विषद केली. मुंबईतील शासकीय रुग्णालये, व्यसनमुक्ती उपचार केंद्रे, समुपदेशन, उपचार पध्दतीची माहिती दिली. तृतीयपंथीयांची मुंबईतील लोकसंख्या आणि त्यांना आवश्यक असलेल्या सोई, सुविधा यांची माहिती घेऊन नियोजन करण्यासाठी सर्व्हे फॉर्म भरुन योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन सहाय्यक आयुक्त समाजकल्याण विभाग, मुंबई शहर, समाधान इंगळे यांनी केले. नशाबंदी मंडळ, महाराष्ट्र राज्यच्या सरचिटणीस वर्षा विद्या विलास व चिटणीस अमोल मडामे यांनी मनोगत व्यक्त करताना संस्थेसमवेत राहुन आपल्या संपर्कात येणाऱ्यांना व्यसनमुक्त होण्यासाठी मदत करावी असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी सर्व तृतीयपंथीयांनी 'हम होंगे कामयाब' सामुहिक गीत म्हणत आम्ही व्यसनमुक्तीचा निर्धार केल्याचे सांगितले.

चंदन तस्करी करणाऱ्यांकडून पावणेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील बाभळगाव शिवारातून चंदनाची झाडे तोडून लाकडे पेनूर येथे विक्रीसाठी आलेल्या दोघांना सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडून २ लाख ८५ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून यासंबंधी तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना शुक्रवारी दुपारी घडली आहे. मोहोळ-पंढरपूर रोडलगत पेनूर हद्दीमध्ये नागनाथ मंदिराजवळ चंदनाची खरेदी विक्री चालू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. सदर ३ इसमाच्या ताब्यात २३ किलो ४०० ग्रॅम सुगंधी चंदनाचा लाकडाचे तुकडे २ लाख ३४ हजार रुपये किंमतीचे, ५० हजार रुपये किंमतीचे मोटारसायकल, १ हजार रुपये किंमतीचे तराजू व वजने, २०० रुपये किंमतीचे ३ लोखंडी कुदळ असा एकूण २ लाख ८५ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. गुन्ह्यांतील तीन आरोपीची वैद्यकीय तपासणी करुन आरोपी व मुद्देमाल मोहोळ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आली आहे. त्यानुसार सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ख्वाजा मुजावर, पोलीस हेड कॉन्स्टेबल नारायण गोलेकर, धनाजी गाडे, पोलीस कॉन्स्टेबल अक्षय दळवी, धनराज गायकवाड, समीर शेख, पितांबर शिंदे यांच्या पथकाने छापा टाकला असता, लंकेश्वर अभिमान काळे (वय २३), अमोल अशोक काळे (वय २०, रा. दोघे यल्लमवाडी) हे आढळून आले. त्यांच्याकडे २ लाख ८५ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. त्यांच्याकडे पोलिसांनी कसून चौकशी केली असता रमेश अप्पाराव चवरे (वय ४० रा.पेनूर ता.मोहोळ) यास चंदन विकण्यास आलो असल्याचे सांगितले. चवरे याची चौकशी केली असता त्याने सांगितले की, विकत घेतलेली चंदनाची लाकडे पुढे बिनू बळीराम दाढे (रा.वाफळे) यास विकत असल्याचे सांगितले आहे. त्यानुसार वरील तिघांवर मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आली आहे. याबाबत पोलीस कर्मचारी धनाजी गाडे यांनी फिर्याद दिली आहे. पुढील तपास पोलीस नाईक अमोल घोळवे करीत आहेत. ही सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र मांजरे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ख्वाजा मुजावर, पोलीस हेड कॉन्स्टेबल नारायण गोलेकर, धनाजी गाडे, पोलीस कॉन्स्टेबल धनराज गायकवाड, अक्षय दळवी, चा.पो.कॉ.समीर शेख व मोहोळ पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक शिंदे, पोलीस कॉन्स्टेबल दळवी यांच्या पथकाने सदरची कारवाई केली आहे.

भिवंडीत मोती कारखान्याला भीषण आग

भिवंडी/अभिजित हिरे

शहरातील खाडीपार भागात असलेल्या मच्छा कंपाउंडमधील एका मोती कारखान्यात भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. या घटनेची माहिती मिळताच भिवंडी अग्निशमन दलाच्या २ गाड्या घटनास्थळी होऊन आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले असले, तरीही या भीषण आगीत तासाभरातच संपूर्ण मोती कारखाना जाळून खाक झाला आहे. मात्र सुदैवाने आगीची घटना कळताच कामगारांनी कारखान्या बाहेर पळ काढण्याने जीवितहानी टळली. मात्र या आगीत मशनरीसह लाखोंचे प्लास्टिक दाणे जळून खाक झाले आहे. खळबळजनक बाब म्हणजे भिवंडी महापालिका हद्दीत मोती कारखान्यांना बंदी असूनही हा कारखाना बेकायदा सुरु असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात आले.

भिवंडीत आगीचे सत्र थांबता थांबेना आज पुन्हा दुपारच्या सुमाराला खाडीपार परिसरात असलेल्या मोती कारखान्याला भीषण आग लागली होती. या कारखान्यात केमिकल युक्त ज्वलनशील पदार्थचा साठा तसेच प्लॉस्टिक दाण्यापासून मोती तयार करून ठेवलेलल्या साठ्यामुळे काही क्षणातच कारखान्यात आग पसरून संपूर्ण कारखाना भीषण आगीत जळून खाक झाला. विशेष म्हणजे मोती कारखान्यात सकाळच्या सत्रातील कामगार काम करीत होते. त्यावेळी या कारखान्याला अचानक आग लागली होती. आगीची घटना समजताच सर्व कामगारांनी कारखान्या बाहेर पळ काढला. त्यामुळे आगीच्या घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही. तर आगीच्या घटनेची माहिती मिळताच अग्निशमनच्या गाड्या घटनास्थळी दाखल होवून आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अग्निशमन दलाच्या जवानांनी दोन तास अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणली. सध्या याठिकाणी कुलींगचे काम सुरु असून आगीचे कारण अध्यापही समजू शकले नाही. या आगीत लाखों रुपयांचा मोतीचा साठा व मशीनरी जळून खाक झाल्या. मात्र या आगीमुळे परिसरातील नागरीवस्तीत धुराचे लोट पसरले होते. भिवंडी शहरात मोठ्या प्रमाणात नागरीवस्तीमध्ये बेकादेशीर मोती कारखाने आहेत. या गोदामांमध्ये अत्यंत ज्वलनशील असे अतिधोकादायक केमिकल व साहित्य असलेला साठा केला जातो. या केमिकल तसेच ज्वलनशील साठ्यांना वारंवार आगी लागण्याचे प्रकार घडत आहेत. चार वर्षापूर्वीही याच परिसरातील एका मोती कारखान्याला आग लागून २ कामगारांचा होरपळून मृत्यू झाला होता. त्यावेळी पालिका प्रशासनाने शहरातील मोती कारखाने बंद करण्याचे फर्मान काढून संबधित कारखाना मालकांना नोटिसी बजावल्या होत्या. मात्र पालिकेची ती कारवाई कागदावरच राहिल्याचे दिसून आले. तर दोन वर्षापूर्वी भिवंडी-ठाणे महामार्गावरील राहनाळ येथे लागलेल्या आगीत लाकडाच्या वखारीत झोपेत असलेल्या ६ कामगारांचा होरपळून मृत्यू झाला होता. तसेच गेल्यावर्षी फेब्रवारीमध्ये दापोडा येथे लागलेल्या आगीत ३ कामगार होरपळून मृत्यू झाल्याची घटना घडली होती.

भिवंडीतील यंत्रमाग कारखाने व गोदामांना वारंवार आगी लागण्याचे सत्र सुरु असताना आज मोती कारखान्याला लागलेल्या आगीच्या निमित्ताने भिवंडीतील अग्नी तांडव थांबणार कधी असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

'गोलानी नाका' येथे सिग्नल यंत्रणा कार्यान्वयीत करण्याची रणधीर कांबळेंची मागणी

वसई/प्रतिनिधी

वसई पुर्व पट्टीतील गोलानी, आग्रवाल व राजप्रभा हे विभाग औद्योगिक वसाहतीचे असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कामगारांची, चाकरमान्यांची, शाळकरी विद्यार्थ्यांची, उद्योजकांची प्रचंड गर्दी असते. सकाळची वेळ व सायंकाळची वेळ सर्वांसाठी खुप महत्वाची असल्याने बाईकस्वार, टोरिक्षा, स्कूलबस, औद्योगिक वसाहतीतील मोठमोठे कंटेनर, टेम्पो व विविध वहाने मोठ्या संख्येने या रस्त्यावरून धावतात पण... गोलानी नाक्यावर चार रस्ते असल्याने या ठिकाणी येताच ट्रॅफिक जाम होते.आणि तासंतास या नाक्यावर सर्व वहाणे अडकून बसतात. अनेकवेळा वालीव नाक्यावर कार्यरत असलेले वाहतूक पोलीस यांना याठिकाणी येऊन ही समस्या सोडवावी लागते तो पर्यन्त वालीव नाक्यावर ट्रॅफिक जाम होते आणि हे नेहमी होत आहे. यामुळे अनेक सामान्य नागरिकांना, चाकरमान्यांना, विद्यार्थ्यांना आपल्या घरी अथवा कामाच्या ठिकाणी वेळेवर पोहचता येत नाही. ही समस्या गंभीर असून यावर तात्काळ नगरपालीकेने व वाहतूक पोलीस शाखेने या ठिकाणी सिग्नल यंत्रणा व झेब्रा क्रॉसींग बसविणे गरजेचे व महत्वाचे आहे. सदर मागणी बविआचे वालीव विभाग प्रवक्ते रणधीर कांबळे यांनी दि.७ जाने.२०२१ रोजी लेखी निवेदनाद्वारे प्रभाग समिती 'जी'चे सहाय्यक आयुक्त यांच्याकडे दाखल केली आहे. संबंधीत आधिकारी यांनी तात्काळ दखल घेऊन गोलानी नाक्यावर सिग्नल यंत्रणा कार्यान्वयीत करावी व लवकरच करतील अशी अपेक्षा आहे.

जैन मुनी विजय रश्मिरत्नसूरिजी यांची जैन हिल्स येथे भेट; गांधीतीर्थ पाहून जैन मुनी गण भारावले

जळगाव/प्रतिनिधी

जैनत्व जागरण अभियान अंतर्गत श्वेतांबर मूर्तिपूजक जैन समाजातील तपागच्छ सूरि प्रेमभुवनभानु समुदायामधील इंडिया बुक रेकॉर्ड - एशिया बुक रेकॉर्ड धारक विश्वविक्रमी ४५१ दीक्षादानेश्वरी श्री गुणरत्न सूरीश्वरजी म.सा. यांचे शिष्यरत्न जैनाचार्य विजय रश्मिरत्नसूरिजी यांचे गुरुवारी दि. ११ रोजी जैन हिल्स येथे आगमन झाले. कंपनीच्यावतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. त्यांनी जैन हिल्स येथील शेती संशोधन व प्रात्यक्षिक केंद्र, गांधी तीर्थ, श्रद्धाधाम येथे भेट दिली व काही भाविकांशी सुसंवाद साधला. यावेळी जैन परिवारातील सदस्यांनी जैन साधू गणांचे दर्शन घेतले. द ॲड्रेस ऑफ रियल हॅप्पीनेस ह्या विषयावर जैनाचार्य विजय रश्मिरत्न सूरीश्वरजी यांनी आपल्या प्रवचनात सांगितले की, प्रत्येक व्यक्तीला सुख पाहिजे. सुख मिळविण्यासाठी मानव हा काबाडकष्ट करीत असतो, साधन सामुग्री गोळा करण्यामागे भटकत असतो व आपल्याच जीवनाचे अमूल्य क्षण घालवत असतो, परंतु सुख मिळत नाही. यावेळी आचार्यांनी सांगितले की, सुख हे साधन मध्ये नाही, तर साधना मध्ये आहे. सुख हे सामग्री मध्ये नाही, तर ते आपल्या मनात आहे. सुख भोगात नाही तर सुख त्यागात आहे. सुखाचा खरा पत्ता मिळविण्यासाठी जैनाचार्यांनी दोन मंत्र दिले, पहिला असा की 'मुझे कुछ नही चाहिये' आणि दुसरा 'मेरा कोई दुश्मन नही.' हे मंत्र दररोज १०८ वेळा याचा जाप करा, आपणास सुखाचा अनुभव येईल. रात्रभर जैन हिल्स येथे मुक्काम करून साधू गण यांनी १२ रोजी पहाटे साडेपाच वाजता पाचोराकडे विहार केला.

15 TO 21 FEB 2021 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 13/02/2021 9:10 PM Page 1

पर्यटन विकासाच्या माध्यमातून जिल्ह्याचा विकास साधणार -मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

पालघर/प्रतिनिधी

पर्यटनाच्या दृष्टीने जिल्ह्याची भौगोलिक रचना अनुकूल असुन जिल्ह्याला विस्तीर्ण सागर किनारा लाभला आहे. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी पर्यटन स्थळाचा विकास करणे आवश्यक असल्याने पर्यटन विकासाच्या माध्यमातून जिल्ह्याचा विकास साधणार असल्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे पालघर जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते त्यावेळी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत श्री. ठाकरे बोलत होते. नव्याने जिल्हा अस्तित्वात आल्याने जिल्ह्यासाठी लागणाऱ्या आवश्यक सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक तसेच जिल्हा परिषदेच्या इमारतीचे काम लवकरच पुर्ण होऊन नागरिकांसाठी ऊपलब्ध होणार आहे. कुपोषण पुर्णपणे थांबवायचे असल्याने जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करणार असुन आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणून पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी सांगितले. जिल्ह्याला समूद्र किनारा लाभला आहे. तसेच जिल्ह्यात हिल स्टेशन तसेच नैसर्गिक सानिध्य लाभल्याने पर्यटनाच्या दृष्टिकोनातून पर्यटन स्थळांचा ...पान ६ वर

कोरोना काळात पोलिसांचे योगदान महत्वाचे होते - विवेक फणसळकर

अंबरनाथ/प्रतिनिधी

कोरोनाची तीव्रता कमी करण्यासाठी टाळेबंदी तीव्र करण्याची फार मोठी जबाबदारी पोलिसांवर आली होती. आपल्या कुटुंबाची, आपल्या आरोग्याची इतकेच नव्हे तर आपल्या जीवाची पर्वा न करता पोलीस आपले कर्तव्य बजावत होते. त्यात हजारो पोलीस अधिकारी आणि कर्मचारी बाधित झाले. त्यांची कुटुंबे ही बाधित झाली. ३४ जणांना आपले जीव गमवावे लागले तरीही पोलीस कुठेही कमी पडले नाहीत, अशा शब्दांत पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांनी कोरोनाकाळात योगदान देणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करुन कौतुक केले. चोण मित्र मंडळ आणि सिंधुदुर्ग नागरी सहकारी पतपेढी मर्यादित यांच्या संयुक्त विद्यमाने सुमती गणपत पाटील यांच्या 'पोलिसांची माई' या आत्मचरित्राचे प्रकाशन शनिवारी रोटरी सभागृहात ठाण्याचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी मार्गदर्शन करतांना विवेक फणसळकर यांनी वरील प्रतिपादन केले. अतिरिक्त पोलीस आयुक्त ...पान ६ वर

भिवंडी शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या वऱ्हाळ तलावावर हिरवा तरंग, दुर्गंधीमुळे नागरीक हैराण

भिवंडी/अभिजित हिरे

भिवंडी शहरातील जुन्या नागरी वस्तीत नगरपरिषद असल्या पासून पाणी पुरवठा करणाऱ्या कामतघर येथील वऱ्हाळ तलावांची सुरक्षा वाऱ्यावर असल्याने कपडे धुणे, वाहन धुणे हे नेहमीचे झाले असल्याने सध्या तलावातील पाण्यावर हिरवा तरंग पसरला असून या पाण्यामुळे दुर्गंधी सुटल्याने कामतघर परिसरातील नागरीक हैराण झाले आहेत. या तलावातून जुन्या भिवंडी शहरातील मंडई, गौरी पाडा, वाणी आळी, ब्राह्मण आळी, सौदागर मोहल्ला, तांडेल मोहल्ला या भागात दररोज २ एमएलटी पाणी पुरवठा केला जात असून या तलावातील विसर्जन घाटांची दुरवस्था झाल्याने या विसर्जन घाटा साठी अडविलेल्या पाण्यातील प्रदूषण सर्वदूर पाण्यात पसरल्याने ८ एकर क्षेत्रफळातील या तलावाच्या पाण्यावर हिरवा तेलकट तरंग साचले असल्याने त्याची दुर्गंधी सुध्दा येत आहे. या कडे महानगरपालिका प्रशासन व लोकप्रतिनिधी लक्ष केव्हा देणार असा प्रश्न सर्वसामान्य जनतेच्या मनात येत आहे. या बाबत महापालिका ...पान ६ वर

रणधीर कांबळे हे बविआचे एकनिष्ठ व धडाडीचे कार्यकर्ते - माजी महापौर प्रविणाताई ठाकूर

वसई/प्रतिनिधी

रविवार आयोजित केलेल्याआई जीवदानी माता दर्शन यात्रा एक दिवशीय महिला सहलीतील हळदी-कुंकू समारंभात मा.प्रथम महिला महापौर प्रविणाताई ठाकूर, बोईसरचे लाडके आमदार राजेश पाटील यांच्या सौभाग्यवती राजेश्रीताई पाटील, मा.महिला व बालकल्याण सभापती मायाताई चौधरी, मा.सभापती यज्ञेश्वर पाटील, नगरसेवक सदानंद पाटील यांनी सदिच्छा भेट दिली. सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत लता कांबळे यांनी केले. या प्रसंगी संबोधीत करताना प्रविणाताई यांनी रणधीर कांबळे यांच्या विविध स्तुत्य उपक्रमाची प्रशंसा केली. कोरोनाच्या बिकट परिस्थितीत आपल्या पक्षाचे कार्यकर्ते जणतेच्या सोबत जीवाची पर्वा न करता त्यांच्या संकटात मदतीचा हात देत होते आणि हीच खरी आपल्या पक्षाची ओळख आणि ताकद आहे. आज तुम्हाला आई जीवदानी मातेच्या दर्शनासाठी आणून या ठिकाणी रणधीरने असा एक आगळा वेगळा कार्यक्रम घडवून आणला. खरच तो आपल्या पक्षाचा एकनिष्ठ व धडाडीचा कार्यकर्ता आहे. त्याचा आम्हाला अभिमान आहे, असे गौरोद्गार काढले व उपस्थित महिलांना संबोधीत करून शुभेच्छा दिल्या. तसेच आमदार राजेश पाटील यांच्या राजेश्रीताई पाटील यांनीही महिलांना प्रोत्साहनपर व उपयुक्त असे छान मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात बविआचे वरिष्ठ नेते व माजी जि.प.आध्यक्ष काशिनाथ पाटील (दादा) यांच्या समवेत राष्ट्रवादीचे विक्रमगड विधानसभेचे युवा आमदार सुनिल भुसारा साहेब (आपला माणूस) यांनीही सदिच्छा भेट दिली. ...पान ६ वर

राष्ट्रीय आयोगाला साक्ष दिल्यामुळे माझा खून होऊ शकतो -गंगाधर म्हात्रे

वसई/प्रतिनिधी

राष्ट्रीय आयोगापुढे साक्ष दिल्यामुळे कधीही माझा खून होऊ शकतो,अशी भिती वसईतील आदिवासी सेवक गंगाधर म्हात्रे यांनी जाहीर कार्यक्रमात व्यक्त केल्यामुळे खळबळ उडाली आहे. जुन १९८७ ला वसई-कामण येथील समाजसेवक यादव म्हात्रे यांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात त्यांचे लहान भाऊ गंगाधर म्हात्रे हे प्रत्यक्षदर्शी साक्षिदार आहेत. आपल्या भावाची डोळ्यादेखत हत्या झाल्यामुळे त्यांच्या मारेकऱ्यांना शिक्षा होण्यासाठी गेली ३२ वर्षे ते एकाकी लढा देत आहेत. त्याचबरोबर तालुक्यातील गरीब आदिवासी बांधवांच्या समस्यांचाही त्यांनी लढा उभारला आहे. त्यामुळ राज्य शासनाने त्यांना आदिवासी सेवक पुरस्काराने सन्मानितही केले आहे. यादव म्हात्रे यांच्या खुनात गंगाधर म्हात्रे यांनी ...पान ६ वर

लातूर जिल्ह्यात कला पथकाव्दारे कोविड-१९ संसर्गजन्य आजारावरील जनजागृती मोहिम सुरु

लातूर/प्रतिनिधी

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, अंतर्गत जिल्हा माहिती कार्यालय, लातूरच्या वतीने जिल्हयात ११ कलापथका व्दारे ११८ गावांमध्ये कोरोना (कोविड-१९) या संसर्गजन्य आजारावरील तसेच शासनाच्या वर्षपूर्ती निमित्त शासकीय योजनांची जनजागृती मोहिम दि. ५ ते २० फेब्रुवारी २०२१पर्यंत राबविण्यात येत आहे. जिल्हयात ११ कला पथकाव्दारे चालू असलेल्या कोरोना संसर्गजन्य आजारावर जनजागृती मोहिमेस प्रतिसाद मिळत असून या ११ कला पथकाव्दारे जिल्हयात जनजागृती करण्यात येत आहे. त्या कलापथक व तालूक्यातील गावांची नावे पूढील प्रमाणे आहेत. लातूर तालुका : सर्वधर्म समभाव कला मंडळ मौजे खंडाळा ता.जि.लातूर- मुरुड,जवळा (बु.), बाभळगाव, गातेगाव, बोरी, गाधवड, बोरगाव, सारोळा, चिखूर्डा, तांदूळजा व रामेगाव. परीवर्तन बहुउद्देशिय सेवा भावी संस्था कोष्टगाव ता.रेणापूर, एकूर्गा, निवळी, चिंचोली (ब), भातांगळी, मुरुड अकोला, सेलू, रुई रामेश्वर, कासार जवळगा, सारसा, नागझरी व जेवळी. रेणापूर तालूका : ऋचा फाऊंडेशन यशवंतवाडी, ता.रेणापूर, पानगाव, खरोळा, कारेपूर, पोहरेगाव, कोष्टगाव, दवणगाव, भंडारवाडी, रेणापूर, पळसी, तळणी व कुंभारी. औसा तालूका : मुक्ताई बहुउदेशिय सामाजिक संस्था, प्रकाश नगर,लातूर- बेलकुंड, गुबाळ, उजनी, माळकोंडजी, टाका, मातोळा, लांमजना, अशिव, किल्लारी, औसा, भादा.निलंगा तालूका: जनजागृती ...पान ६ वर

तालुक्यातील होरबिगर कंपनी व्यवस्थापनाने केल्या उपोषणकर्त्या कामगारांच्या सर्व मागण्या मान्य

वाडा/प्रतिनिधी

तालुक्यातील वडवली - मुसारणे ग्रामपंचायत हद्दीतील होरबिगर इंडिया प्रेसिजन कंपनी कामगारांनी आपल्या विविध मागण्यांसंदर्भात सोमवार (दि.८) रोजी कंपनी प्रवेशद्वारासमोर आमरण उपोषण सुरू केले होते. याबाबत तिसऱ्या दिवशी (दि.१०) कंपनी व्यवस्थापनाने नरमाईची भुमीका घेऊन अखेर उपोषणकर्त्या कामगारांच्या सर्व मागण्या मान्य केल्याने उपोषण मागे घेण्यात आहेत. निलंबित केलेल्या कामगारांना तत्काल कोर्टाच्या आदेशान्वये कामावर घेण्यात येतील, विनाकारण कोणत्याही प्रकाराची पत्रव्यवहार व ...पान ६ वर

गुंदवली ग्रामपंचायतीवर रोशनी पाटील सरपंच, तर उपसरपंचपदी सुमित म्हात्रे

भिवंडी/प्रतिनिधी

तालुक्यातील २८ ग्राम पंचायतींच्या सरपंच उपसरपंच पदासाठी बुधवारी निवडणूक प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीमध्ये गोदाम पट्टा व आर्थिक दृष्ट्या सक्षम असलेल्या गुंदवली ग्राम पंचायतीवर शिवसेनेच्या रोशनी राजेश पाटील तर उपसरपंचपदी सुमित सुरेश म्हात्रे यांची बिनविरोध निवड झाली आहे. शिवसेनेचे जैष्ठ कार्यकर्ते सुरेश म्हात्रे बाळ्या मामा यांच्या नेतृत्वाखाली गुंदवली ग्रामपंचायतीवर शिवसेनेचे उमेदवार बहुमताने निवडून आले आहेत. बुधवारी गुंदवली ग्राम पंचायत कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी तथा पंचायत समितीच्या बांधकाम विभागाचे शाखा अभियंता व्ही एस म्हसकर व ग्रामसेवक कैलास पाटील यांच्या उपस्थितीत सरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली. यावेळी सरपंच पदासाठी रोशनी राजेश पाटील तर उपसरपंच पदासाठी सुमित म्हात्रे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी म्हसकर यांनी रोशनी पाटील यांची सरपंचपदी तर सुमित म्हात्रे यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड जाहीर केली. रोशनी पाटील व सुमित म्हात्रे यांची सरपंच व उपसरपंच पदी निवड जाहीर होताच त्यांच्या सार्थकांनी फटाके फोडून व गुलाल उधळत एकच जल्लोष ...पान ६ वर

दिव्यांगासाठीच्या योजनांमुळे त्यांच्या आयुष्याला दिशा-राहुल केंद्रे

देवणी/शकिल मनियार

साडे आठ कोटी रुपयांचे दिव्यांगासाठी साहित्य वाटणारी लातूर जिल्हा परिषद राज्यातील एकमेव जिल्हा परिषद असून यामुळे दिव्यांगाच्या आयुष्याला दिशा मिळणार असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे अध्यक्ष राहुल केंद्रे यांनी केले. लातूर जिल्हा परिषदेच्या वतीने दिव्यांगासाठी साहित्य वाटपाच्या देवणी येथील आयोजित कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे सभापती शंकरराव पाटील हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष भारतबाई साळुंखे, भगवानराव पाटील तळेगावकर, कृषी सभापती गोविंद चिलकोरे, समाजकल्याण सभापती रोहिदास वाघमारे, जि.प.चे माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, जि.प. सदस्य प्रशांत पाटील जवळगेकर, पृथ्वीराज शिवशिवे, माजी नगराध्यक्ष वैजनाथ अष्टूरे, तहसिलदार सुरेश घोळवे, गटविकास अधिकारी मनोज राऊत, हावगीराव पाटील, मनोहर पटणे, काशिनाथ गरीबे यांची उपस्थिती होती. केंद्र शासनाच्या माध्यमातून ग्रामीण भागासाठी विविध योजना आणण्यासाठी माजी पालकमंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांच्या नेतृत्वाखाली यश आले असून वेगवेगळ्या योजनांचा लाभ ग्रामीण भागात मिळवून दिला जात आहे. या योजनांच्या माध्यमातून लाभार्थी सक्षम होऊन आत्मनिर्भरते कडे वाटचाल होत आहे असे मत राहुल केंद्रे यांनी पुढे बोलताना व्यक्त केले. यावेळी पस्तीस लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात साहित्याचे वाटप करण्यात आले. उर्वरित सर्व लाभार्थ्यांना त्यांचे साहित्य त्यांच्या घरापर्यंत नेऊन द्याव्यात असे निर्देश जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे यांनी यावेळी बोलताना सांगितले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन जाधव यांनी तर आभार पृथ्वीराज शिवशिवे यांनी मानले.